CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

!! जाहीर सूचना !!
सोलापूर तरुण भारत जाहिराती तसेच सर्व विभागांसाठी ऑनलाईन रिसीट ॲप वापरण्यास सुरुवात केली आहे. ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा, कोणतेही पैसे जमा करताना ऑनलाईन रिसीटची मागणी करावी. ऑनलाईन रिसीट शेअर करण्याची देखील सोय केली आहे. आमच्या प्रतिनिधीकडून याची माहिती घ्यावी. ऑनलाईन रिसीटची मागणी हक्काने करावी.
सहकार्याबद्दल धन्यवाद.

सोलापूर | सोमवार, १९ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक २८९ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### आज रक्षाबंधन



## महत्त्वाचे

### जागतिक अनिश्चिततेने सोने आयातीत घट



**नवी दिल्ली** : जागतिक आर्थिक अनिश्चिततेमुळे चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांत भारताची सोने आयात ४.२३ टक्के घसरून १२.६४ अब्ज डॉलर्सवर आली. मागील वर्षी याच कालावधीत १३.२ अब्ज डॉलर्सचे सोने आयात झाले होते. सोन्याच्या आयातीतील ही सलग तिसऱ्या महिन्यातील घसरण आहे. सरकारने सोने आणि चांदीवरील आयात कर अलिकडेच १५ टक्क्यांवरून घटवून सहा टक्के केला आहे.



गणपती बाप्पा मोरया... गणेश चतुर्थीला अजून वेळ असला, तरी मुंबईसारख्या महानगरातील वाहतुकीची समस्या लक्षात घेता, मोठ्या मंडळांनी बाप्पाची मूर्ती आणण्यास सुरुवात केली आहे. असाच एक गणपती घेऊन जाताना मंडळाचे कार्यकर्ते

## सर्व पोलिसांना दर दोन तासांनी द्यावा लागणार अहवाल

◆ **नवी दिल्ली, १८ ऑगस्ट**

कोलकातामध्ये एका प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेल्या अत्याचाराच्या आणि खूनाच्या घटनेनंतर जगभरातून संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणी केंद्रीय गृह मंत्रालयाने देशभरातील सर्व पोलिस दलांना निर्देश जारी केला आहे.

केंद्रीय गृहमंत्रालयाच्या

### गृह मंत्रालयाचे पाऊल

निर्देशानुसार, आता पोलिसांना दर दोन तासांनी आपल्या भागातील कायदा आणि सुव्यवस्थेचा एक अहवाल गृह मंत्रालयाला पाठवावा लागणार आहे. देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील पोलिसांना हा आदेश बंधनकारक असणार आहे.

कायदा आणि सुव्यवस्थेवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी केंद्राने हे पाऊल उचलले आहे. या आदेशात सततच्या अपडेट्सवर भर देण्यात आला असून, सर्व पोलिस दलांना ई-मेल, फॅक्स किंवा व्हाट्सअॅपद्वारे मंत्रालयाच्या नियंत्रण कक्षाला माहिती पुरवावी लागेल. देशात कुठे काय घडत आहे आणि त्यावर त्वरित पावले कशी उचलता येतील, यासाठी हा निर्णय घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली. (वृत्तसंस्था)

# महिला डॉक्टरच्या हत्येमागे अवयव तस्करीचा संशय

### सीबीआय चकित

◆ **कोलकाता, १८ ऑगस्ट**

कोलकाताच्या आर. जी. कार मेडिकल कॉलेजमधील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवरील सामूहिक अत्याचार व हत्या प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली. सीबीआयचा आतापर्यंतचा तपास आणि मृत डॉक्टरच्या सहकाऱ्यांच्या जबाबानुसार मानवी अवयव तस्करीचा भंडाफोड करण्याचा प्रयत्न करणाऱ्या या डॉक्टरला मार्गातून हटवण्यात आले. सीबीआयने शनिवारी १३ जणांची चौकशी केली. दोन दिवसांत १९ जणांची चौकशी झाली आहे. यातील निम्म्याहून जास्त लोकांनी तस्करीच्या रॅकेटबद्दल माहिती दिली. लवकरच खरे चेहरे समोर येतील, असे सीबीआयने म्हटले आहे.

प्रकरणाची पाळेमुळे खोलवर आहेत. ही घटना सामान्य वाटावी म्हणून अत्याचार करण्यात आला. अत्याचारानंतर ओळखले जाण्याच्या भीतीने हत्या केल्यासारखे वाटावे. प्राथमिक तपासात पोलिस याच दिशेने जात होते. एका राजकीय नेत्याने रुग्णालयातील डॉक्टरांच्या एका व्हाट्सअॅप ग्रुपमधील संभाषणाचा स्क्रीनशॉट असल्याचा दावा केला. त्यात सेक्स, ड्रग रॅकेट असल्याचे दिसते. यात एका अन्य पक्षातील वरिष्ठ नेत्याच्या पुतण्याचा उल्लेख आहे.

आतापर्यंतच्या चौकशीत मेडिकल कॉलेजच्या चार जणांची नावे समोर आली आहेत. यात तीन डॉक्टर व एक कर्मचारी आहे. हे चारही जण एका राजकीय पक्षाशी जोडलेले असून, ते सेक्स, ड्रग्ज रॅकेट चालवत होते. मृत डॉक्टरचे वडील बांगला मीडियाला म्हणाले, संपूर्ण विभाग यात सामील आहे. पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह सेमिनार कक्षात आणून ठेवला असावा, असा संशय आहे.

#### कोलकाता पोलिसांचा दावा

कोलकाता पोलिसातील एक अधिकारी म्हणाला, प्राथमिक तपासात एका राजकीय पक्षाच्या ज्येष्ठ नेत्याचा व अन्य एका नेत्याच्या मुलाचे नाव यात आले होते. परंतु, पुराव्याअभावी संशयाच्या कक्षेतून ते वगळण्यात आले. कोलकाता पोलिस आयुक्त विनीत गोयल पत्रकारांना म्हणाले, एखाद्या गोष्टीच्या आधारे परंतु विनापुरावा एखाद्याला अटक करता येत नाही. (वृत्तसंस्था)

### कोलकाता प्रकरणाची सुप्रीम कोर्टाकडून दखल

◆ **नवी दिल्ली, १८ ऑगस्ट**

कोलकात्यात महिला प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार व हत्येची दखल सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून घेतली आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. जे. बी. पार्डीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांचा समावेश असलेले न्यायासन यावर मंगळवारी सुनावणी करणार आहे.

या प्रकरणाच्या विरोधात देशभरात उसळलेला संताप आणि वैद्यकीय क्षेत्राने पुकारलेल्या आंदोलनादरम्यान शनिवारी या मुद्यावर न्यायालयाला पत्र पाठवण्यात आले होते. १४ ऑगस्ट रोजी असामाजिक तत्त्वाद्वारे आरजी कार वैद्यकीय महाविद्यालयात झालेल्या बलात्कार व हत्या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी सिकंदराबाद येथील आर्मी कॉलेज ऑफ डेंटल सायन्सेसमधील डॉ. मोनिकासिंह यांचे वकील सत्यम सिंह यांनी केली. (वृत्तसंस्था)

### पुणे सत्र न्यायालयाचा राहुल गांधींना समन्स

**पुणे** : काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबाबत राहुल गांधी यांनी केलेल्या वक्तव्याप्रकरणी न्यायालयात हजर राहण्याचा आदेश देण्यात आला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर बदनामी प्रकरणी राहुल गांधींनी १९ ऑगस्ट रोजी प्रत्यक्ष हजर राहावे, असे न्यायालयाने म्हटले आहे. राहुल गांधींनी मार्च २०२३ मध्ये लंडन येथे एका भाषणात केलेल्या वक्तव्याच्या विरोधात हा खटला दाखल करण्यात आला होता. राहुल गांधी यांनी लंडन येथील भारतीय लोकांसमोर भाषण करताना स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान केल्याचा आरोप आहे. पुणे पोलिसांनी याबाबतचा अहवाल न्यायालयात दाखल केला आहे. राहुल गांधी यांच्या वक्तव्याबाबत सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी पुणे सत्र न्यायालयात मानहानीची याचिका दाखल केली होती.

### आसाममध्ये कोट्यवधींचे मादकपदार्थ जप्त

**गुवाहाटी** : आसामच्या नागांव जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये दीड कोटी रुपयांचे मादकदार्थ जप्त करून दोन महिलांसह एकूण पाच जणांना अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी रविवारी दिली. पहिल्या घटनेत ढिंग पोलिस ठाण्याच्या पथकाला १६७ ग्रॅम वजनाची हेरॉईन असलेली प्लॅस्टिकची पिशवी सापडली, असे नागांव पोलिसांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. पोलिसांनी या प्रकरणात दोन महिलांसह तीन जणांना अटक केली. त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. दुसऱ्या प्रकरणात पोलिसांनी साबुच्या डबीत ठेवलेले १०.४६ ग्रॅम हेरॉईन जप्त केले. ही कारवाई कचाऊ येथे करण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळावर विक्रेत्यालाही अटक केली.

# घरगुती वीज ग्राहकांना शून्य बिल, शेतकऱ्यांना मोफत

### राज्य शासनाची योजना तयार

**मुंबई, १८ ऑगस्ट**

राज्य शासनाने गेल्या अडीच वर्षांत सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून वीजक्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना पुढील पाच वर्षे मोफत वीज देण्यात येत आहे. मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना व मागेल त्यांना सौर कृषिपंप योजनेतून दिवसा वीजपुरवठा करण्यात येणार आहे. सोबतच केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य होत आहे. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकरी आणि घरगुती ग्राहकांना मोठा दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने प्रभावी योजना तयार केली असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. सातारा जिल्ह्यातील मान्याचीवाडी येथे महावितरणच्या वतीने १०० टक्के सौर ऊर्जीकरण करण्यात आले आहे. राज्यातील पहिले सौरग्राम झालेल्या मान्याचीवाडीचे लोकार्पण करताना मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. वीजक्षेत्रात राज्य शासनाने केलेल्या कामगिरीबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे त्यांनी अभिनंदन केले.



मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सौर ऊर्जा प्रामुख्याने घरगुती ग्राहक व शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पाद्वारे घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य होत आहे. राज्य शासनाने मागेल त्यांना सौर कृषिपंप योजना जाहीर केली असून, खुल्या प्रवर्गातील शेतकऱ्यांना १० टक्के तर अनुसूचित जाती, जमातीच्या शेतकऱ्यांना पाच टक्के रक्कम भरून साडेसात अश्वशक्तीपर्यंत कृषिपंप व सौर पॅनेल्स मिळणार आहे.

### दीड वर्षांत १२ हजार मेगावॅट ऊर्जेची निर्मिती

या कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून घरगुती ग्राहकांना मोफत वीज उपलब्ध होत आहे. तर येत्या दीड वर्षांत राज्यात सौर ऊर्जेद्वारे १२ हजार मेगावॅट विजेची निर्मिती होणार आहे. ही वीज शेतकऱ्यांना दिवसा देण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी रात्री शेतात जाण्याची गरज पडणार नाही. राज्याने सौर ऊर्जेत मोठी आघाडी घेतली आहे.

### ऑगस्टमध्ये पावसाचे उरले फक्त पाच दिवस

**सोलापूर** : यंदा पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच पावसाने दमदार हजेरी लावली. त्यामुळे खरिपाच्या पेरण्या वेळेत झाल्या. खरिपाची पिकेही जोमात आहेत. मात्र, ऑगस्ट सरताना पावसाने बहुतांश भागात पुन्हा ओढ दिली असून, या महिन्यातील पावसाचे अवघे पाच दिवस शिल्लक आहेत.

जुलै अखेर आणि ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासून पावसाचा जोर चांगला होता. राज्यातील सर्व धरणांमध्ये भरपूर पाणी असून, जिथे कमतरता जाणवत होती तिथेही आता पाण्याची विवंचना मिटली आहे. खरिपाच्या पेरण्याही वेळेत आटोपल्याने शेतकरी चिंतामुक्त आहे. मात्र, ऑगस्ट अखेरीस पावसाने ओढ दिल्याचे चित्र आहे. वास्तविक, नारळी पौर्णिमा, श्रीकृष्णजन्माष्टमी अशा सर्व सणांना पावसाचा जोर दिसून येतो. यंदा मात्र रक्षाबंधनाच्या आसपास पावसाने पाठ फिरवली आहे.

NAAC ACCREDITED & ISO 9001: 2015 Certified
VIDYA VIKAS PRATISHTHAN'S
V V P INSTITUTE OF ENGINEERING & TECHNOLOGY SOLAPUR.
जयतु तंत्रविज्ञानम्
72/2B, Soregaon, Dongaon Road, Solapur.- 413008 Mob : 8380030555
E-mail : vvpiet@rediffmail.com, Website : www.vvpengineering.org
Approved By AICTE, DTE, Mumbai & Affiliated to DBATU, Lonere (State Level University)
ADMISSIONS OPEN 2024-25
First Year Engg. B.Tech. & Direct Second Year Engg. B.Tech
DTE CODE EN-6321



CAP ROUND-2
मोफत ऑप्शन फॉर्म भरण्याची सुविधा
• प्रथम वर्ष • 20/08/2024 to 22/08/2024
• थेट द्वितीय वर्ष • 25/08/2024 to 27/08/2024

| B.Tech. Courses | Intake | Choice Code |
|---|---|---|
| Artificial Intelligence & Data Science | 30 | 632199510 |
| Computer Science & Engineering | 90 | 632124210 |
| Civil Engineering | 30 | 632119110 |
| Electrical Engineering | 60 | 632129310 |
| Electronics & Tele. Engineering | 60 | 632137210 |
| Mechanical Engineering | 30 | 632161210 |
| **M.Tech. Courses** | **Intake** | **Choice Code** |
| Computer Science & Engineering | 18 | 632124210 |
| Mechanical (Design) Engineering | 06 | 632160110 |

DTE फॅसिलिटेशन सेंटर FC / शासनमान्य SCRUTINY CENTER (SC) सुविधा उपलब्ध
विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन केंद्र सुरु सात रस्ता, जी.पी. सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ, तुळजापूर, कुर्डूवाडी, उमरगा, बार्शी, धाराशिव, लातूर या ठिकाणी
मेरिटमधील विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयीन शिष्यवृत्ती
ठळक वैशिष्ट्ये — नामांकित कंपनीमध्ये ७०% पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना नोकरी
• विविध शैक्षणिक व औद्यगिक संस्थांशी सामंजस्य करार
• अत्यंत माफक दरात गुणवत्तापूर्ण शिक्षण तसेच शासनाच्या सर्व शिष्यवृत्ती उपलब्ध
• विद्यार्थ्यांची Employability Skill वाढविण्यावर विशेष भर
• स्पर्धा परिक्षा UPSC, MPSC, GATE साठी विशेष मार्गदर्शन
• मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहांची सुविधा
• सेंट्रलाईज्ड ट्रेनिंग प्लेसमेंट सेलच्या माध्यमातुन प्लेसमेंटच्या संधीत वाढ.
• सन २०२३-२४ मध्ये ३९ पेक्षा जास्त कंपन्यांची भेट.
• शहरातील सर्व भागातून बस सुविधा उपलब्ध
Some of Magnificent Placements




Dr. Arun N.Gaikwad — Campus Director & Principal
Hon. Shri. Amol (Nana) Chavan — Founder Secretary
Hon. Dr. G. K. Deshmukh — Founder Chairman
• OUR TOP RECRUITERS •
Infosys, tcs Tata Consultancy Services, Cognizant, accenture, Triveni Turbines, Precision, GRP, Hexaware, Softenger, wipro, Enzigma, Persistent, crave Infotech, DXC Technology, Lhp, kirloskar
FOR ADMISSIONS CONTACT
Prof. R. S. Chavan 9822174477
Prof. J. K. Roman 9545935455

# लाडकी बहीण योजनेची रक्कम ३ हजार करणार

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

**सातारा, १८ ऑगस्ट**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कायमस्वरूपी सुरू राहणार आहे. या आर्थिक वर्षात योजनेसाठी ३५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्याची आर्थिक स्थिती जसजशी मजबूत होत जाईल, तसतशी दरमहा दीड हजार रुपयांची वाढवून ती तीन हजार रुपयांपर्यंत करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

सातारा येथील सैनिक स्कूलच्या मैदानावर मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत माझी लाडकी बहीण लाभार्थी सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.



मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, महिला जोपर्यंत सशक्त होत नाही, तोपर्यंत अर्थव्यवस्था बळकट होणार नाही. महिलांना पैसे कुठे कसे खर्च करावे चांगले कळते. या योजनेमुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. यातून मिळणाऱ्या पैशाचा उपयोग करून महिला लहान मोठे उद्योग सुरू करतील.

राज्याच्या एकूण विकासाच्या दृष्टीने योजना महत्त्वपूर्ण ठरेल. त्यामुळे ही योजना कायमस्वरूपी सुरू ठेवण्यात येणार आहे.

आम्ही टप्प्याटप्प्याने दीड हजार रुपयांची रक्कम तीन हजार रुपये करणार आहोत. आमचे सरकार म्हणजे बहिणींचे हक्काचे माहेर आहे आणि लाडकी बहीण योजनेतून मिळणारी ही ओवाळणी राज्यातील बहिणींना दरमहा मिळत राहणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले. माझी ताई कष्ट करते, शेतात राबते याची आम्हाला जाणीव आहे. अशा कष्टकरी बहीणींसाठी ही योजना सुरू करण्यात आली असून, आतापर्यंत राज्यात एक कोटी बहिणींच्या खात्यात तीन हजार कोटी रुपये जमा झाले आहेत.

### बहिणींना लखपती करायचेय्

समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी सरकार प्रयत्नशील आहे. महिला बचत गट, कौशल्य विकास व अन्य योजनांच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. विविध उद्योगांच्या माध्यमातून त्यांना ताकत द्यायची आहे. आमची बहीण लखपती झालेली पाहायची आहे. महिलांना आत्मनिर्भर करतानाच त्यांचा आत्मसन्मानही वाढवायचा आहे. ही योजना महिलाना आत्मनिर्भर बनविणारी योजना आहे, असेही शिंदे यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### बिटरगाव येथे आरोग्य शिबिराचे आयोजन

**करमाळा, दि. १८ ऑगस्ट-**

कर्जत-जामखेड मतदारसंघाचे आमदार रोहित पवार व करमाळा तालुक्याचे माजी आमदार नारायण आबा पाटील यांच्या वाढदिवसानिमि बिटरगांव (वांगी) येथे राष्ट्रवादी काँग्रेस युवक (शरदचंद्र पवार) पक्षातर्फे जिल्हा युवा उपाध्यक्ष दिगंबर राखुंडे यांनी महाआरोग्य शिबिराचे आयोजिन केले होते. शिबिराचे उद्घाटन सरपंच पै. पृथ्वीराज पाटील, गुरुवर्य रामभाऊ निंबाळकर यांच्या हस्ते झाले. शिबिरात रक्त, लघवी, नेत्ररोग, महिलांचे संपूर्ण आरोग्य तपासणी व मोफत औषधे व चष्मा वाटप करण्यात आले. हजारो ग्रामस्थांनी याचा लाभ घेतला, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपस्थित राहुन मोफत जनावरांना लसीकरण केले. यावेळी हिराजी खरात, तात्या मामा सरडे, हभप अनिरुद्ध निंबाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) युवक जिल्हा उपाध्यक्ष दिगंबर राखुंडे, नागेश बोरकर, सतिश राखुंडे, गौरव राखुंडे, किरण बोरकर ,महादेव केवारे, महेश नलवडे, लक्ष्मण मंगवडे, आप्पासाहेब जानभारे, नाना सरडे, संतोष शिळके, रघुराज सरडे, मोनु निंबाळकर, गोविंद सरडे, नारायण बसळे इत्यादी ग्रामस्थ उपस्थित होते त्याच बरोबर वांगी १, वांगी ४, वांगी ३, भिवरवाढी, ढोकरी गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.



### माऊली स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात

**बार्शी, दि. १८ ऑगस्ट-**

येथील दत्तनगरमधील माऊली प्री इंग्लिश स्कूलमध्ये ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विजूदादा खूने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून नंदकुमार गरड उपस्थित होते. कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रा.विजयसिंह पाटील, सचिव अर्चना पाटील, शिक्षक व पालक उपस्थित होते.



### उत्कर्ष विद्यालयात कथाकथन स्पर्धा

**सांगोला, दि. १८ ऑगस्ट-**

उत्कर्ष प्राथमिक व माध्यमिक विद्यालयामध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त कथाकथन व वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाल्या. अंतिम फेरीसाठी परीक्षक म्हणून माजी प्राचार्य भीमाशंकर पैलवान व माजी मुख्याध्यापक अरविंद डोंबे लाभले होते. कथाकथन स्पर्धेमध्ये इयत्ता पाचवीमधून प्रथम जान्हवी शिर्के द्वितीय मनस्वी कुलकर्णी,तृतीय श्रुती बनकर, सहावी मधून प्रेम हागरे प्रथम,रिध्दी ढोले द्वितीय,दुर्वा खंदारे तृतीय, सातवी मधून स्नेहल जानकर प्रथम,शुभदा वांगीकर द्वितीय,सई बाबर तृतीय क्रमांक प्राप्त केला. वक्तृत्व स्पर्धेत इयत्ता आठवी मधून कार्तिकी जगताप प्रथम, केदार जोशी द्वितीय, ज्ञानेश्वरी भाकरे तृतीय,नववी मधून ओम पडळकर प्रथम,दहावी मधून रेणुका दिवटे प्रथम, वैष्णवी राऊत द्वितीय,सिद्धी दिवटे तृतीय क्रमांक मिळवला. यशस्वी विद्यार्थ्यांचे माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानच्या अध्यक्षा डॉ.संजीवनी केळकर,मुख्याध्यापक सुनील कुलकर्णी,पर्यवेक्षक प्रशांत भोसले,मुक्तानंद मिसाळ यांनी अभिनंदन केले. स्पर्धेचे नियोजन स्पर्धा विभाग प्रमुख शुभांगी कवठेकर, रेखा भिंगार्डे यांनी केले होते.



### जेऊरवाडी जि.प. शाळेत दप्तर वाटप

**अक्कलकोट दि.१८ ऑगस्ट**

स्वातंत्र्य दिनानिमित्त मौजे जेऊरवाडी येथे जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना कै. वालु रामू राठोड यांच्या स्मरणार्थ शालेय व्यवस्थापन अध्यक्ष श्रीदेवी नामदेव राठोड व नामदेव खिरू राठोड यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना दप्तर वाटप केले. कार्यक्रमास जेऊरवाडी गावचे तंटामुक्त अध्यक्ष श्रीमंत राठोड, सरपंच कमळाबाई राठोड, उपसरपंच वृषाली भालेराव, ग्रा. पं. सदस्य रोहित भालेराव, सीताबाई चव्हाण, माझी सरपंच नंदराम चव्हाण, संजय जाधव प्रकाश चव्हाण, रवी पवार, अक्षय राठोड, विकास पवार, अशोक राठोड, प्रताप चव्हाण, अंगणवाडी सेविका, मतदनीस शिक्षक त्रिभुवन जाधव, प्रिया घाडगे उपस्थित होते.

## बोरामणी विनंती बस थांब्याचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी येथे मा. पंचायत समिती सदस्य धनेश आचलारे आणि बोरामणी ग्रामस्थांच्या प्रयत्नातून विनंती बस थांब्याचा शुभारंभ सोलापूर एसटी महामंडळाचे वाहतूक नियंत्रक नागेश रामपुरे आणि सुनिल भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

बोरामणी येथे एसटी बस थांबा नसल्याने बोरामणी ग्रामस्थांसह नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत होती. ही अडचण लक्षात घेऊन माजी पंचायत समिती सदस्य धनेश आचलारे यांनी सोलापूर एसटी आगार प्रमुखांना विनंती एसटी बस थांबा होण्याबाबत निवेदन दिले होते. त्या निवेदनाची तात्काळ दखल घेत सोलापूर एसटी महामंडळाने बोरामणी बस थांब्याला तात्काळ परवानगी दिली. त्या निमित्ताने बोरामणी विनंती बस थांब्याचा शुभारंभ आज रविवारी करण्यात आला. बोरामणी येथे विनंती बस थांबा झाल्यामुळे बोरामणी ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.



विनंती बस थांब्यासाठी बनवण्यात आलेल्या दोन बोर्डपैकी एक बोर्ड माजी पंचायत समिती सदस्य धनेश आचलारे आणि दुसरे बोर्ड माजी सरपंच राजकुमार हालसगे यांनी स्वखर्चातून बनवले आहे. यावेळी यावेळी मा.पं. स. सदस्य धनेश आचलारे यांच्यासह माजी सरपंच राजकुमार हलसगे, चन्नवीर मटगे, रफीक मजावर, सोसायटी चेअरमन भारत कवडे, वजीर मुजावर, आप्पा हलसगे, मा. सरपंच माणिक ननवरे, उपसरपंच संजय माळी, शाम भोसले, राज साळुंखे, अंकुश राठोड, राजकुमार हुकीरे, विश्वनाथ हेबळे, तेरे नाम, योगीनाथ करके, राजकुमार वाघमारे, विकास भोसले, दिलीप जेवळे, योगीनाथ करके,व्यंकप्पा पवार, शोएब पटेल, मारुती वाघमारे, नितीन मोहिते, नागनाथ विभूते, अबू भगरे, नन्नू नदाफ, विश्वनाथ स्वामी, चंद्रकांत जेवळे आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### साईनाथ गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी चव्हाण; सचिवपदी निंबाळकर

**सांगोला, दि. १८ ऑगस्ट-**

शहरातील मणेरी गल्ली येथील साईनाथ गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी लखन चव्हाण,उपाध्यक्षपदी युवराज महिमकर,सचिवपदी यल्लाप्पा निंबाळकर,खजिनदारपदी फैयाज मणेरी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

यावेळी मंडळाचे मार्गदर्शक सिकंदर मणेरी, हनुमंत चव्हाण, युवराज निंबाळकर,अमजद मणेरी, संग्राम काळे, इम्तियाज मणेरी, पप्पू तांबोळी, शहीद मणेरी, सोनू काळे, सिताराम महिमकर, धनंजय हिरेमठ,कुमार हिरेमठ, चंद्रशेखर हिरेमठ, संतोष महिमकर, राजू अकबर मणेरी, राजू मणेरी, सोहेल मणेरी,सैफ मणेरी, अरबाज मणेरी, ऋषिकेश चव्हाण, गोटू हिरेमठ, संग्राम चव्हाण, करण चव्हाण, शंभू चव्हाण उपस्थित होते.



## न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थांची सेंद्रिय फळभाज्या, गांडूळ खत प्रकल्पास क्षेत्रभेट

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १८ ऑगस्ट-**

न्यू.इंग्लिश स्कूल करकंब येथील इयत्ता १०वीतील विद्यार्थांची १दिवसीय क्षेत्रभेट आयोजीत करण्यात आली होती.संबंधित विद्यार्थांनी आदित्य गुळमे यांच्या नर्सरी, गांडूळ खत, सेंद्रिय फळभाज्या,पालेभाज्या प्रकल्पास भेट देऊन या सर्व प्रकल्पांचे अभ्यासपूर्ण निरीक्षण करत विविध शंकांचे निरसन करून घेतले.

यावेळी आदित्य गुळमे यांचे वडील गणेश गुळमे यांनी रासायनिक खतामुळे आपल्या जमिनीची जी धूप झालेली असते ती धूप गांडूळ खत कमी करते त्याचा फायदा आपणास पिकांमध्ये होतो,जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते,त्यामुळे आपली जमीन नेहमी थंड,हिरवीगार व सुपीक राहते,गांडूळ खतामुळे जमिनीची पाणी शोषून घेण्याची,पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढल्यामुळे १५ ते २०टक्के पाण्याची बचत होते. जमिनीचा पोत सुधारतो अशी माहिती या गांडूळ प्रकल्पाविषयी दिली. विदयार्थ्यांना गुळमे परिवाराकडून अल्पोपहार देण्यात आला. या क्षेत्रभेटीत उपस्थीत असलेल्या न्यू इंग्लिश स्कूलच्या पर्यवेक्षिका शिंदे, अशोक खपाले, भिसे यांनीही या प्रकल्पाविष्यी माहिती जाणून घेतली.

### श्रावणमास प्रवचनमाला - १२

## अंत:करणातील वृत्ती निर्विकार होणे म्हणजे भक्ती होय

**● डॉ. जयवंत बोधले महाराज ●**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ ऑगस्ट-**

माझ्या वडिलांची मिरासी गा देवा म्हटल्याप्रमाणे संतश्रेष्ठ श्रीएकनाथ महाराज आता गोकुळाष्टमीच्या उत्सवानंतर पैठणहून पंढरपूरच्या वारीला जाण्यासाठी निघतात. विठ्ठलभेटीची ओढ त्यांना आता लागलेली आहे. भानुदासांच्या वंशात चालत आलेली पंढरीची वारी नाथबाबा मोठ्या आवडीने सांभाळत आहेत. परमार्थ करताना प्रपंच कसा गोड होऊ शकतो, हे संत एकनाथ महाराजांच्या चरित्रातून वाखाणण्याजोगे आहे, असे पूज्य डॉ. जयवंत महाराज बोधले प्रवचनमालेच्या १२ व्या दिवशी आपल्या अभ्यासपूर्ण वाणीतून संत एकनाथ महाराज चरित्र व तत्त्वज्ञान या विषयावर निरुपण करताना सांगतात. पती-पत्नीमधील विचार कसा असावा? हे नाथांच्या चरित्रातून कळते.

**करावे कीर्तन।**
**मुखी गावे हरिचे गुण।।**

नाथ महाराज कीर्तन करताना हरिनामाचा महती वर्णन करत आहेत. नाथ महाराज बोलतात-

**कीर्तनी स्वधर्म वाढे ।**
**कीर्तनी स्वधर्म जोडे ।**
**कीर्तनी परब्रह्म आकुडे ।**

एवढी कीर्तन नावाची भक्ती श्रेष्ठ आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हीच खरी भक्तीची अंगे असून प्रपंच यावर अवलंबून आहे. अंत:करणातील वृत्ती निर्विकार होणे म्हणजे भक्ती होय, ही भक्ती वाढविण्याचे कार्य नाथांनी कीर्तनातून केले आहे, असे डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज यावेळी सांगतात.

कर्म, ज्ञान, योग आणि भक्ती बरोबर सत्कर्म हे पण साधन सांगितले आहे. पण, नाथांनी 'नाम' या साधनाचा वापर केला आहे. इतर साधनांना इतर गोष्टींच्या मर्यादा आहेत. पण, नाम या साधनाला कोणत्याही मर्यादा नाहीत. नाम घेण्यास काहीही लागत नाही. नाम घेण्यास काळवेळही लागत नाही. म्हणून, नाम हे सर्व साधनांचे सार आहे. हे ना, च सर्व साधनांत प्रविष्ठ झाले आहे.

**त्रिगुण हे सार।**
**सारासार विचार हरिपाठ।।**

असार असलेले हे जग आहे. 'भगवंताचे नामस्मरण आणि संतांची संगती ही माणसाला स्थिर करीत असते.' सारातील असार ही माया आहे. नाथांनी भावार्थ रामायण सांगताना, वर्णन असे आले आहे की, सेतूबंधनाचे सामर्थ्य कोणाकडे आहे? हे सामर्थ्य समुद्रात नाही; दगडामध्ये नाही; वानरांमध्ये नाही तर हा सर्व 'रामनामाचा' प्रताप आहे.

**ठायींचे बैसूनी करा एकचित्त।**
**आवडी अनंत आळवावा।**

नाथांनी नानाविध उत्सव साजरे केले, त्यात षष्ठीचा उत्सव अग्रस्थानी सांगितला जातो. 'मुळात षष्ठी ही तिथीला नाथपरंपरेत विशेष स्थान असल्याचे कारणच' असे की, नाथबाबांचे सद्गुरु जनार्दन स्वामींचा अवतार हा षष्ठीला झाला आहे. गुरु दत्तात्रयांचे दर्शन नाथांना षष्ठीला झाले होते. श्रीगुरु दत्तकृपा षष्ठीलाच होय. त्याचबरोबर, जनार्दन स्वामी यांच्या निर्याण दिवसही षष्ठी होय.

## वावडी स्पर्धेत जीवलग मित्र, लहुजी साम्राज्य प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १८ ऑगस्ट-**

निमगाव (ता. माळशिरस) येथील बळीराजा ग्रुपने स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित केलेल्या वावडी स्पर्धेत २० फुटावरील उंचीच्या जीवलग मित्र व लहुजी साम्राज्यने प्रथम क्रमांक मिळवत रोख बक्षीस व प्रशस्तीपत्र मिळवले.

या स्पर्धेसाठी वावडीच्या उंचीवर आधारीत ४ गट केले जातात. या ४ गटात मिळून यावर्षी १८० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. खा. धैर्यशील मोहिते-पाटील, उत्तमराव जानकर, आप्पासाहेब जगदाळे, सिनेअभिनेत्री नेहा भोसले यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. छोटा गट- आदित्य सचिन मगर, नाद कबड्डी व सौरभ कुंभार, श्रेयस वाघमारे, अभिजित मगर बुवा, पै.सुदर्शन मगर व धनराज पवार. दुसरा गट-१ ते ६ फूट : साथ मित्रांची, शंभूराजे मल्हारी मगर, प्रणव खंडागळे, ६५ फाटा संग्राम कोळेकर, लेखणी सम्राट, शंभूराजे मगर, विवेक पोटफोडे, नाना खळवे, श्रीराज मगर, विक्रांत मगर, ओम प्रकाश सुतार. तिसरा गट ६ ते १२ फूट-शैतान ग्रुप, मल्हार ग्रुप, विकी गायकवाड ग्रुप, जाणता राजा ग्रुप, ६५ फाटा सत्यमेव जयते, मुक्या प्राण्यांवर दया करा, शिवशक्ती प्रतिष्ठान, सुभाष तोरणे, यश मगर व जय शिवराय ग्रुप, कुंभार राजे ग्रुप, शिवप्रेमी, एम. बॉईज व नेहरू नगर बॉईज. चौथा गट १२ फुटावरील-जीवलग मित्र, लहुजी साम्राज्य, होलार गल्ली, मैत्री साम्राज्य, शुभम मगर, पोपट कारंडे, सोमनाथ मगर याप्रमाणे विजेत्यांना एक हजार रुपयांपासून दहा हजार रुपयांपर्यंतची प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाचे संयोजक सोलापूर जिल्हा कुस्ती विद्या संघाचे कार्याध्यक्ष दत्ता मगर, त्रिमूर्ती केसरी दत्ता मगर व बळीराजा ग्रुपचे पदाधिकाऱ्यांनी उत्तम नियोजन केले होते.




## पैस जमा झाल्याने लाडक्या बहिणी खुश

### दोन हप्ते एकदम मिळाले; रक्षाबंधनाची ओवाळणी मिळाल्याचा आनंद

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १८ ऑगस्ट-**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे दोन हप्त्यातील तीन हजार रुपये महिलांच्या खात्यात जमा झाल्यामुळे महिला वर्गातून राज्य सरकारविषयी समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्रातील महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजना जाहीर करून प्रत्येक महिन्याला दीड हजार रुपये देण्याचे जाहीर केले होते. शिवाय रक्षाबंधनच्या आधी महिलांच्या खात्यावर दोन हप्त्याचे तीन हजार रूपये रक्कम जमा करण्याचे जाहीर केले. त्याप्रमाणे १५ ऑगस्ट रोजी मंद्रुप परिसरातील हजारो महिलांच्या खात्यावर तीन हजार रुपये जमा झाल्याने महिला वर्गातून राज्य सरकारचे कौतुक करण्यात येत आहे.



अर्थसंकल्पीय अधिवेशनात महायुती सरकारने लाडक्या बहिणींसाठी दरमहा दीड हजार रूपये देण्याचे जाहीर करून रक्षाबंधनाच्या आधी तीन हजार रुपये खात्यावर जमा केले आहेत. महायुती सरकार दिलेला शब्द पूर्ण करणारे सरकार आहे.

**-अप्पासाहेब पाटील, माजी संचालक,**
**कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर**

### दोन हप्त्यांचे तीन हजार रूपये खात्यावर जमा



१५ ऑगष्टला दुपारी माझ्या खात्यावर दोन हप्त्याचे तीन हजार रूपये जमा झाले. महायुती सरकार महिलांच्या सबलीकरणासाठी काम करणारे सरकार आहे.

**-भारती जावळे,**
**लाभार्थी महिला**

## स्व. सुधाकरपंत परिचारकांनी राजकारणात वेगळा ठसा उमटवला

**हभप प्रमोद महाराज जगताप यांचे प्रतिपादन**

**स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यस्मरणानिमित्त उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ ऑगस्ट-**

असावधान माणसाचे राजकारण यशस्वी होत नाही. स्व. सुधाकरपंत परिचारक यांचे जीवन हरिकथा निरूपण, राजकारण आणि सावधपण या त्रिसुत्रीच्या आधारीत होते. पांडुरंगाचे ते सेवक होते. राजकारणात त्यांनी आपला वेगळा ठसा उमटवला, असे प्रतिपादन हभप प्रमोद महाराज जगताप यांनी केले.

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त वाखरी (ता. पंढरपूर) येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना कार्यालय आवारात शनिवार दि. १७ ऑगस्ट रोजी आयोजित कार्यक्रमात जपताप बोलत होते. दरम्यान सकाळी कारखान्याचे चेअरमन प्रशांत परिचारक, व्हा.चेअरमन कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत रक्तदान शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबीरात २१५ जणांनी रक्तदान केले. यामध्ये शेतकरी सभासद, कामगार, पदाधिकारी यांचा समावेश होता. त्यानंतर मान्यवरांकडून स्व.सुधाकरपंत परिचारक यांना आदरांजली वाहण्यात आली.





स्व.सुधाकर पंत परिचारक मालक आपल्यातून जावून चार वर्ष झाली. त्यांच्या अनेक आठवणी हृदयात असून अडचणीत असलेला भीमा सहकारी साखर कारखाना त्यांनी चांगल्या पध्दतीने चालवला अडचणीतून बाहेर काढला. तशा इतर ज्या संस्था अडचणीत होत्या त्या मालकांनी अत्यंत कुशलतेने रूळावर आणल्या म्हणूनच त्यांना सहकारातील डॉक्टर असे म्हणत होते.सोलापूर जिल्ह्यातील राजकारणाला त्यांनी वेगळा आयाम दिला. सहकार तसेच इतर क्षेत्रात मोठे काम केले. पांडुरंग कारखाना तर जिल्ह्यात एक नंबर दर देणारा कारखाना नावारूपाला आणला. आज तालुक्यातील शेतकरी आपला ऊस फक्त पांडुरंग सहकारी लाच देतो.त्यानंतर इतर कारखान्याचा विचार करतो, असे मत सांगोला मतदारसंघाचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, धनश्री परिवाराचे प्रमुख शिवाजीराव काळुंगे, युटोपियन शुगरचे चेअरमन उमेश परिचारक, माजी सभापती वसंतराव देशमुख, मनोहर डोंगरे, पंढरपूर बँकेचे चेअरमन सतीश मुळे, युवा नेते प्रणव परिचारक, रोहन परिचारक, धनराज शिंदे, हरिष गायकवाड, उपसभापती राजूबापू गावडे, बेदाणा विक्री संघाचे चेअरमन सोमनाथ डोंबे, मुन्नागीर गोसावी, जयश्री भोसले उपस्थित होते.

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त तालुक्यातील अनेक गावात त्यांना आदरांजली वाहत विविध समाज उपयोग कार्यक्रम घेण्यात आले होते. यामध्ये रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर, वृक्ष लागवड, शासकीय दाखले गावातच मिळावेत. यासाठी नेत्रतपासणी शिबीर, अन्नदान करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# भारताचे संतुलित परराष्ट्र धोरण

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा सत्तासूत्रे हाती घेतल्यानंतर आणि बदललेल्या जागतिक आर्थिक व राजकीय परिस्थितीनंतर भारताचे परराष्ट्र धोरण कसे राहील, याकडे सर्वांचेच विशेषत: अमेरिका व युरोपीय महासंघाचे लक्ष लागले आहे. खासकरून शेजारच्या बांगलादेशातील सत्तापालट, पाकिस्तान व ड्रॅगनच्या कुरापती, इस्रायल-हमास युद्ध, इराणचा इस्रायलवर होऊ शकणारा संभाव्य हल्ला आणि गेल्या दीड-दोन वर्षांपासून सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध या घडामोडींचे प्रतिबिंब भारताच्या परराष्ट्र धोरणावर पडणार याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. चीन हे भारताचे प्राथमिक धोरणात्मक आव्हान आहे, जे दूर होणार नाही, असे भारताचे चीनमधील माजी राजदूत अशोक कांथा यांचे स्पष्ट मत आहे. चीनसमवेत केवळ सीमा व्यवस्थापन धोरणच नव्हे, तर व्यापार संतुलन, महत्त्वपूर्ण उद्योगांमध्ये चीनवर सातत्याने असलेले भारताचे अवलंबित्व यांचाही विचार केला जातो. यादृष्टीने चीनशी व्यापक स्तरावर चर्चा-संवाद करणे आवश्यक आहे. परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर हे आव्हान कसे हाताळतात, याकडे केवळ आशियातीलच नव्हे तर अमेरिका व युरोपातील मुत्सद्यांचेही लक्ष लागले आहे. कारण नेहमीच दहशतवादी कारवायांना सक्रिय पाठिंबा देणारा पाकिस्तान आणि विस्तारवादी व महत्त्वाकांक्षी चीन यांच्यासोबतचे 'अस्वस्थ' संबंध सुधारणे हे खरोखरच मोठे आव्हान आहे आणि केंद्रातील मोदी सरकार आपला पूर्वानुभव लक्षात घेऊन या संबंधात व्यापक सुधारणा करेल, असे स्पष्ट मत पाकिस्तानमधील भारताचे माजी उच्चायुक्त टीसीए राघवन् यांनी व्यक्त केले. मात्र, म्यानमारमधील अंतर्गत कलहाचा देखील भारताला गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. आणखी एक महत्त्वाची व लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे कुठल्याही देशाच्या आर्थिक, औद्योगिक व लष्करी प्रगतीचे, सामर्थ्याचे आणि प्रबळ आत्मविश्वासाचे प्रतिबिंब त्या देशाच्या परराष्ट्र धोरणात उमटते, ही वस्तुस्थिती आहे. २०१४ मध्ये भाजपाप्रणीत रालोआची राजवट आल्यानंतर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची सत्तासूत्रे हाती घेतल्यानंतर भारताच्या परराष्ट्र धोरणात आमूलाग्र बदल झाला. आज २०२४ नंतर म्हणजे सलग १० वर्षांचा आढावा घेतल्यानंतर भारताचे विद्यमान परराष्ट्र धोरण म्हणजे आक्रमकता, संवाद, समन्वय यांचे सुयोग्य मिश्रण असल्याचे आढळून येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परराष्ट्र धोरण या विषयात लक्ष घातल्यानंतर प्रथमच यात क्रांतिकारी बदल घडून आले आहेत. बदलत्या जागतिक पृष्ठभूमीवर अनेक नवीन प्रवाह भारताच्या परराष्ट्र धोरणात दिसून येत आहेत. याचे कारण म्हणजे भारताचे काही अधिमान्य सामरिक, आर्थिक व अन्य हितसंबंध आहेत. त्यानुसारच परराष्ट्र धोरणाची आखणी होणार, हे आता दिवसेंदिवस स्पष्ट होत आहे. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर गेल्या महिन्यात पंतप्रधानांचा जो यशस्वी रशिया दौरा पार पडला, यामुळे तर भारताच्या परराष्ट्र संबंधाला व धोरणाला नव्याने झळाळी प्राप्त झाली आहे. देशाच्या परराष्ट्र धोरणाला स्वप्नाळूपणा आणि आदर्शवादापेक्षा प्रत्यक्ष वस्तुस्थिती, लवचीकता, परखड वास्तव व व्यावहारिक दृष्टिकोन यांची किनार आहे, हे पंतप्रधानांनी संपूर्ण जगाला दाखवून दिले आहे. परराष्ट्र धोरण हे आपल्या आर्थिक धोरणाचा परिणाम असते, असे अनेक नामवंत मुत्सद्यांचे मत आहे. आज संपूर्ण जगात भारत वेगाने आर्थिक विकास साध्य करीत आहे. भारताची अर्थव्यवस्था वेगाने पुढे जात आहे. २०२१ मध्ये आपण इंग्लंडला मागे सोडून जगातील पाचवी मोठी अर्थव्यवस्था बनलो आहोत. साहजिकच याचे प्रतिबिंब भारताच्या परराष्ट्र धोरणात उमटले आहेत. युक्रेनशी युद्ध सुरू असतानाच रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्याशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यापक चर्चा केली तेव्हा भारताची बाह्य सुरक्षा व लष्करी सामर्थ्य हाच चर्चेचा केंद्रबिंदू असल्याचे स्पष्ट झाले. कारण, त्यानंतर काही दिवसांतच जमिनीवरून हवेत मारा करणारी लांब पल्ल्याची अत्याधुनिक अशी १२० इंटरसेप्टर क्षेपणास्त्रे रशियाकडून भारताला मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. त्यामुळे रशिया आणि भारत यांच्यातील संबंध २१ व्या शतकातील सर्वात प्रगाढ, सुदृढ व निर्णायक संबंधांपैकी एक आहे, असे अनेक आंतरराष्ट्रीय मुत्सद्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे. भारताच्या आंतरिक व बाह्य शक्तीची जाणीव झाल्याने आणि नवीन, आक्रमक व शक्तिशाली भारताला सोबत घेतल्याशिवाय 'साम्राज्यवादी ड्रॅगन'ला टक्कर देणे शक्य नाही, याची परिपूर्ण जाणीव अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांनाही आहे. रशिया-युक्रेन संघर्ष सुरू झाल्यानंतर म्हणजे सुमारे सव्वा वर्षापूर्वीचे भारताच्या परराष्ट्र धोरणाचा एक वेगळा चेहरा जगासमोर आला. भारताचे परराष्ट्र धोरण हे कमालीचे आत्मविश्वासाने भरलेले आहे, याची अनेक उदाहरणे या काळात पुढे आली. भारताने रशिया-युक्रेन यांच्यातील युद्धसंघर्षाबाबत जी भूमिका घेतली त्याबाबत सुरुवातीला युरोपियन देश व अमेरिका यांच्यामध्ये नाराजीचे सूर होते. परंतु, या देशांना भारताचे हितसंबंध यामध्ये कसे गुंतलेले आहेत, हे पटवून देण्यामध्ये भारताला यश आले. त्यामुळे नाराजीचा सूर नंतर संपुष्टात आला. एकूणच नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान म्हणून सत्तासूत्रे हाती घेतल्यानंतर भारतीय परराष्ट्र धोरण हे अत्यंत व्यावसायिकतेने आणि आत्मविश्वासाने भरलेले आहे, हे स्पष्ट होते. आज अमेरिकेने रशियावर असंख्य आर्थिक, राजकीय निर्बंध लादलेले असतानाही भारत रशियाकडून अत्याधुनिक संरक्षण सामुग्री आणि कच्च्या तेलाची मोठ्या प्रमाणात आयात करीत आहे. कारण, भारताचे स्वत:चे काही संरक्षणविषयक व ऊर्जाविषयक हितसंबंध असून राष्ट्रीय दृष्टिकोनातून ते अत्यंत महत्त्वाचे आहेत. भारताला शेजारी देशांकडून असणाऱ्या समस्या गृहीत धरून आणि भारताचे हितसंबंध केंद्रस्थानी ठेवूनच भारत निर्णय घेणार ही बाब केंद्रातील मोदी सरकारने स्पष्टपणे अधोरेखित केली आहे. दुसरे म्हणजे, परराष्ट्र धोरणातील भारताच्या निर्णयस्वातंत्र्यामध्ये पूर्णत: स्वायत्तता आहे. भारताने आग्नेय आशियाई देशांबरोबर संबंध प्रस्थापित करण्यासाठी आखलेल्या 'लूक ईस्ट पॉलिसी'चे नामकरण पंतप्रधान मोदींनी 'ॲक्ट ईस्ट' असे केले आणि या देशांबरोबरचे प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ताकद लावली. त्याचप्रमाणे इस्लामिक देशांशी असलेले संबंध सुधारण्यात त्यांनी व्यक्तिगत पुढाकार घेतला. संयुक्त अरब अमिरात या इस्लामिक देशाबरोबर भारताने मुक्त व्यापार करार केला. इस्लामिक देशांबरोबर संबंध सुधारल्याने रशिया-युक्रेन संघर्ष काळातही भारताला तेलाची टंचाई जाणवली नाही. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे अमेरिका आणि रशियामध्ये समतोल साधणारा भारत हा जगातील एकमेव देश आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ते प्रथमच भारताच्या आर्थिक विकासाशी जोडण्यात आले. मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया, आत्मनिर्भर भारत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी परराष्ट्र धोरण कसे काम करू शकते यासाठी विचार झाला आणि त्याला यश आले. २०२२-२३ मध्ये सर्वाधिक वस्तूंची निर्यात करणारा देश म्हणून भारत पुढे आला आहे. संपूर्ण कोरोना काळात भारताने जगाला लसींचा पुरवठा केला आणि आज आरोग्य सेवा पुरवठादार म्हणून भारत जगातील सर्वात प्रबळ देश म्हणून पुढे आला आहे. भारताच्या या आर्थिक, औद्योगिक विकासामुळे परराष्ट्र धोरणाला बळकटी येत आहे. रशिया, चीन, अमेरिका व युरोप या बलाढ्य व परस्परविरोधी सत्ता केंद्रांमध्ये संतुलन साधण्याचे महत्त्वपूर्ण कार्य भारताच्या या संतुलित व परिपक्व परराष्ट्र धोरणामुळे साध्य होणार आहे.

## दिल्ली दिनांक

# बांगलादेश लष्करी राजवटीकडे...

**रवींद्र दाणी**

नोबेल पारितोषिक विजेते मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली बांगलादेशात एक अस्थायी सरकार स्थापन झाले असले, तरी या साऱ्या घटनाक्रमाचा खरा 'विजेता' बांगलादेश लष्कर ठरण्याची शक्यता आहे. नवे सरकार प्रमुख मोहम्मद युनूस हुशार आहेत. उच्चशिक्षित आहेत. पण, राजकारणी नाहीत. त्यांना बांगलादेशातील स्थिती हाताळणे अवघड जात असल्याचे म्हटले जाते. ढाक्यातील ढाकेश्वरी मंदिराला भेट देत त्यांनी एक योग्य संदेश देण्याचा प्रयत्न केला असला, तरी या देशातील जनतेत तयार झालेला दुरावा इतक्या लवकर सांधला जाईल, याची चिन्हे कमी आहेत.

**अराजकाकडे... :** केवळ शेख हसीना यांना हटवून या देशातील अराजक थांबलेले नाही. देशाच्या मुख्य न्यायाधीशालाही धमकीच्या बळावर राजीनामा देण्यास भाग पाडण्यात आले. आणखी काही न्यायाधीशांना राजीनामा देण्यास भाग पाडले जाईल, अशी एक शक्यता वर्तविली जात आहे. देशात पंतप्रधान नाही आणि प्रधान न्यायाधीश नाही. यात मोहम्मद युनूस कोणते सरकार चालविणार, असा प्रश्न आता विचारला जात आहे.

**हिंसक वळण :** बांगलादेशात अपदस्थ पंतप्रधान शेख हसीना यांच्याबद्दल राग होता, हे मान्य करण्यात आले पाहिजे. तो राग व्यक्त करण्यात आला. नंतर मात्र देशात ठिकठिकाणी असलेल्या, शेख हसीना यांचे पिताजी आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचे एक शिल्पकार शेख मुजीबूर रहेमान यांच्या प्रतिमा कलंकित करण्याचे, त्या तोडण्याचे प्रयत्न सुरू झाले आणि यानंतर स्थानिक जनतेचा रोष व्यक्त झाला. याठिकाणी आंदोलनाला वेगळे वळण लागले. मग, त्यात हिंदू-मुस्लिम हा पैलू आला. लाखो हिंदू रस्त्यांवर उतरले. ही सारी स्थिती हाताळणे मोहम्मद युनूस यांना अवघड जात आहे. नवे हंगामी सरकार किती काळासाठी आहे, याची कुणालाही कल्पना नाही. देशात नव्या निवडणुका घेतल्या जातील, असे युनूस यांनी घोषित केले आहे. पण, त्या केव्हा, त्यांची विश्वसनीयता काय राहणार, हेही कुणाला ठावूक नाही.

**निवडणुकींची निष्पक्षता :** देशात नव्याने निवडणुका झाल्या तरी राजकीय पेचप्रसंग सुटण्याची शक्यता नाही. यात फक्त बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी म्हणजे बीएनपी सामील झाल्यास त्या निवडणुका एकतर्फी राहणार आहेत. देशभरात शेख हसीना यांच्या अवामी लिगच्या नेत्यांवर- कार्यालयांवर हल्ले चढविले जात आहेत. याची प्रतिक्रिया आज ना उद्या उमटणार आहे. यातून एक प्रकारची राजकीय अस्थिरता तयार होण्याची चिन्हे आहेत. जेव्हा कोणत्याही देशात राजकीय अस्थिरता तयार होते, संवैधानिक व्यवस्था कोसळून पडते, तेव्हा तेथे लष्करी सत्ता येण्याची स्थिती तयार होते. हे पाकिस्तानात वारंवार झाले आहे आणि बांगलादेशातही काही प्रसंगी झाले आहे. मात्र, शेख हसीना यांच्या पक्षामुळे या देशात लोकशाही काही प्रमाणात जिवंत राहिली. ती आज धोक्यात आली आहे.

**कठपुतळे सरकार :** बांगलादेशात शेख हसीना यांना राजीनामा द्यावा लागला याचे मुख्य कारण म्हणजे आंदोलनाबाबत लष्कराने घेतलेली मवाळ भूमिका. लोकशाही असलेल्या देशातही गंभीर स्थिती उद्‌भवल्यास ती हाताळण्यासाठी लष्कराची मदत घेतली जाते आणि लष्कर कायदा व सुव्यवस्था स्थापित करण्यासाठी आवश्यक त्या बळाचा वापर करते. याठिकाणी बांगलादेश लष्कराने आंदोलकांना हाताळण्यासाठी काहीच केले नाही. एकप्रकारची मोकळीक आंदोलकांना होती. लष्कराने परिस्थिती नियंत्रणात आणावी, हा शेख हसीना यांचा आदेश झुगारण्यात आला. शेख हसीना यांनी देश सोडण्यापूर्वी एक शेवटचा प्रयत्न म्हणून लष्करप्रमुखांना आपल्या निवासस्थानी पाचारण केले होते. त्यांनी शेख हसीना यांना मदत तर केलीच नाही; उलट देश सोडण्यासाठी तुमच्याजवळ ४५ मिनिटे असल्याचे त्यांना सांगितले. म्हणजे शेख हसीना यांना अटक करून त्यांना तुरुंगात टाकण्यात आले नाही, हीच काय ती लष्करप्रमुखांची मेहेरबानी. लष्करप्रमुखांनी शेख हसीना यांच्यावर केलेली दुसरी मेहेरबानी म्हणजे त्यांना देश सोडून जाण्यासाठी त्यांनी लष्कराचे विमान उपलब्ध करून दिले.

**सूत्रे लष्कराकडेच :** शेख हसीना देशाबाहेर जाऊ शकल्या ते केवळ लष्करामुळे आणि मोहम्मद युनूस हंगामी पंतप्रधान होऊ शकले तेही केवळ लष्करामुळे. लष्कराच्या कृपेने स्थापन झालेले हे सरकार एकप्रकारे लष्कराचे कठपुतळे सरकार आहे. जोपर्यंत लष्कराची इच्छा असेल युनूस सरकारप्रमुख राहतील आणि जेव्हा लष्कराला देशाची सूत्रे आपल्या हाती हवी असतील युनूस यांना बाजूला करून लष्कर आपल्या हाती सूत्रे घेईल□□. म्हणजे भारताच्या शेजारी दुसरे एक पाकिस्तान तयार होईल. पाकिस्तानचे विभाजन होण्यापूर्वी पश्चिम पाकिस्तान व पूर्व पाकिस्तान ही जी स्थिती होती, ती पुन्हा तयार होईल.

**सर्वात मोठी सीमा :** भारताला आज सात देशांच्या सीमा लागून आहेत. त्यात बांगलादेशची सीमा सर्वात मोठी म्हणजे ४००० किलोमीटरची आहे. या सीमेलगत अनेक भागांत नद्या आहेत. त्यातून मोठ्या प्रमाणावर बांगलादेशी घुसखोर भारतात येत असतात. या घुसखोरांसोबतच दहशतवादीही भारतात येऊ लागले तर? त्यांना सहज आश्रय मिळणारी जागा म्हणजे पश्चिम बंगाल. भाषा-रंग-रूप सारेच सारखे. ही एक नवी समस्या भारताला भेडसावू लागू शकते.

**हसीनाला परत पाठवा :** अपदस्थ पंतप्रधान शेख हसीना यांना भारताने बांगलादेशात परत पाठवावे, अशी मागणी बांगलादेशात जोर धरू लागली आहे. यासंदर्भात कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्याचा इशारा दिला जात आहे. भारताने शेख हसीना यांना बांगलादेशात परत न पाठविल्यास त्याचा दोन्ही देशांच्या संबंधावर परिणाम होऊ शकतो, असेही बांगलादेशातून म्हटले जात आहे. भारतासाठी बांगलादेशशी संबंध आणि शेख हसीना यांची सुरक्षा या दोन्ही बाबी महत्त्वाच्या असल्याने यातून मार्ग काढण्याची कसरत भारताला करावी लागणार आहे.

**चीनचाच हात :** शेख हसीना यांनी एक मुलाखत देत आपल्याला हटविण्यामागे अमेरिकेचा हात असल्याचा आरोप लावला आहे. सेंट मार्टिन या लहानशा बेटाचा ताबा अमेरिकेला देण्यास आपण नकार दिला, त्याचा हा परिणाम असल्याचे त्यांनी म्हटले आहे. अमेरिकेने याचा इन्कार केला आहे. हा बांगलादेशचा अंतर्गत मामला असल्याचे अमेरिकेने म्हटले आहे. शेख हसीना यांनी हे प्रतिपादन केले असले, तरी या साऱ्या घटनाक्रमामागे चीनचाच हात असण्याची शक्यता वर्तविली जात आहे. अमेरिका असा मूर्खपणा करणार नाही. भारत वगळता दक्षिण आशियातील सारे देश चीनच्या आहारी गेले असताना, बांगलादेशलाही चीनकडे ढकलण्याची चूक अमेरिका करणार नाही. या भागात अमेरिकेची दारोमदार भारतावर अवलंबून आहे. त्यामुळे भारताला नुकसान होईल, असा निर्णय अमेरिकेकडून घेतला जाण्याची शक्यता फार कमी आहे. या साऱ्यामागे चीनचा हात असल्याचे दिसते. येणाऱ्या काळातील घटनाक्रम या सत्ता बदलातील नाट्यावरचा पडदा हळूहळू दूर करील, असे दिसते. बांगलादेशातील सत्ताबदलात चीनचा हात आहे की पाकिस्तानच्या आएसआयचा, एवढाच प्रश्न बाकी आहे. चीनने आयएसआयला हाताशी धरून हा बदल घडवून आणला असण्याचीही शक्यता आहे. या साऱ्या घटनाक्रमामागे चीन असो वा आयएसआय, भारतासाठी ही मोठी धक्कादायक घटना ठरली आहे.

## वेध

**अनिरुद्ध पांडे**

# यत्र नार्यस्तु पूज्यन्ते...!

काही सण, उत्सव कालांतराने लोप पावतात, तर काहींचे स्वरूप बदलते. नुकतीच झालेली नागपंचमी या अशा सणांपैकी एक आहे. या दिवशी नागांचे रक्षण व्हावे, नाग-साप हा उपयुक्त प्राणी आहे, ही वस्तुस्थिती सर्वांना कळावी म्हणून या सणाची योजना आपल्या पूर्वजांनी केली असावी. या दिवशी कैची, चाकू, विळी असे नागासाठी धोकादायक ठरतील अशी अवजारे कोणत्याही घरात वापरल्याच जात नसत. काही घरांमध्ये कढई, तर काहींमध्ये तवा न वापरण्याची प्रथा होती. या दोन्ही वस्तू न वापरता, तेलही न वापरता स्वयंपाक केला जायचा. शेतातही विळा, नांगरामुळे सर्पहत्या घडू शकत असे म्हणून या दिवशी निंदण, नांगरणी अशी शेतीकामे कटाक्षाने केली जात नसत. यंत्रसामुग्रीमुळे नकळत सर्पहत्येची शक्यता गृहीत धरून बहुतांश कारखाने नागपंचमीची सुटी घेत. वर्तमानपत्रांच्या वर्षभरातील दहा-बाराच सुट्यांपैकी एक नागपंचमीची असायचीच, अगदी आत्ताआत्तापर्यंत. पण परिस्थिती बदलत गेली. सापांविषयी जागृती होत भीती कमी होत गेली. सर्पहत्येतही लक्षणीय घट झाली. गावोगाव 'सर्पमित्र' तयार होऊन ते सापांविषयीचे गैरसमज दूर करू लागले. 'सर्प हा मित्र' हे जसजसे लोकांना पटू लागले तसतसे नागपंचमी सणाचे स्वरूप बदलू लागले. घरातील स्वयंपाक, शेतातील कामे हळूहळू बदलू लागली. तेलाचा वापर सुरू झाला. कापणे, चिरणे दक्षता घेऊन सुरू झाले. आपण काहीच कापकूप करायची नाही, पण दुसऱ्याने, हॉटेलवाल्याने केली तर ती चालून जायला लागली. महत्त्वाचे म्हणजे वर्तमानपत्रांना असलेली नागपंचमीची सुटी बंद झाली.

लोप पावत असलेल्या नागपंचमी सणाप्रमाणे दहाच दिवसांनी पौर्णिमेला येणाऱ्या रक्षाबंधन सणाचे स्वरूप मात्र बदलले नाही. उलट त्याचा उत्सव होऊ लागला. रक्षाबंधन पूर्वीपासूनच भारत देशभर साजरे होते. रक्षाबंधन का, कशासाठी याची तर्कशुद्ध उत्तरे मिळू शकतात, मिळतात. पण त्याची सुरुवात केव्हापासून याची निश्चित माहिती नाही. एक पौराणिक आख्यायिका आहे. पूर्वी देव आणि दानवांच्या युद्धात दानवशक्तीपुढे देवांचे काही चालत नसे. दानवाचा म्हणजेच राक्षसांचा राजा वृत्रासुर याने देवराज इंद्राला युद्धाचे आव्हान दिले. इंद्र आपले वज्र हे शस्त्र घेऊन युद्धास निघाला. त्यावेळी इंद्राला विजय मिळावा म्हणून त्याची पत्नी शची हिने भगवान विष्णूंकडून मिळालेला धागा इंद्राच्या मनगटावर बांधला. हा धागा म्हणजेच 'राखी'. या राखीच्या प्रभावाने इंद्राला या युद्धात विजय मिळेल, अशी शचीची श्रद्धा होती. इंद्राचा विजय झाला. या प्रसंगाची आठवण म्हणून राखी बांधण्याची पद्धत पडली, असे सांगतात. दुसऱ्या एका कथेनुसार महाभारत काळात पांडवपत्नी द्रौपदीने भगवान श्रीकृष्णाच्या मनगटातून वाहणारे रक्त थांबवण्यासाठी आपल्या साडीचा कोपरा फाडून त्याच्या मनगटावर बांधला. यातून त्या दोघांमधील भावा-बहिणीचे नाते अधिक बळकट होऊन श्रीकृष्णाने द्रौपदीच्या रक्षणाचे वचन दिले. एका ऐतिहासिक कथेनुसार, राणा संग याच्या मृत्यूनंतर चितोडचे रक्षण करण्यासाठी राणी कर्मवतीने दिल्लीचा मोगल बादशहा हुमायूनला बंधुप्रेमाची राखी पाठविली. हुमायूननेही त्या राखीचा सन्मान करून बहादूरशहापासून चितोडला वाचवले.

आणखी एक जगज्जेता सिकंदरचीही गोष्ट आहे. तो हिंदुस्थानात आला असता झेलम नदीकिनारी सावित्री नावाची स्त्री राखीची पूजा करून ती जलदेवतेला अर्पण करीत होती. सिकंदरने हे काय आहे, असे कुतूहलाने विचारले. तेव्हा सावित्रीने राखीचे महत्त्व सांगून त्याला राखी बांधली. पुढे सिकंदराने पोरस राजाला हरवून कैद केले. पोरसाची बहीण असलेल्या 'त्या' सावित्रीने सिकंदरला जाऊन राखीची आठवण करून दिली. सिकंदरानेही बहिणीच्या नात्याचा मान ठेवून पोरसाची सुटका करून राज्यही परत दिले. राजस्थानमध्ये रक्षाबंधनाची प्रथा पूर्वीपासूनच होती, पण काही शतकांपासून ती संपूर्ण भारतात आहे. राखी म्हणजे केवळ दोरा नाही. ते स्नेह, माया यांचे प्रतीक आहे. दुभंगलेली मने जोडण्याचे साधन आहे. प्रेम, जिव्हाळा वाढवणारे आहे. राखीचे पवित्र बंधन कर्तव्याची जाणीव करून देते. 'राखी' या शब्दातच रक्षण कर, 'राख' म्हणजे सांभाळ असा संकेत आहे. तो फक्त भाऊ-बहीण नात्यापुरता मर्यादित नाही. कोणत्याही कर्तबगार, शूरवीराने दुर्बल, असहाय, दिव्यांग आणि अबलांचे रक्षण करणे अपेक्षित आहे. यातूनच आजकाल अशा करारी पुरुषाला राखी बांधून त्याच्यावर रक्षणाची जबाबदारी टाकण्यात येते. काही वर्षांपासून बोकाळलेली वृक्षतोड टाळण्यासाठी पर्यावरणप्रेमी वृक्षांना राखी बांधून त्यांचे संरक्षण करण्याचा एक संदेशच या निमित्ताने देत असतात. महत्त्वाचे म्हणजे स्त्री हा केंद्रबिंदू असलेल्या या सणाचा उद्देश स्त्रीला समान हक्क, सन्मानाची वागणूक हाच आहे. जिथे स्त्रीचा मान, सन्मान तेथे देवतांचा वास आणि जिथे नाही तिथे कुठलीही प्रगती नाही, अशा अर्थाचा मनुस्मृतीतील हा श्लोक आजही किती सार्थ आहे बघा..

*यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता: ।*
*यत्रैतास्तु ना पूज्यन्ते सर्वास्तत्राफला: क्रिया: ॥*

९८८१७१७८२९

## कानोसा

# सामाजिक बंधुतेचे रक्षाबंधन

**अमोल पुसदकर**

१९०५ मध्ये इंग्रज सरकारने बंगालचे विभाजन करण्याचा निर्णय घेतला. ज्यावेळेस लोकांनी या वंगभंगाचा विरोध केला त्यावेळेस तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन म्हणाला की, हा कायदा संसदेमध्ये पारित करण्यात आलेला आहे. त्यामुळे बंगालचे विभाजन झालेले आहे. याला आता कोणीही बदलवू शकणार नाही.

परंतु रक्षाबंधनाच्या दिवशी हजारो लोक गंगा नदीच्या किनाऱ्यावर एकत्र आले. त्यांनी वंदे मातरम्च्या घोषणा दिल्या आणि परस्परांना रक्षासूत्र बांधून बंगालचे विभाजन समाप्त करण्यासाठी प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा घेतली. यामुळे संपूर्ण समाज जोडला गेला व तो वंगभंगाच्या विरोधात पेटून उठला. इंग्रजांनी कायदा पारित केला होता परंतु लोक या कायद्याला मानायला तयार नव्हते. इंग्रजांना बंगालचे विभाजन करून दोन भाग करायचे होते. त्यामध्ये एक मुस्लिमबहुल बंगाल व दुसरा हिंदुबहुल बंगाल. हिंदूंनाच काय पण मुसलमानांना सुद्धा ही इंग्रजांची नीती आवडलेली नव्हती. इंग्रजांनी ढाक्याच्या नवाबाला १४ लक्ष रुपये देऊन त्याला आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न केला. ढाक्याच्या नवाबानेसुद्धा मुसलमानांना बंगालचे विभाजन कसे आवश्यक आहे व मुसलमानांच्या फायद्याचे आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु तरीसुद्धा राष्ट्रवादी शक्ती एवढ्या बलवत्तर होत्या की मुसलमानसुद्धा इंग्रजांच्या या नीतीला बळी पडले नाही. ठिकठिकाणी मोर्चे, आंदोलने आणि इंग्रजांचा बहिष्कार सुरू झाला.

यातूनच स्वदेशीचे आंदोलन उभे राहिले. सर्व लोकांनी इंग्रजांच्या वस्तूंचा बहिष्कार केला. इंग्रजांचे कापड, विदेशी वस्तू यांच्यावर बहिष्कार सुरू झाला. समाजातल्या सर्व स्तरातील लोकांनी हा बहिष्कार केला. लग्न लावणारे पुरोहित म्हणू लागले की जर कोणी विदेशी कपडे घालून लग्नाला उभा राहील तर आम्ही लग्नाचा विधी करणार नाही. चप्पल शिवणारा म्हणू लागला की मी विदेशी चपला शिवणार नाही. विदेशी मिठाईचादेखील बहिष्कार करण्यात आला. जनतेने विदेशी वस्तूंची होळी केली. पुण्यामध्ये विदेशी कपड्यांची होळी झाली. लोकांनी हातमागावर विणलेल्या वस्त्रांना प्राधान्य देणे सुरू केले. एकेकाळी मुंबईमध्ये मँचेस्टर कापडाचे चाळीस हजार गठ्ठे एका वर्षात विकले



जायचे. परंतु १९०५-१९०६ या वर्षांमध्ये केवळ चाळीस गठ्ठेच विकले गेले. म्हणून मुंबईच्या व्यापाऱ्यांनी मँचेस्टरला पत्र लिहून ही परिस्थिती कळविली. त्याचा परिणाम असा झाला की इंग्लंड सरकारने भारत सरकारला विचारले की, जर इतका रोष लोकांचा होतो आहे व त्यामुळे आपला व्यापार प्रभावित होतो आहे तर आपण हा निर्णय रद्द का करीत नाही. आणि याचा परिणाम म्हणून पुढे बंगालची फाळणी रद्द झाली. जी गोष्ट नि:शस्त्र जनता बहिष्काराचे तंत्र वापरून करू शकली तीच गोष्ट १९४७ साली मात्र होऊ शकली नाही. ज्या जनतेने बंगालचे विभाजन रोखले ती जनता नेत्यांपुढे हातबल ठरली. इंग्रज मुस्लिम लीग व काँग्रेसचे नेते यांनी देशाच्या विभाजनाला संमती दिली. देशाची जनता विभाजनाच्या बाजूने नव्हती. तरीसुद्धा देशाचे विभाजन झाले. रक्षाबंधनाच्या सणाचा उत्सव लोकांनी एकमेकाला रक्षासूत्र बांधून केला व त्यातून जनसामान्यांमध्ये जागृती झाली. लोक एकत्र आले. रक्षाबंधन सणाचा, उत्सवाचा असा उपयोग पारतंत्र्यात होऊ शकला. आजही हा सामाजिक संदेश आम्ही लोकांपर्यंत पोहोचवू शकतो.

आज बांगलादेशामध्ये हिंदूंवर अत्याचार होत आहेत. या विरुद्ध संपूर्ण समाजाने पेटून उठायला हवे. हिंदूंवर जर अत्याचार झाले तर बांगलादेशाशी व्यापार पुढे करायचा नाही अशा पद्धतीचा निर्णय सुद्धा व्यापारी व जनता घेऊ शकते. याच व्यापाराच्या जोरावर पारतंत्र भारत इंग्रज सरकारला नमवू शकला तर याच व्यापाराच्या जोरावर भारत बांगलादेशला हिंदूंच्या सुरक्षिततेकरिता बाध्य का करू शकणार नाही, याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे.

निवडणुकीच्या काळामध्ये 'संविधान खतरे में है' अशा पद्धतीची घोषणा दिली गेली व विशिष्ट समाजामध्ये एक भयाचे वातावरण निर्माण करण्यात विरोधी पक्ष यशस्वी झाला. परंतु त्याचवेळी असा कुठलाही बदल संविधानामध्ये केला जाणार नाही, असे सांगणारे लोक सुद्धा होते. परंतु विरोधी पक्षांचा आवाज हा मोठा होता, विरोधी पक्षांचे संबंध आणि संपर्क या समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर होते. यातून आपल्या काय लक्षात येईल की ज्या समाजाला सहजासहजी भ्रमित केले जाऊ शकते, त्या समाजामध्ये सुद्धा आमचे चांगले संबंध असणे गरजेचे आहे.

रक्षाबंधन हे निमित्त आहे. या निमित्ताने आपल्या परिसराच्या सभोवताल असणाऱ्या कुठल्यातरी सेवा वस्तीमध्ये आम्ही या सणाच्या निमित्ताने गेलो पाहिजे व त्यांना सुद्धा रक्षासूत्र बांधून ते सुद्धा या राष्ट्राचे एक अंगभूत घटक आहे, ही जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण केली गेली पाहिजे. कारण अशा समाजाचा फायदा आज विरोधी पक्षाने घेतला, उद्या विदेशी शक्ती घेतील हे दोन्ही पण धोके आहेतच. सुदृढ लोकशाहीसाठी हा फार मोठा धोका आहे. त्यामुळे कुठलाही समाज निरक्षर राहणार नाही, सामाजिकदृष्ट्या अस्पृश्य राहणार नाही, समाज म्हणून सर्व लोक एक राहतील याचा प्रयत्न केला पाहिजे. आता विविध समाजांच्या आरक्षणाच्या मागण्यांसाठी समाजांमध्ये आंदोलने उभी केली जात आहेत. त्यातून समाजा-समाजांमध्ये तेढ आणि वाद निर्माण होत आहे. ही परिस्थितीसुद्धा सामाजिक ऐक्यासाठी चांगली नाही. महाराष्ट्राचा बांगलादेश होऊ शकतो, अशा पद्धतीच्या गोष्टी सुद्धा काही पुढारी करताना आपल्याला दिसून येतात. यावरून आपण एवढेच लक्षात घेतले पाहिजे की सामाजिक स्वास्थ्य चांगले नाही, ते बिघडलेले आहे. रक्षाबंधनाच्या निमित्ताने आम्ही प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचून त्याच्याशी सलोख्याचे संबंध निर्माण करण्यासाठी व कोणीही एकटा नाही, कोणीही असुरक्षित नाही, सर्व लोक समाजाच्या पाठिंब्याने सुरक्षित आहे अशा पद्धतीचा संदेश दिला गेला पाहिजे.

९५५२५३५८१३
(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## दुर्दैवी विनेश फोगट

भारताची सुप्रसिद्ध ऑलिम्पिक खेळाडू विनेश फोगटच्या पदक मिळवण्याच्या प्रयत्नांना अपयश आल्याची बातमी वाचनात आली. अर्थात् हे होणारच होते. कोणत्याही क्षेत्राचे काही नियम, मार्गदर्शक तत्त्वे ठरलेली असतात आणि त्याचे पालन करणे हे खेळाडूंसह सर्वांचेच कर्तव्य असते. ऑलिम्पिकसारख्या जागतिक स्पर्धांचे नियम अत्यंत कठोर असणेही ओघानेच आले. त्यात कोणालाही सूट मिळण्याची सुतराम शक्यता नाही. वास्तविक आपले वजन जास्त होते हे खुद्द विनेश फोगटनेही नाकारले नव्हते. त्यामुळे तिने खिलाडूपणा दाखवून या निर्णयाचा सन्मान करायला हवा होता. त्याने तिची शान राहिली असती आणि भारताचीही प्रतिमा उजळली असती. मात्र तसे न करता; तिने ऑलिम्पिक समितीच्या निर्णयालाच आव्हान दिले. भारतातील काही बेजबाबदार राजकारण्यांनी आणि प्रसारमाध्यमांनीही याबाबत थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींनाच जबाबदार धरून आपली वैचारिक दिवाळखोरी जाहीर केली. अत्यंत हीन भाषेत नरेंद्र मोदींचा अपमान केला गेला, बाष्कळ आरोप केले गेले, हास्यास्पद तर्क



लढवले गेले. विनेश फोगटला येनकेनप्रकारेण पदक मिळवून देणे यालाच अवास्तव महत्त्व दिले गेले. जणू काही हा भारताच्या अस्तित्वाचा राष्ट्रीय प्रश्न असल्याचे भासवले गेले. मोदीविरोधी प्रसारमाध्यमांचेही यात फावले आणि त्यांनीही या वाहत्या गंगेत हात धुऊन घेतले. तरीही विनेश दुर्दैवी ठरली. मात्र, आता या निमित्ताने विनेश फोगटला, वेळेचा फायदा उठवून, ही सुवर्णसंधी साधून राजकारणात प्रवेश करायला उत्तम संधी मिळेल यातही शंका नाही. आणि आपले भोळसट आणि भावनाशील मतदार तिला निवडूनही देतील. मेरा भारत महान!!

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८


## वाचक पत्रे

### भरजरी गं पीतांबर दिला फाडून...

रक्षाबंधन अर्थात् राखी पौर्णिमा हा सण बहीण-भावाच्या अतूट प्रेमाचे प्रतीक म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. या सणामुळे बहीण आणि भाऊ यांच्यातील नाते अधिकच घट्ट होते. भावाला राखी बांधत असताना बहिणीच्या मनामध्ये कसा भाव आहे? हे सुद्धा खूप महत्त्वाचे आहे. जेव्हा श्रीकृष्ण त्याच्या सुदर्शनचक्राने शिशुपालाचा वध करतो तेव्हा त्याच्याही बोटाला जखम होते आणि त्याच्या बोटामधून रक्त येते तेव्हा द्रौपदी कोणताही विचार न करता तिच्या भरजरी साडीचा पदर फाडून श्रीकृष्णाला चिंधी बांधते. आपल्या भावाला होणारा त्रास कोणतीही बहीण कदापि सहन करू शकत नाही, त्याच्यावर आलेले संकट दूर करण्यासाठी ती काहीही करू शकते. यासाठीच बहिणीने भावाला राखी बांधत असताना मनामध्ये द्रौपदीसारखा भाव ठेवायला हवा.

**दीपाली गिते**/९८२२००४०५४

## मोबाईलचा वाढता वापर मुलांसाठी घातक



मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे लहान मुले चिडचिड करीत आहेत, त्यांना राग अनावर होत आहे, मोबाईल सतत पाहून त्यांच्या डोळ्यांवर विपरीत परिणाम होत आहेत, मोबाईल व टीव्हीवरील हिंसक मालिकांमुळे मुले ही हिंसक बनत आहेत, जेवणावर त्यांचे लक्ष नाही, डोकेदुखी; डोळेदुखी; कानदुखीसारख्या आजाराला ते बळी पडत आहेत, जेवताना टीव्ही, मोबाईल पाहणे यामुळेत्यांचे व्यवस्थित भोजन करण्याकडे लक्ष नसणे, यामुळे अपचन, पोटदुखीसारखे आजार उद्‌भवत आहेत, मुलांची मानसिकता ढासळत आहे, पालकही मुलांना मोबाईल मोठ्या आवडीने देतात, त्यांनी जेवण करावे म्हणून मोबाईल देणे, रडू नये म्हणून मोबाईल देणे, आपल्याला मुलांनी त्रास देऊ नये म्हणून पालकांनी मुलांना मोबाईल देणे, या बाबी अतिशय गंभीर आहेत. या मोबाईलच्या सततच्या वापराने ही मुले भविष्यात अनेक व्याधींनी ग्रस्त असणार आहेत, त्यांचा स्वभाव आक्रमक होणार आहे, मनासारखे नाही झाले तर ही मुले हिंसकही बनू शकतात, त्यांना आंधळेपणा, बहिरेपणा लवकर येईल यासाठी पालकांनी या मुलांना मोबाईल व टीव्हीपासून दूर ठेवण्याची नितांत गरज आहे. यासाठी आई-वडील, पालकांनी या मुलांशी सकारात्मक संवाद साधावा, त्यांना मोबाईल व टीव्हीच्या दुष्परिणामाची जाणीव करून द्यावी, त्यांच्याशी सुसंवाद साधावा, त्यांना उत्कृष्ट गोष्टींची पुस्तके वाचावयास आणावी, आपण ही काही प्रबोधनप्रद गोष्टी मुलांना सांगाव्यात, त्यांच्याशी संवाद साधावा, त्यांना दररोज फेरफटक्यासाठी १५ ते २० दिवसांतून एकदा ऐतिहासिक स्थळी, धार्मिक स्थळी, काही उद्याने, काही पर्यटन स्थळे येथेही त्यांना घेऊन जावे, त्यांच्या आवडी-निवडी जोपासाव्यात. मुले मोबाईल व टीव्हीपासून सहज दूर जातील, असे वाटते.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### जिल्हा सत्र न्यायाधीश आझमी यांच्या हस्ते गायक मोहंम्मद आयाज यांचा गौरव

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

सोलापूर बार असोसिएशन आयोजित स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभक्ती गीतांवर आधारित ये देश है वीर जवानों का सांस्कृतिक कार्यक्रमाचे चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सोलापूर चे सुपुत्र तथा महाराष्ट्राचे महागायक विजेते मोहंम्मद अयाज यांचा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश माननीय सलमान आझमी साहेब यांच्या हस्ते सन्मान चिन्ह, शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अमित अळंगे, उपाध्यक्ष ॲड. शिंदे, सचिव ॲड. मनोज पामूल, ॲड. निदा सैफन, खजीनदार ॲड. विजयकुमार कटारे व्यासपीठावर उपस्थित होते.




### अँटी रॅगिंग सप्ताहनिमित्त वालचंद महाविद्यालयात व्याख्यान

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

वालचंद कला व शास्त्र महाविद्यालयात अँटी रॅगिंग सप्ताह निमित्ताने फौजदारी कायद्याचे निष्णात वकील बाबासाहेब जाधव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना श्री बाबासाहेब जाधव यांनी रॅगिंग म्हणजे काय? त्यात कोणकोणत्या घटकांचा समावेश होतो. रॅगिंग ही गोष्ट केव्हा कशी सुरू झाली? त्यासंबंधी भारतात व परदेशात वेगवेगळे कायदे केव्हा व कसे करण्यात आले? याचा आढावा जाधव यांनी घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. पी. डी. माळी यांनी महाविद्यालयातील अँटी रॅगिंग समिती कशा पद्धतीने काम करते, तसेच विद्यार्थ्यांनी निर्भय होऊन राहावे. कोणी एखाद्या प्रकारचा त्रास देत असेल तर वेळीच समितीकडे त्याची तक्रार करावी असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी करून दिला. आभार प्रा. डॉ. नागनाथ धायगोडे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ .अंजना सोनवणे यांनी केले.

## निधन वृत्त...



### वसंत कुलकर्णी

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

उमरगा येथील शिवाजी महाविद्यालयात इंग्रजीचे निवृत्त प्राध्यापक वसंत राघवेंद्र कुलकर्णी-कुसूरकर (वय ८७) ह्यांचे पुणे येथे खाजगी रुग्णालयात रविवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, विवाहित दोन मुले, कन्या असा परिवार आहे. सोलापूर जनता सह बँकेतील अधिकारी पूजा कामत ह्यांचे ते वडील होत. डाव्या विचारसरणीचे ते पुरस्कर्ते होते. मागील पिढीतील ज्येष्ठ समाजवादी नेते कै. बाबा कुसूरकर ह्यांचे ते पुतणे होत.



### प्रा. सुभाष स्वामी

**अणदूर, दि. १९ ऑगस्ट-**

बालाघाट महाविद्यालय नळदुर्ग येथील सेवानिवृत्त प्राध्यापक सुभाष विरभद्रय्या स्वामी (वय ७४) यांचे रविवारी (दि.१८) नळदुर्ग येथील, शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज सोमवार (दि.१९) सकाळी १०.३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा,दोन मुली असा परिवार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सहाय्यक सचिव वीरभद्र स्वामी यांचे वडील होत.

# शासनाने पालिकेला ३५ कोटी जीएसटी अनुदान द्यावे

## धर्मवीर सोलापूर शहर- हद्दवाढ कर्मचारी संघटनेचे मुख्यमंत्री, मुख्य सचिवांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

शासनाने सोलापूर महापालिकेला दरमहा २६ कोटीहून वाढवून ३५ कोटी जीएसटी अनुदान द्यावे या मागणीचे निवेदन धर्मवीर सोलापूर शहर- हद्दवाढ कर्मचारी संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्य सचिवांना देण्यात आले.

महापालिका प्रशासन सध्या महापालिकेतील कर्मचाऱ्यांची कोट्यावधी रुपयांची देय रक्कम गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. त्यांच्या टप्प्याटप्प्याने देणे देण्याचा कसोशीने प्रयत्न सुरू आहे पण महापालिकेच्या उत्पन्न आर्थिक स्त्रोत आणि विकास कामे याचा मेळ घालताना वर्षानुवर्षे ही प्रलंबित देणी वाढतच आहे. अशावेळी शासनाकडून महापालिकेला मिळणाऱ्या जीएसटी अनुदानाची रक्कम वाढवून दरमहा ३५ कोटी रुपये इतकी मिळावी अशी आग्रही मागणी संस्थापक अध्यक्ष मल्लिकार्जुन हुणजे यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.



महापालिकेतील कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनासाठी जीएसटी वाढवून मिळाल्यास महापालिका प्रशासनावरील बोजा कमी होणार आहे. तसेच गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या हक्काच्या रकमेसाठी प्रतीक्षेत असलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना देखील यामुळे मोठा दिलासा ठरणार आहे.

सोलापूर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त व सध्या कार्यरत असलेल्या एकूण कर्मचारी संख्या ही ९ हजार ८०० इतकी असून सोलापूर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता देण्यात येत नाही. महाराष्ट्र शासनाच्या सेवकांना सध्या ५० टक्के महागाई भत्ता देण्यात येत आहे पण सोलापूर महापालिकेतील कर्मचाऱ्यांना ३१ टक्के महागाई भत्ता देण्यात येत आहे. सेवानिवृत्त सेवकांचे थकीत रक्कम देण्यासाठी व कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यासाठी जीएसटीच्या माध्यमातून दरम हा २६ कोटी रुपये सोलापूर महानगरपालिकेला राज्य शासनाकडून देण्यात येत आहे. अशावेळी मुख्यमंत्री यांनी महापालिकेतील आर्थिक स्थितीचा आणि महापालिकेतील सेवानिवृत्तसह थकीत रकमा असलेल्या कर्मचाऱ्यांचा विचार करून तसेच सेवकांच्या थकीत रक्कम व पगार देण्यासाठी २६ कोटी ऐवजी जीएसटी अनुदान दरमहा ३५ कोटी मंजूर करून सोलापूर महापालिकेकडे वर्ग करण्याचे आदेश व्हावेत, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी धर्मवीर कर्मचारी संघटना, सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव सुजाता सौनिक यांचा सन्मान देखील करण्यात आला. यावेळी धर्मवीर कर्मचारी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मल्लिकार्जुन हुणजे, मुनाफ इनामदार, पदाधिकारी व कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

# राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्या

- राज्य उत्पादन शुल्कच्या अधिक्षकपदी भाग्यश्री जाधव
- नितीन धार्मिक यांची चंद्रपूरला बदली

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट -**

सोलापूर राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक नितीन धार्मिक यांची चंद्रपूर येथे बदली करण्यात आली असून त्यांच्याजागी बुलढाणा येथील अधिक्षक श्रीमती भाग्यश्री जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आगामी काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील उत्पादन शुल्क विभागातील अधिक्षक ते निरीक्षक पदाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. याबाबतचे आदेश शनिवारी राज्याच्या गृह विभागाचे उपसचिव रविंद्र औटे यांनी काढले आहेत.

राज्यातील ७ अधिक्षकांच्या, ७ उपअधिक्षकांच्या, ५५ निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये सोलापूरचे अधिक्षक नितीन धार्मिक यांची चंद्रपूर येथे, निरीक्षक सुनिल कद यांची नाशिक येथे, माढा येथील रामचंद्र चवरे यांची सोलापूर येथे, अशोक कटकम यांची सोलापूर येथून सांगली येथे, अविनाश घाटगे यांची सोलापूर येथे, दादासाहेब देवकाते यांची बीड येथे बदली करण्यात आली आहे.




**धार्मिक यांच्या कालावधीत सातत्याने महसूल व कारवाईत वाढ**

बदली झालेले अधिक्षक नितीन धार्मिक हे सन २०२१ मध्ये सोलापूर येथे रूजू झाले होते. त्यांच्या कालावधीत दरवर्षी राज्य उत्पादन शुल्क विभागाने सातत्याने दिलेल्या उद्दीष्टापेक्षा जादा महसुल व कारवाईत वाढ केली आहे. सन २०२३-२४ मध्ये दिलेल्या उद्दीष्टांपैकी ११४ टक्के महसुल तर सन २०२४-२५ या कालावधीत आतापर्यंत ४० टक्के जादा महसुल मिळविला आहे. तसेच अनेक सराईत गुन्हेगारांकडून चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. सन २०२३-२४ मध्ये २२४ गुन्हेगारांकडून ९८ लाख ५५ हजारांचे बंधपत्र घेण्यात आले. तसेच गोवा राज्यातील दारूविरुध्द गुन्हे नोंदवून शासनाच्या महसुलाच्या वाढ करण्यात आली.

# सोलापूरच्या विमानसेवेसाठी खा. शिंदेंकडून पाठपुरावा

**विमान वाहतूक मंत्री मोहोळ यांची घेतली भेट**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्ह्यातील बहुचर्चित बोरामणी येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम सुरू करण्यासाठी आणि होटगी रोडवरील विमानतळावरून विमान सेवा सुरू करण्यासंदर्भात खासदार प्रणिती शिंदे यांनी पाठपुरावा सुरू केला आहे. या दोन्ही विमानतळाचे प्रलंबित प्रश्न घेऊन खासदार शिंदे यांनी केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची भेट घेतली आहे. या भेटीत त्यांनी विमानतळाचे काम सुरु करण्यासाठी निवेदन दिले आहे.

विमानतळाच्या प्रश्नासंदर्भात मोहोळ यांची भेट घेऊन दिलेल्या घेतलेल्या निवेदनात प्रणिती शिंदे यांनी म्हंटले आहे की,सोलापूर मधील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम अधिक वेगाने करायला पाहिजे. यासाठी आपल्या अध्यक्षतेखाली एका बैठकीचे नियोजन होणे आवश्यक आहे. यासंदर्भात आपणाकडून सकारात्मक कार्यवाही व्हावी, अशी अपेक्षा खासदार शिंदेंनी व्यक्त केली आहे. खा. शिंदे यांनी दिलेल्या निवेदनाला केंद्रीय विमान वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.



### माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत ठोकळ प्रशालेत विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय येथे माझी शाळा, सुंदर शाळा -२ अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी ग्रंथ प्रदर्शन, राखी मेकिंग कार्यशाळा व पर्यावरण सन संवर्धनावर आधारित टुंग्या हा लघुचित्रपट उपक्रम आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष सचिन ठोकळ, उदघाटक म्हणून मल्हारी बनसोडे, गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती, दक्षिण सोलापूर तर प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पा ठोकळ, मनपा केंद्र शाळा क्र. ४ चे केंद्राध्यक्ष संतोष जाधवर, प्राचार्य डी. डी. गाजरे, टुंग्या या लघुचित्रपटाचे कार्यकारी निर्माते गजानन मुंढे आदी मान्यवर उपस्थित होते. हिरा पवार यांनी विद्यार्थ्यांना पर्यवारण पूरक राखी बनविण्याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध साहित्याचा वापर करून रंगबिरंगे राख्या बनविल्या. कार्यक्रमाच्या उदघाटनाप्रसंगी मल्हारी बनसोडे यांनी विद्यार्थ्यांना महावचन उपक्रमाविषयी माहिती सांगून वाचनाचे महत्व सांगितले. मान्यवरांनी यावेळी शाळेत आयोजित केलेल्या विविध विषयावरील ग्रंथ प्रदर्शनास भेट दिली व या संग्रहबद्दल कौतुक केले. त्यानंतर सुरछाया फिल्म सेंटर प्रस्तुत टुंग्या हा पर्यावरण संरक्षण व झाडे लावा हा संदेश देणारा चित्रपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. कार्यक्रमास प्राचार्य डी. डी. गाजरे यांचे मार्गदर्शन लाभले. आभार यू.एस. पवार यांनी मानले.



### मनपा शिक्षण मंडळात अटल बिहारी वाजपेयी यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महेश वालावलकर, ताहीर कारभारी, सारंग अंजीखाने अविनाश शिंदे अमोल गायकवाड, फैयाज शेख, भालचंद्र साखरे, सायली ढोले आदी उपस्थित होते.

# सार्वजनिक उत्सव, गणेशोत्सव साजरे करण्यासाठी परवानगी घ्यावी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

सार्वजनिक कार्य, उत्सव, गणेशोत्सव व इतर जयंती आणि उत्सव इत्यादी साजरे करण्यासाठी या कार्यालयात नोंदणीकृत नसलेले मंडळ, संस्था, उत्सव, कमिट्या, जनतेकडून देणगी, वर्गणी रूपाने गोळा करीत असतात, सार्वजनिक कार्य, उत्सव करणाऱ्या या संस्था, मंडळे, उत्सव, समित्या यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ४१ क अन्वये धर्मादाय उपआयुक्त कार्यालय, सोलापूर विभाग सोलापूर यांचे कार्यालयात ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात कळविणे बंधनकारक आहे.

याप्रमाणे संबंधितांना ऑनलाईन पध्दतीने तात्पुरती परवानगी मिळू शकेल. आवश्यक तात्पुरती परवानगी न घेतल्यास वर नमूद अधिनियमाच्या कलम ६७ अन्वये गुन्हा ठरतो. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र ४६६ नुसार ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया https://charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज भरण्याची माहिती संकेत स्थळावरील प्रणाली मार्गदर्शक या टॅब च्या अंतर्गत ४१ (क) परवानगी मध्ये सविस्तर उपलब्ध आहे.

# आरोपीला पकडण्यासाठी गेलेल्या पोलिसांना नातेवाईकांकडून धक्काबुक्की

## शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा चौघां विरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ ऑगस्ट-**

एका गुन्हयातील तपासकामी आरोपीला पकडण्यासाठी गेलेल्या पोलिसांवर आरोपीने व त्याचे नातेवाईकांनी धक्काबुक्की करुन हल्ला केल्याची घटना तालुक्यातील लाडोळे येथे घडली. पोकॉ सुखदेव सोमनाथ सलगर यांनी वैराग पोलिसांत फिर्याद दिली आहे.

आरोपी हाप्या शहाजी शिंदे, मनिषा रणजित भोसले, दिपक प्रकाश शिंदे व शिला हाप्या शिंदे या चौघांविरुद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी हाप्या शिंदे हा आरोपी एका गुन्हाच्या तपासकामी येरमाळा पोलिसांना हवा होता. त्यासाठी पोलीस उपनिरीक्षक पी. एस. निंबाळकर, पोकॉ एस. व्ही. कदम हे वैराग पोकॉ सलगर यांना घेऊन लाडोळे येथे गेले असता आरोपी हाप्या शिंदे पानटपरीत दिसून आला.

हाप्याला पोलिसांसोबत येण्यास विनंती केली. त्यावेळी त्याने पोलिसांना शिवागाळी करु लागला व मला घेवुन जाण्याचा प्रयत्न केला तर मी बल्ब फोडुन त्याचे करंटला धरेल असे म्हणाला व त्याने त्याचे



बायकोला फोन करुन बोलावले. मनिषा रणजित भोसले, शिला हाप्या शिंदे व इसम दिपक प्रकाश शिंदे हे तेथे आले व त्यांनी पोसई निंबाळकर यांना मागे ढकलुन दिले व पोकॉ कदम व्हिडीओ घेत असताना त्यांचा मोबाईल शिला शिंदे हिने हातातुन हिसकावून घेतला व खाली टाकुन दिला. त्याचवेळी तेथे आलेल्या मनिषा रणजित भोसले हिने स्वताचे अंगातील कपडे फाडून पोलिसांवर दबाव टाकण्याचे उद्देशाने आरोप करु लागली. पोलिसांना धक्काबुक्की करु लागले. त्यावेळी पोलीस स्वताच्या संरक्षणासाठी निघून जात असताना चौघांनी पोकॉ सलगर यांना पाठलाग करुन पकडले. मात्र तावडीतून सुटका करुन लपून बसले तर थोड्यावेळाने पोलीस ठाणेकडील वाढीव कुमक मागवून घेतली. त्यावेळी सदर चौघे आरोपी पळून गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# उद्यापासून श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सव

**हजारो भाविक होणार सहभागी : तीन दिवस चालणार श्री राघवेंद्र स्वामींची आराधना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

जगद्गुरु श्री मन्मध्वाचार्य मूलमहासंस्थान श्री राघवेंद्र स्वामी मठ मंत्रालय येथील श्री राघवेंद्र स्वामी मठाचे पीठाधिपती श्री श्री १०८ श्री सुबुधेंद्रतीर्थ स्वामीजी यांच्या आज्ञेनुसार तसेच सोलापूर शाखेतर्फे श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सव २० ते २२ ऑगस्ट दरम्यान सोलापूरात होणार आहे. श्री राघवेंद्र स्वामी मठाच्या मुरारजी पेठ आणि काळजापूर मारुती मंदिराजवळील शाखांमध्ये तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

आराधना महोत्सवापूर्वी सोमवार १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० वाजता गोपूजा, ध्वजारोहण, धान्य पूजा, लक्ष्मीपूजा व प्रार्थनोत्सव, स्वस्तिवाचन व महामंगलारतीने महोत्सवातील धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ होईल.



तसेच श्रावण पौर्णिमेनिमित्त सकाळी ८ वाजता मुरारजी पेठ येथील मठात ऋग्वेदी व यजुर्वेदी नित्य- नूतनोपाकर्म होणार आहे. दि. २० ऑगस्ट व बुधवार २१ ऑगस्ट रोजी पहाटे ५.३० वाजता सुप्रभात, सकाळी ६ वाजता निर्माल्य विसर्जन, सकाळी ७.३० वाजता अष्टोत्तर पारायण, सकाळी ८ वाजता पाद्यपूजा, सकाळी ९ वाजता पंचामृत अभिषेक, दुपारी १२ वाजता तुलसी अर्चना व नैवेद्य, हस्तोदक, अलंकार, महामंगलारती व तीर्थप्रसाद. रात्री ८ वाजता पालखी सेवा, रथोत्सव, स्वस्तिवाचन, महामंगलारती व श्रेय प्रार्थना होणार आहे. दिनांक २१ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता मध्याराधना प्रयुक्त लक्ष पुष्पार्चन व तुळशी अर्चना करण्यात येणार आहे. २२ ऑगस्ट रोजी उत्तराधनेने महोत्सवाची सांगता होईल.

या दिवशी पहाटे ५.३० वाजता सुप्रभात, सकाळी ६ वाजता निर्माल्य विसर्जन, सकाळी ७.३० वाजता अष्टोत्तर पारायण, सकाळी ८ वाजता पाद्यपूजा, सकाळी ९ वाजता पंचामृत अभिषेक, सकाळी ११ वाजता महारथोत्सव, तुळशी अर्चना व नैवेद्य, हस्तोदक, अलंकार, महामंगल आरती व तीर्थप्रसाद होणार आहे.

**स्वामीभक्तांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचीही मेजवानी**

श्री राघवेंद्र स्वामींच्या भक्तांसाठी आराधना महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले आहे. राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सव हा जागतिक स्तरावर साजरा होणारा आराधना महोत्सव आहे. दि. १९ रोजी सायंकाळी ५.३० वाजता विदुषी रसिका कुलकर्णी व सहकाऱ्यांचा मराठी भक्तीगीत कार्यक्रम होणार आहे. २० ते २२ ऑगस्टपर्यंत दररोज सकाळी प्रवचन व भजन होईल. तर २० रोजी सायंकाळी ६.३० वाजता गीता हेगडे व इतर सहकारी भक्तीगीत कार्यक्रम सादर करणार आहेत. तर २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६:३० वाजता गायक प्रशांत देशपांडे व सहकाऱ्यांचा भक्तीगीत कार्यक्रम सादर होणार आहे. हे सर्व कार्यक्रम मुरारजी पेठ येथील मठात होणार आहेत.

### भाषेवर प्रभुत्व हेच रोजगार निर्मितीचे साधन : प्रा. बिराजदार

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

हिंदी भाषा साहित्यापुरती मर्यादित न राहता व्यावहारिक भाषा म्हणून प्रयुक्त होत आहे. जागतिकीकरण व तंत्रज्ञानाच्या युगात प्रयोजनमूलक हिंदीचा सर्वाधिक उपयोग होत असून ती अर्थार्जनाचे साधन बनत असल्याचे मत बी. एल. डी. ई. संस्था विजापूरच्या बंगारम्मा सज्जन महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय वेबिनारमध्ये साहित्यिक प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी व्यक्त केले. यावेळी बीजवक्ता म्हणून कर्नाटक राज्य अक्कमहादेवी महिला विद्यापीठाचे हिंदी विभाग प्रमुख डॉ. नामदेव गौडा, सिक्कीम केंद्रीय विद्यापीठाचे डॉ. गोरखनाथ तिवारी, प्राचार्य डॉ. वाय. तमण्णा, हिंदी विभाग प्रमुख डॉ. के. ए. पाटील यांनी देखील आपले विचार व्यक्त केले. डॉ. मीनाक्षी पाटील यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. व्ही. बी. पाटील यांनी आभार मानले.

Classifieds

**वृद्धाश्रमविषयक**

**सोलापुरमध्ये पूर्व भागात वृद्धांना हक्काची जागा, आपुलकी वृद्धाश्रमात प्रवेश देणे आहे. ८६२४०८९१०५ /९४२१८९२०३५**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग

**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात संकलन**

संकलन - अभिलेख कक्ष

दुरध्वनी नं.-०२१८१-२२०२३३ Email-tahakkalkot@gmail.com

जा.क्र.२०२४/अभिलेख/कावि/६४८/२०२४ दि.१२/०८/२०२४

**जाहीर प्रसिध्दीकरण**

प्रति,
श्री. मोहन अंबादास मोरे - अर्जदार
रा. कुरनूर ता. अक्कलकोट
विरुध्द
जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय ग्रामपंचायत, - सामनेवाला
कुरनूर ता अक्कलकोट

ज्याअर्थी, यातील श्री. मोहन अंबादास मोरे यांनी त्याचे आई कै. लोचना अंबादास मोरे यांचा मृत्यू दि. २५/०१/२०१६ रोजी मौजे कुरनूर ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झालेला आहे. परंतू त्यांच्या मृत्यूची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे श्री. मोहन अंबादास मोरे यांनी त्याच्या आईच्या मृत्यूची नोंद करुन घेवून मृत्यू दाखला मिळण्याकामी जन्म-मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ३१/०८/२०२४ अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी त्यांच्या आईच्या यांचे नावे लोचना अंबादास मोरे यांचा मृत्यू दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. १२/०८/२०२४ सिश सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.


शिक्का

सही/-
(विनायक मगर)
तहसीलदार अक्कलकोट

## महत्त्वाचे

### पंजाब किंग्सची प्रीती झिंटा कोर्टात

**चंदीगड** : इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) लिलावापूर्वी पंजाब किंग्स या फ्रॅन्चायझीमध्ये वाद निर्माण झाला आहे. केपीएच ड्रीम क्रिकेट प्रायव्हेट लिमिटेडची सहमालक अभिनेत्री प्रीती झिंटाने कंपनीचे



सहमालक मोहित बर्मन यांच्या विरोधात चंदीगड जिल्हा न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

या याचिकेत प्रीतीने मोहित बर्मनचे ११.५ टक्के शेअर्स इतर कोणालाही विकण्यावर बंदी घालण्याची मागणी केली आहे. या याचिकेवर २० ऑगस्ट रोजी अतिरिक्त सत्र न्यायाधीश संजय संधीर यांच्या न्यायालयात सुनावणी होणार आहे. याचिकेनुसार, मोहित बर्मन हे केपीएच ड्रीम क्रिकेट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत ४८ टक्के समभाग असलेले बहुसंख्य शेअरहोल्डर आहे, तर प्रीती झिंटा व नेस वाडिया यांच्याकडे २३-२३ टक्के हिस्सा आहे. उर्वरित समभाग चौथा भागधारक करण पाल यांचे आहेत. आयपीएलमधील पंजाब किंग्ज हा या कंपनीचा संघ आहे. याचिकेनुसार, प्रीती झिंटाचे म्हणणे आहे की मोहित बर्मन आपले ११.५ टक्के शेअर्स दुसऱ्या पक्षाला विकण्याची धमकी देत आहे. त्यामुळे बर्मन यांना हे विकण्यापासून रोखण्याची मागणी त्यांनी केली आहे. त्यावर न्यायालयाने बर्मन यांना उत्तर देण्यासाठी नोटीस बजावली आहे.

### शमी बंगालकडून रणजी सामना खेळण्याची शक्यता

**कोलकाता** : घोट्याच्या शस्त्रक्रियेनंतर पुनर्वसन करत असलेला वरिष्ठ वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत आपल्या देशांतर्गत संघ बंगालकडून स्पर्धात्मक



क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्याची शक्यता आहे तसेच तो न्यूझीलंडविरुद्धच्या एका कसोटी सामन्यात भारताकडून खेळेल अशी अपेक्षा आहे. बंगालचा पहिला रणजी सामना ११ ऑक्टोबर रोजी उत्तर प्रदेशविरुद्ध व १८ ऑक्टोबर रोजी बिहारविरुद्ध कोलकाता येथे होणार आहे. या दोन सामन्यात केवळ एक-दोन दिवसांचे अंतर असल्यामुळे तो केवळ एका सामन्यात खेळण्याची शक्यता आहे.न्यूझीलंड कसोटी मालिका १९ ऑक्टोबरपासून बंगळुरूमध्ये सुरू होत आहे, त्यानंतर पुणे (२४ ऑक्टोबर) व मुंबई (१ नोव्हेंबर) कसोटी मालिका होणार आहेत. ऑस्ट्रेलियाच्या मोठ्या दौऱ्यात सहभागी होण्यापूर्वी शमीने न्यूझीलंडविरुद्धचा एक सामना खेळण्याची अपेक्षा आहे. ३४ वर्षीय शमीने गत वर्षी अहमदाबाद येथे ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या व-नडे विश्वचषक अंतिम सामन्यात अखेरचा भारताकडून खेळला होता.

### प्रिया मिश्राचे ५ बळी भारत ‘अ’ संघ विजयी

**मॅके** : प्रिया मिश्राने टिपलेल्या ५ बळींच्या जोरावर भारत अ संघाने तिसऱ्या व अंतिम वन-डे क्रिकेट सामन्यात



ऑस्ट्रेलिया अ संघावर १७१ धावांनी दणदणीत विजय नोंदविला. मात्र ही वन-डे मालिका ऑस्ट्रेलिया अ संघाने २-१ ने जिंकली. भारताच्या तेजल हसबनीस व रघवी बिस्टने अर्धशतके झळकावलीत. ब्रिस्बेन येथे तीन टी-२० सामने व दोन वन-डे सामने गमावल्यानंतर भारत अ संघाने तिसऱ्या व अखेरच्या वन-डे सामन्यात यश संपादन केले. प्रथम फलदाजी करत भारत अ संघाने मर्यादित ५० षटकांत ९ बाद २४३ धावा उभारल्या. प्रत्युत्तर देताना ऑस्ट्रेलिया अ संघ २२.१ षटकांत अवघ्या ७२ धावांत गारद झाला. भारताला मोठी धावसंख्या उभारून देताना मधल्या फळीतील फलंदाज तेजलने ६६ चेंडूत ५०, तर रघवीने ६४ चेंडूत ५३ धावांची अर्धशतकी खेळी केली. सलामीवीर किरण नवगिरेने २५, सजीवन सजनाने ४०, तर कर्णधार मिनू मणीने ३४ धावांची भर घातली. या दौऱ्यावरचा आपला पहिलाच सामना खेळताना दिल्लीच्या २० वर्षीय लेगस्पिनर प्रिया मिश्राने अवघ्या १४ धावांच्या मोबदल्यात ऑस्ट्रेलियाचा निम्मा संघ बाद केला, त्यामुळे भारत अ संघाला दिलासादायक विजय मिळाला. मिनू मणीने २ बळी, तर मेघना सिंग, सोपधंदी यशश्री व सायकिया इश्कने प्रत्येकी एक बळी टिपला. ऑस्ट्रेलिया अ संघाकडून सलामीवीर मॅडी डार्क (२२) व टेस फ्लिंटॉफने (२०) सर्वाधिक धावा काढल्या. २२ ऑगस्टपासून गोल्ड कोस्टमध्ये एकमेव अनधिकृत कसोटी सामना खेळला जाणार आहे.

# लढा सुरूच राहील, सत्याचा विजय होईल : विनेश फोगट

◆ **बलाली, १८ ऑगस्ट**

भारतीय कुस्ती महासंघाविरुद्धचा (डब्ल्यूएफआय) आपला लढा सुरूच राहील आणि सत्याचा विजय होईल, असे पॅरिस ऑलिम्पिकमधून परतल्यानंतर कुस्तीपटू विनेश फोगट म्हणाली.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ५० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरी गाठल्यानंतर लढतीपूर्वी तिचे वजन मर्यादेपेक्षा जास्त वाढल्यामुळे तिला अपात्र ठरवण्यात आले. त्यामुळे विनेशची सुवर्णपदकाची संधी हुकली. न्यायालयीन लढाई लढल्यानंतरही तिला किमान रौप्यपदकालाही मुकावे लागले. पदकाचा स्वप्नभंग झाल्यानंतर विनेशचे मायदेशी परतल्यावर शेकडो चाहत्यांनी शनिवारी तिचे इंदिरा गांधी विमानतळावर जल्लोषात स्वागत केले. या जोरदार स्वागतामुळे विनेशही भावुक झाली व तिच्या डोळ्यातून अश्रू निघाले.



दिल्लीच्या विमानतळापासून ते तिच्या बलाली गावापर्यंत विविध २० ठिकाणी तिचे उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात आले. तिला १३५ कि.मी. अंतरावर पोहोचण्यासाठी सुमारे १३ तास लागले. मध्यरात्रीच्या सुमारास ती आपल्या मूळ गावी बलाली येथे पोहोचली आणि गावकऱ्यांनी तिचे भव्य स्वागत केले. घरी पोहोचल्यावर विनेशने थोडीशी विश्रांती घेतली व नंतर संवाद साधला. आमचा लढा संपलेला नाही व लढा सुरूच राहील. सत्याचा विजय होईल अशी मी देवाला प्रार्थना करते, असे विनेश लोकांना संबोधित करताना म्हणाली.

विनेश, बजरंग पुनिया व साक्षी मलिकने डब्ल्यूएफआयचे माजी अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर महिला कुस्तीपटूंच्या लैंगिक छळाचा आरोप केला व त्यांनी अध्यक्षांविरुद्ध जंतर-मंतरवर धरणे आंदोलन केले होते. त्यांनी संसदेच्या नवीन इमारतीकडे कूच करण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांना बाहेर काढण्यात आले. ब्रिजभूषण यांच्याविरोधातील खटल्याची सुनावणी दिल्ली न्यायालयात सुरू आहे. मला माझ्या भारतीयांचे, माझ्या गावातील व माझ्या कुटुंबातील सदस्यांचे प्रेम मिळाल्यामुळे ही जखम भरून काढण्यासाठी व जीवनात पुढे जाण्यासाठी मला थोडे धैर्य मिळेल, असे २९ वर्षीय विनेश म्हणाली.

ऑलिम्पिक पदक गमावणे ही माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी जखम आहे. ही जखम भरून येण्यास किती वेळ लागेल हे मला माहीत नाही. मी कुस्ती खेळणार की नाही हे मला माहीत नाही पण आज ज्या प्रकारची हिंमत मिळाली आहे, मला ते योग्य दिशेने वापरायचे आहे, असेही ती म्हणाली. ◂(वृत्तसंस्था)

# विनेशला पडला काकांचा विसर

## गीता, बबिता नाराज

◆ **नवी दिल्ली, १८ ऑगस्ट**

‘विनेश, काकाला विसरलीस?’ असे समाजमाध्यमावर पोस्ट करत विनेशच्या चुलत बहिणी गीता आणि बबिता फोगटने जाहीरपणे आपली नाराजी व्यक्त केली.

कुस्तीपटू विनेश फोगटच्या बालपणातील स्वप्नांपासून ते ऑलिम्पिकमधील स्वप्नभंगापर्यंतच्या तिच्या प्रवासाची माहिती देणाऱ्या समाजमाध्यमातील एका पोस्टने अनपेक्षित वळण घेतले. एकीकडे पॅरिस ऑलिम्पिकमधील स्वप्नभंगानंतर विनेश मायदेशी परतली, तेव्हा तिचे सर्वांनी कौतुकाने स्वागत केले व तिच्या धैर्याची प्रशंसा केली.

तिनेही देशाचे, गावातील लोकांचे आभार मानले, परंतु सर्वांचे आभार मानताना विनेशने तिचे काका प्रतिष्ठित कुस्ती प्रशिक्षक महावीर फोगट यांचा साधा उल्लेखही केला नाही. कुस्तीपटू गीता व बबिता या महावीर फोगट यांच्या कन्या आहेत, विनेशची कारकीर्द घडविण्यातही



गीता, बबिता, विनेश, प्रियंका, रितू या मुलींनी जिंकलेल्या पदकांसह महावीर फोगट (संग्रहित छायाचित्र)

महावीर यांनीच महत्त्वाची भूमिका बजावली होती. विनेशने तिला वाढण्यास मदत करणारी सपोर्ट सिस्टीम याबद्दल आभार मानले, मात्र आपल्या काकांचा उल्लेख केला नाही.

त्यामुळे गीता आणि बबिता या दोन्ही कुशल कुस्तीपटूंनी समाजमाध्यावर टीका व टोकदार टिप्पणी करून आपली नाराजी व्यक्त केली. ◂(वृत्तसंस्था)

# नेमबाजी महासंघाच्या निवड धोरणावर जसपाल राणाची टीका

◆ **नवी दिल्ली, १८ ऑगस्ट**

दुहेरी ऑलिम्पिक-पदक विजेती युवा नेमबाज मनू भाकरचे प्रशिक्षक जसपाल राणा यांनी राष्ट्रीय नेमबाजी महासंघाच्या (एनआरएआय) सतत बदलणाऱ्या ऑलिम्पिक निवड धोरणावर टीका केली आहे.

एनआरएआयच्या निवड धोरणामुळे काही सर्वात आशावादी प्रतिभावान खेळाडूंना त्रास झाला, हे धोरण असेच कायम राहिले, तर पुढे आणखी नुकसान होईल व युवा खेळाडूंना पुढे जाण्यासाठी त्रासदायक ठरेल, अशी टीका तीन आशियाड सुवर्णपदके जिंकणारा दिग्गज नेमबाज जसपाल राणा यांनी केले. त्यांनी शेवटच्या क्षणी निवड धोरणात बदल करण्याच्या महासंघाच्या प्रवृत्तीवर आणि खेळाडूंना सोय उपलब्ध करून देण्यास नकार देण्याच्या प्रवृत्तीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.



१० मीटर एअर पिस्तूल व १० मीटर एअर पिस्तूल मिश्र संघात (सरबज्योत सिंगसोबत) कांस्यपदक जिंकणाऱ्या मनू भाकर हिच्यासोबत वृत्तसंस्थेशी संवाद साधताना राणा यांनी ही निरीक्षणे नोंदवली.

राष्ट्रीय नेमबाजी महासंघाचे निवड धोरण दर सहा महिन्यांनी बदलते. मी क्रीडामंत्र्यांची भेट घेतली आणि त्यांना नेमबाजी महासंघाकडून निश्चित निवड धोरण ठरविण्याची विनंती केली होती. महासंघाने ठरवलेले धोरण योग्य की अयोग्य, आम्ही त्यावर चर्चा करत नाही. त्यामुळे नेमबाजांच्या कामगिरीवर परिणाम दिसतो, असेही ते म्हणाले.

महासंघाच्या निवड धोरणामुळे टोकियो ऑलिम्पिकमध्ये १० मीटर एअर पिस्तूलची अंतिम फेरी गाठणारा एकमेव नेमबाज सौरभ चौधरी व आशियाड क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक पिस्तूल नेमबाज जितू राय यांसारखे अनेक प्रतिभावान नेमबाज काही वर्षांतच लुप्त झाले. त्यांच्याकडून ऑलिम्पिकपदकाची आशा होती, परंतु निवड प्रणालीने त्यांना व इतर नेमबाजांना अपयशी ठरवले, याकडेही जसपाल राणाने लक्ष वेधले. ◂(वृत्तसंस्था)



चेस्टर येथे लीग चषक फुटबॉल स्पर्धेतील चुरशीच्या सामन्यात माझाटलान एफसीच्या आंद्रे ब्लेक (उजवीकडे) व फॅकुंडो अल्माडा (५) यांना हुलकावणी देत गोल नोंदविण्याच्या प्रयत्नात फिलाडेल्फिया युनियनचा जॅक इलियट (३)

# राजश्री नगाले व चंदू राठोड अव्वल

## महसूल पंधरवड्यानिमित्त महामॅरेथॉन रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १८ ऑगस्ट-**

महसूल पंधरवड्यानिमित्त महामॅरेथॉन रॅलीमध्ये राजश्री नगाले व चंदू राठोड यांनी अव्वल स्थान पटकाविले.



महसूल पंधरवड्यानिमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर व राज्य आपत्ती व्यवस्थापन विभाग यांच्या वतीने राज्यात उद्भवणाऱ्या विविध आपत्ती संदर्भात जनजागृती करण्यासाठी महामॅरेथॉन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही रॅली श्री सिद्धेश्वर वनविहार ते विनायक सांस्कृतिक भवनपर्यंत आयोजित करण्यात आली होती. या रॅलीला आज सकाळी महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, एनसीसी विभागाचे मेजर ठाकूर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, होमगार्ड विभागाचे इंगळे तसेच राज्य क्रीडा मार्गदर्शक,जिल्हा क्रीडा कार्यालय गणेश पवार, सुनील पवार उपस्थित होते. या महा रॅली मॅरेथॉन मध्ये दयानंद कॉलेज, वालचंद कॉलेजचे विद्यार्थी तसेच होमगार्ड विभाग, अग्निशामक विभाग आणि क्रीडा विभागाने सहभाग नोंदवला होता. ही महा मॅरेथॉन रॅली वन विभागाचे श्री सिद्धेश्वर वनविहार ते विनायक सांस्कृतिक भवन या दरम्यान आयोजित करण्यात आली होती. महा मॅरेथॉन रॅली समारोप प्रसंगी उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी रॅलीमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी या मॅरेथॉन रॅलीचे आयोजन करण्यात येते, अशावेळी माणसाचे मन आणि शरीर नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी तंदुरुस्त आणि खंबीर असायला हवे. तसेच त्यांनी या रॅलीमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे आणि विद्यार्थिनींचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

यशस्वी स्पर्धकांना प्रमाणपत्र, मेडल आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी राज्य क्रीडा मार्गदर्शक गणेश पवार, राजू प्याटी ,सुनील पवार यांनी या महा मॅरेथॉन रॅलीमध्ये पंच म्हणून काम पाहिले.



# अक्कलकोट तालुका कबड्डी स्पर्धेत जगद्गुरु पंचाचार्य प्रशालेस विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ ऑगस्ट**

शालेय तालुका कबड्डी स्पर्धेत गौडगाव बु!! येथील श्री गुरुसिद्ध मल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरु पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेने १९ वर्षांखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकाविले.

काशी विश्वेश्वर हायस्कूल जेऊर येथे झालेल्या या स्पर्धेत अंतिम सामन्यात त्यांनी खेडगी महाविद्यालयाचा २२ गुणांनी पराभव केला. या स्पर्धेत कर्णधार अस्मिता राठोड, तृप्ती कुंभार, ज्योती बंडे, करीना शेख, भाग्यश्री पुजारी, रोशनी चव्हाण, चैत्राली मेत्रे यांनी आक्रमक खेळ केला. यशस्वी संघास विश्वनाथ धानशेट्टी, श्रीशैल सावळतोट, क्रीडा विभाग प्रमुख परमेश्वर व्हसुरे, लक्ष्मीपुत्र देशेट्टी, महेश स्वामी, काशिनाथ धानशेट्टी यांचे मार्गदर्शन लाभले.

संघाचे संस्थेचे विश्वस्त शिवाचार्यरत्न श्री. ष. ब्र. डॉ. जय सिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी, संस्थेचे सर्व पदाधिकारी, गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबळे, प्राचार्य कल्याणी देशेट्टी, पर्यवेक्षक लाडाप्पा शिंदे, केंद्रप्रमुख भीमाशंकर धडके आदींनी अभिनंदन केले.

# पुल्ली प्रशालेच्या भारती माळी हिची विभागीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे झालेल्या शालेय शहर बॉक्सिंग स्पर्धेत १९ वर्षाखालील गटात भू. म. पुल्ली कन्या प्रशाला कनिष्ठ महाविद्यालयाने कामगिरी केली. यातील भारती माळी हिची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

सर्व खेळाडूंना उपप्राचार्य बाळकृष्ण गोटीपामूल व प्रसाद कर्रे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थीनींचे पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष प्रा श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम व शालेय समिती अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली, प्राचार्या गीता सादूल यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. **कामगिरी :** भारती माळी (६९ किलो, प्रथम), श्रावणी जानगवळी (६४ किलो, द्वितीय), सिध्दी खराडे (६० किलो, द्वितीय), लक्ष्मी मुटकिरी (४८ किलो, तृतीय).



# शिवाजी नाईट कॉलेजच्या चौघांची विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

छत्रपती शिवाजी नाईटच्या चौघांची पुणे विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली.श्रीकृष्ण कुस्ती केंद्र येथे झालेल्या शहर स्पर्धेतून त्यांची निवड झाली. या खेळाडूंना उपमहाराष्ट्र केसरी भरत मेकाले, अनुभुले वस्ताद व प्रा सचिन गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष माजी महापौर मनोहर सपाटे, उपाध्यक्ष विनायकराव पाटील, सचिव महेश माने, संचालक महादेव गवळी, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एम. एस. पवार, प्राचार्य सुजाता जुगदार, प्राचार्य मंजुश्री पाटील, प्रा संतोष गवळी यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी :** १९ वर्षे वयोगट : फ्रीस्टाइल : रविराज अनुभुले, ५७ किलो प्रथम).विनय माने (७० किलो, प्रथम), वैभव घंटे (७४ किलो, प्रथम). ग्रीको रोमन : १७ वर्षे खालील : सुजित काळे (११० किलो, प्रथम).

# लोकमंगल प्रशालेची शालेय स्क्वॅश स्पर्धेत कामगिरी



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट**

पार्क मैदानावर झालेल्या शालेय शहर स्क्वॅश स्पर्धेत लोकमंगल प्रशालेच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. सर्व खेळाडूंचा अवंती शिक्षण संस्थेचे सचिव प्रदीप साठे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या खेळाडूंना रतिकांत म्हमाणे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे लोकमंगल समूहाचे अध्यक्ष सुभाष देशमुख, अवंती शिक्षण संस्थेचे सचिव प्रदीप साठे, कार्यकारी संचालक अभयसिंह साठे, मुख्याध्यापिका शुभांगी काशीद अभिनंदन केले.

**कामगिरी :** १४ वर्षे : प्रणाली चव्हाण (तृतीय). १७ वर्षे : प्रेम सुरवसे (तिसरा). १९ वर्षे मुली : संध्या रणदिवे (प्रथम) अस्मिता मोरे (दुसरा), कार्तिकी दळवे (तृतीय). मुले : अनिकेत क्षिरसागर (दुसरा), सिद्धार्थ बल्लारी (पाचवा).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# कुरुहिनशेट्टी समाजाचे कुलदैवत नीलकंठेश्वर रथोत्सव भक्तिभावात

## नाशिक ढोल, वारकरी मंडळाने वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

कुरुहिनशेट्टी समाजाचे कुलदैवत नीलकंठेश्वर यांचा रथोत्सव शनिवारी भक्तिभावात साजरा करण्यात आला. या मिरवणुकीत १०० जणांचे ढोल पथक तसेच वारकरी संप्रदायाचे दर्शन घडवणारे मंडळ लक्षवेधी ठरले.

रथोत्सवानिमित्त गुरुवार पेठ येथील श्री कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्थेच्या नीलकंठेश्वर मंदिरात पहाटेपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. 'श्री'स गणपा फंडच्यावतीने अभिषेक पूजा करण्यात आली. तदनंतर ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष डॉ. कृष्णाहरी मादगुंडी यांच्या हस्ते रुद्राभिषेक व महापूजा करण्यात आली. दरम्यान नीलकंठेश्वर कुरूहिनशेट्टी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व श्री कुरूहिनशेट्टी महिला सेवा संघाच्या मार्गदर्शनाखाली ५०० सुवासिनींची जलकुंभ मिरवणूक दत्तनगर येथील शिवमाहेश्वरी मंदिरापासून काढण्यात आली. पद्मशाली चौक, जोडबसवण्णा चौक, मार्कंडेय चौक, साखरपेठ मार्गे गुरुवार पेठेतील नीलकंठेश्वर मंदिराजवळ मिरवणुकीची सांगता झाली.

### नीलकंठेश्वर मंदिर राजदरबाराचा १८ फुटी देखावा

या मिरवणुकीत २१ मंडळे सहभागी झाली होती. यामध्ये ढोल, लेझीम, नृत्य, शक्तीप्रयोग आदी मंडळांचा समावेश होता. १०० जणांच्या नाशिक ढोल पथकाने शिस्तबद्धपणे कला सादर करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मिरवणुकीत चार देखावे सादर करण्यात आले. यामध्ये नीलकंठेश्वर मंदिर राजदरबाराचा १८ फुटी देखावा सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.



आमदार विजयकुमार देशमुख, माजी आमदार नरसय्या आडम, माझी महापौर शोभा बनशेट्टी, शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, अमर पुदाले, दत्तू पोसा आदी मान्यवरांनी नीलकंठेश्वर मंदिरात येऊन श्रींचे दर्शन घेतले. दुपारी रथ मिरवणुकीचा प्रारंभ मंदिरापासून करण्यात आला. मिरवणुकीत कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्थेचे प्रेसिडेंट नारायण संगा, अध्यक्ष डॉ. कृष्णाहरी मादगुंडी, उपाध्यक्ष ड. सिद्धेश्वर बुगडे, सचिव प्रा.संजय बुगडे, सहसचिव श्रीनिवास गडगी, खजिनदार श्रीनिवास जोगी, ज्ञाती संस्थेच्या शालेय समितीचे अध्यक्ष प्रभाकर गोरंटी, जत्रा कमिटीचे अध्यक्ष राजू काकी, दीपक गणपा, वीरेश गडगी, मोहन कर्रे, महिला मंडळ अध्यक्षा निशा केंचगुंडी, शांता संगा, नागमणी आडकी, शकुंतला नक्की, कलावती बंडा सहभागी झाले होते.

# मंत्रालयामध्ये वकिलांच्या प्रवेशासाठी स्वतंत्र रांग

**अॅड. असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाच्या प्रयत्नांना यश**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट -**

मुंबई येथे मंत्रालयामध्ये वकिलांना लवकर प्रवेश मिळावा यासाठी स्वतंत्र रांग करण्याचा आदेश गृह विभागाचे कक्ष अधिकारी प्रवीण ढिकले यांनी मंत्रालय सुरक्षा विभागाच्या पोलीस उपायुक्तांना दिला आहे. मंत्रालयामध्ये वकिलांच्या प्रवेशासाठी अग्रक्रम असावा किंवा तत्सम व्यवस्था असावी यासाठी मुंबई उच्च न्यायालयातील अॅड. असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया च्या कमिटीने प्रयत्न केले. महाराष्ट्राचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी स्वतः लक्ष घालण्याचे आश्वासन दिल्यामुळे समितीतर्फे त्यांच्याकडे एक रिप्रेझेंटेशन देण्यात आले होते व त्यांच्या मार्फत ते रिप्रेझेंटेशन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही पाठविण्यात आले. त्यानुसार वकिलांना तसेच त्यांच्या लिपिकांना स्वतंत्र रांग करण्याचा निर्णय घेण्यात आला व तो निर्णय महाराष्ट्राचे अधिवक्ता सराफ यांना कळवला. हा निर्णय घेण्यासाठी अॅडवोकेट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाचे अध्यक्ष प्रशांत रेळेकर व इतर पदाधिका-यांनी सतत पाठपुरावा केल्याची माहिती संघटनेचे सदस्य अॅड. विक्रांत फताटे यांनी दिली.

## स्वातंत्र्य दिन विशेष



### करंजकर विद्यालय, बलिदान चौक

बलिदान चौक येथील करंजकर विद्यालयात स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष नीलकंठप्पा कोनापुरे, प्रमुख अतिथी नगरसेवक अमित पाटील, संस्थेच्या सचिवा श्रीमती धानम्मा मद्धली, मुख्याध्यापिका राजश्री तडकासे, पर्यवेक्षक लक्ष्मण पवार, संस्थेचे सदस्य अमित मद्धली, सुशील मद्धली, अरुणा हणमगाव जंगम समाज महिला अध्यक्षा निता स्वामी-ढाळे, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा रोहिणी दहीहंडे, भंडारी उपस्थित होते. यावेळी माजी विद्यार्थी सुमित भूमकर, विनायक व्यवहारे, मनोज शिंदे, ऋषिकेश कबाडे यांच्या ग्रुपच्या वतीने २०० वह्या वाटप करण्यात आले. श्री नीलकंठ निंबाळ यांनी मानवी मनोरे सादर केले. देशभक्तीपर गीत पथनाट्य व वैयक्तिक मनोगताचा कार्यक्रम घेण्यात आला. शाळेला ड्रीम फाउंडेशन यांच्यावतीने राज्यस्तरीय डॉक्टर कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार २०२४ मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. वेशभूषा व अन्य सहभागी विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात आले. सूत्रसंचालन श्रीदेवी यळमेली यांनी केले तर आभार रुद्रमणी स्वामी यांनी मानले. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.



### प्रशासकीय इमारतीमध्ये ध्वजारोहण

भारताच्या ७८ च्या स्वातंत्र्य दिनानिमित्त प्रशासकीय इमारतीमध्ये अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, भूसंपादन अधिकारी संतोष देशमुख, भूसंपादन अधिकारी प्रदीप गायकवाड, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था किरण गायकवाड, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, तहसीलदार समीर यादव, आत्मा प्रकल्प संचालक शितल चव्हाण यांच्यासह प्रशासकीय इमारतीमधील सर्व विभाग प्रमुख, अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रगीत गायन झाल्यानंतर राज्यगीताचे ही गायन झाले.



### विचारक्रांती बहुउद्देशीय सामाजिक संस्था

सिद्धार्थ नगर, लष्कर येथील विचारक्रांती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे स्वातंत्र्य दिनानिमित्त १५ ऑगस्ट रोजी डफरीन हॉस्पिटल येथे जन्म झालेल्या बालकांना बेबी किट गिफ्ट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी डॉ. चिंचोळकर, रेश्मा तलफदार, विद्या मोरे, संगीता गायकवाड, अनिता अकाशे, पैकीकर, मंडल अधिकारी विजय माने, सागर शिरसे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विचारक्रांतीचे संस्थापक सुरज जगधने, राहुल शिवशरण, खजिनदार नागसेन बंगाळे, मनीष शिवशरण, प्रबुद्ध सिद्धगणेश, विवेक चंदनशिवे, वैभव वाघे व हॉस्पिटलच्या स्टाफने सहकार्य केले.



### केएलई स्कूल

के. एल. ई. स्कूलमध्ये ७८ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा झाला. या दिनाचे औचित्य साधून शाळेचे प्राचार्य श्रीयुत सतीश हिरेमठ यांनी एन.सी.सी.ची विशेष मानवंदना स्वीकारली व महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण केले. त्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये तेजस्विनी, पृथ्वीराज व सिया या विद्यार्थ्यांनी आपापले भाषणाद्वारे मत व्यक्त केले. राष्ट्रीय स्तरावर क्रिकेट या खेळासाठी निवड झालेल्या अर्णव ढोले व जे.डब्ल्यू नाइंथ बटालियन सोलापूरच्या वतीने बेस्ट कॅडेट आकांक्षा येमूल हिची आर.डी.सी. म्हणून निवड झाल्याबद्दल दोघांचाही सत्कार करण्यात झाला. यावेळी सर्व विद्यार्थांना खाऊ वाटण्यात आला.

# शिवदारे स्मृती समारोहनिमित्त ३५० विद्यार्थ्यांची दंत तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**



सहकार महर्षी कै.वि.गु. शिवदारे स्मृती समारोह निमित्त कॉलेज ऑफ फार्मसी (पॉली), युनिक इंग्लिश मिडीयम स्कुल सोलापूर आणि पंडीत दिनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय केगांव यांच्या संयुक्त विद्यमाने दंत आरोग्य शिबिरात सुमारे ३५० विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली.

या शिबीराचे उदघाटन पंडीत दिनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालयाचे आधिष्ठाता डॉ. राजेंद्र बिरंगणे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मानसोपचार तज्ञ डॉ. निहार बुरटे , रोटरी क्लब सोलापूर नॉर्थच्या अध्यक्षा जान्हवी माखिजा आदी मान्यवरांची उपस्थिती होती. संस्थेचे विश्वस्त डॉ. सिध्देश्वर वाले, प्रा. भिमाशंकर शेटे, सध्देश्वर सहकारी बँकेचे अध्यक्ष नरेंद्र गंभीरे, कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. आर.वाय. पाटील, डी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. जी. के. कापसे, आर्ट, सायन्स अॅड कॉमर्सचे प्राचार्य डॉ. डी. एस. सुत्रावे, शाळेच्या शैक्षणिक सल्लागार अंजली तिवारी, शाळेच्या सदस्या डॉ. शुभदा उपासे, शाळेच्या मुख्याध्यापिका पुजा बाजपाई, व्हि. जी. शिवदारे ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या श्रुती गायकवाड कै. वि.गु. शिवदारे प्रतिष्ठानचे पदाधिकारी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

शिबिरामध्ये युनिक इंग्लिश मिडीमय स्कुलमधील इयत्ता ५ वी ते १० वी मधील ३५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे दंत आरोग्य तपासणी करण्यात आले. यावेळी डॉ. राजेंद्र बिरंगणे यांनी दातांचे आरोग्य व घ्यावयाची काळजी या विषयी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन खुशी अग्रवाल यांनी केले तर ऐश्वर्या हत्ते यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी. फार्मसीचे डॉ.आर.पी. बिराजदार, जे.बी. कबाडे, डॉ.एस. जे. जायभाये तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



### मिलीटरी कॅन्टीनमध्ये ध्वजारोहन

**सोलापूर :** मिलिटरी कॅन्टीन येथे भारतीय माजी सैनिक संघटनेचे सोलापूर संचालक मंडळाचे कॅप्टन अशोक ढेपे, अंबना माळी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी हवालदार सुधाकर पोळ, हवालदार चंद्रकांत शिंदे, हवालदार काशिनाथ बनसोडे, हवालदार मालिनाथ हनमशेट्टी, संचालिका शोभा बारलेलू उपस्थित होते. प्रारंभी प्रमोद माढे यांनी स्वागत केले. भारतीय माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुणकुमार तळीखेडे, सचिव काकासाहेब काशीद, संचालक राजकुमार जमखंडी यांनी सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

**सोलापूर : विरोधी पक्षनेते व शिवसेना नेते अंबादास दानवे यांचा शिवसेना सोलापूर शहर मध्य व शहर उत्तर मतदार संघातील सर्व पदाधिकारी उपस्थित सत्कार करताना. यावेळी उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर, उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, शहरप्रमुख दत्तात्रय वानकर, महेश धाराशिवकर, दत्तात्रय माने, सुरेश जगताप, बेळमकर, शशिकांत बिराजदार सर्व पदाधिकारी.**






### बुर्ला महाविद्यालयात एक पेड माँ के नाम उपक्रम

**सोलापूर :** ए. आर. बुर्ला महिला वरीष्ठ महाविद्यालयात ७८ व्या स्वांतत्र्य दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी त्या विद्यार्थीनींना मार्गदर्शन करत होत्या. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. टी. एन. शिंदे होते. व्यासपीठावर संस्थेचे विश्वस्त व्यंकटेश आकेन, गणेश गुज्जा आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवराच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. शंकर राजे यांनी केले. सदर कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद कार्यालयीन कर्मचारी व विदयार्थीनीं बहुसंख्येने उपस्थित होत्या.



### देशमुखवस्ती मनपा शाळेत ध्वजारोहण

**सोलापूर :** स्वातंत्र्य दिना निमित्ताने देशमुख वस्ती सोलापूर येथील मनपा प्राथमिक शाळेत स्वतंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शैक्षणिक साहित्य तसेच खाऊ वाटप करण्यात आले. प्रारंभी संस्थेचे चेअरमन अजय सोनी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी एरिया सेक्रेटरी रिशेभ पटोडिया,शशांक कार्वेकर, नीरज पाटील, राहुल सोनी, नितेश सचदेव, पल्लवी सोनी, राशी कार्वेकर, वामिनी तापडिया, धनंजय गोडबोले, सिद्धार्थ गांधी तसेच शाळेचे सर्व पालक तसेच इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक राहुल पाटील यांनी केले तर आभार सत्यनारायण नडिमेटला यांनी मानले. सहशिक्षक येनकीकर, संतोष सुतार यांचे सहकार्य लाभले.



### महावितरण कार्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा

**सोलापूर :** महावितरण शहर ई उपविभाग येथे ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रदीप मोरे साहेब, सुधीर ननवरे, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन सोलापूर मंडळ अध्यक्ष सुनील काळे, निलकंठ कांबळे, आनंद फुलारी, स्वप्निल कोरे, नितीन कोळी, अवधूत जगताप, नागनाथ सासवे, अपेक्षा बहादुरे, चंद्रकला शिंदे व उपविभागातील सर्व स्टाफ उपस्थित होते.

### मोतीबागेत ध्वजवंदन उत्साहात

**पुणे, दि. १८ ऑगस्ट-**

भारतीय संस्कृती संवर्धन संस्था आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कसबा भागाच्या वतीने मोतीबाग येथे स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ प्रवचनकार डॉ. कल्याणी नामजोशी यांनी ध्वजवंदन आणि भारत माता पूजन केले. याप्रसंगी भारतीय संस्कृती संवर्धक संस्थेचे अध्यक्ष राजीव जोशी व कसबा भाग संघचालक अॅड प्रशांत यादव उपस्थित होते. यावे नामजोशी यांनी देशात पुन्हा रामराज्य यावे. धर्म म्हणजे सत्य वचन असून रामराज्याची व्यवस्था म्हणजे प्रजेचे शासन असावे. प्रभू रामचंद्राची प्राणप्रतिष्ठा देशातील भक्तीभावाला जागृत करणारी आणि त्रेतायुगाला पुन्हा प्रस्थापित करणारी ठरली आहे. समाज हेच त्याचे विराटरूप आहे.समाजरूपातच देव जन्म घेत असतो. नागपूरातील रेशीम बाग आणि पुण्यातील मोतीबाग हे काशी - मथुरे प्रमाणेच तीर्थक्षेत्र आहेत असे मत मांडले. यावेळी एकता मासिकाच्या मणिपूर विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेचे परम विशिष्ट सेवा पदक प्राप्त एअर मार्शल प्रदीप बापट (निवृत्त) उपस्थित होते. त्यांनी मणिपूर मधील सद्य परिस्थिती तेथील पर्यटन आणि मणिपूरचे भारतातील विलीनीकरण याविषयी मनोगत व्यक्त केले. भाग संघचालक अॅड.प्रशांत यादव यांनी देशातील स्थिती तसेच बांग्लादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यातील परिस्थितीचे विवेचन केले. सूत्रसंचालन राजीव वाल्हेकर यांनी केले.

# महापारेषणच्या सोलापूर कार्यकारी अभियंत्यांची तडकाफडकी बदली

## जिल्ह्यात प्रलंबित कामे भरपूर असतानाही बदली झाल्याने आश्चर्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

सोलापूर महापारेषण विभागात कार्यरत असलेले कार्यकारी अभियंता नितीन मुदगल यांची आठच महिन्यांपूर्वी सोलापूर येथे बदली झाली होती. परंतु शनिवारी तडकाफडकी त्यांची बदली सोलापुरातून पुणे येथे करण्यात आली आहे. सोलापुरात अनेक महत्वाची कामे प्रलंबित असतानाही मुदगल यांची अचानक बदली झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

सोलापूर जिल्ह्याच्या वीज प्रणालीमध्ये महत्त्वाचा वाटा असणाऱ्या महापारेषण कंपनीचे जिल्ह्यात ३६ उपकेंद्र कार्यरत असून जवळपास ३० हून अधिक अपारंपारिक ऊर्जा निर्मिती उपकेंद्र आहेत. शासनाचे धोरण पाहता सौरऊर्जा निर्मितीमध्ये सोलापूर जिल्हा सद्या अग्रेसर असून या संदर्भातीलही अनेक उपकेंद्रे देखील प्रस्तावित आहेत. या सर्व उपकेंद्रांचे भूसंपादन करणे, उपकेंद्र उभारणे व त्यांची देखभाल करण्यासाठी सोलापूर येथे कार्यकारी अभियंत्यांच्या अधिपत्याखाली नियमित विभागीय कार्यालय आहे. या विभागात कार्यरत असलेले कार्यकारी अभियंता नितीन मुदगल यांची नेमणूक ८ महिन्यांपूर्वी सोलापुरात झाली होती. परंतु तडकाफडकी त्यांची बदली पुणे येथे करण्यात आली. मुदगल यांची विनंती नसतानाही मुख्य अभियंता यांनी त्यांची तडकाफडकी बदली केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. महापारेषण विभागातील अचानक बदल्यांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये उलट सुलट चर्चा सुरू आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील व महापारेषणचे चेअरमन डॉ. संजीव कुमार यांनी याप्रकरणी तात्काळ लक्ष घालून सोलापूर जिल्ह्यास न्याय द्यावा. महापारेषण प्रणाली अधिक सक्षम व मजबूत करण्यासाठी मुख्य अभियंता यांनी लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे. यासंदर्भात पालकमंत्री यांना निवेदन देणार असल्याचेही नागरिक मंचने स्पष्ट केले आहे.



# श्री मार्कंडेय महामुनी मंदिराचे शतकपूर्ती

व

## रक्षाबंधन नारळी पौर्णिमा

रौप्य २५ महोत्सव

श्री मार्कंडेय महामुनी रथोत्सवानिमित्त

हार्दिक शुभेच्छा..!

✻ शुभेच्छुक ✻

स्व. माधवराव चंदुलाल मेंगजी एज्युकेशन ट्रस्ट संचलित

Valentine V circle

## व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडियम स्कुल, सोलापूर

प्लॉट नं. २ व ४, वज्रेश्वरी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर. फोन : ०२१७-२६५३२७६

Pre-Primary



Primary



High School





सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# मृत्युंजय श्री मार्कंडेय महाऋषी पद्मशाली समाज इतिहास

**चिरंजीव रामायण, महाभारत तसेच पुराणांतून या चिरंजीवांच्या कथा वाचायला मिळतात. सप्तचिरंजीवां व्यतिरिक्त अजून एका चिरंजीवाचा उल्लेख केला जातो. शैव आणि वैष्णव या दोन्ही परंपरांमध्ये त्याचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. तो चिरंजीव म्हणजे ऋषी मार्कंडेय. मृकंड अथवा मुकंडू नामक ऋषींनी अपत्यप्राप्ती व्हावी याकरिता घोर शिवारामना केली. प्रसन्न झालेल्या शंकराने अपत्य देऊ केले; परंतु असे सांगितले, की दीर्घायुषी पुत्र असल्यास तो मूर्ख असेल आणि बुद्धिमान पुत्र हवा असेल, तर तो आल्पायुषी होईल. ऋषींनी अल्पायुषी असेल तरी चालेल; परंतु हुशार मुलगा धर्मरक्षक असावा असा वर मागून घेतला. पुढे केवळ सोळा वर्षांचे आयुष्य लापलेल्या पुत्राचा लाभ त्यांना झाला, मृकंडाचा मुलगा म्हणून मार्कंडेय या नावाने तो प्रसिद्ध झाला. वडिलांनी लहानपणीच त्याला अल्पायुषी असल्याची कल्पना दिली आणि शिवाराधना करण्यास सांगितले, त्यानुसार मार्कंडेयाने सर्व काळ शिवपूजनात घालविण्यास प्रारंभ केला. पुढे सोळाव्या वर्षी मृत्युसमय आला असता, यमदूत मार्कंडेयाचे प्राण हरण करण्याकरिता आले. शिवलिंग छातीशी धरून शिवस्मरण करणाऱ्या मार्कंडेयापर्यंत त्यांचे पाश पोहोचेनात. चन्द्रशेखयाटक या नावाने प्रसिद्ध असलेली,**

**चन्द्रशेखर चन्द्रशेखर चन्द्रशेखर पाहि माम्।**
**चन्द्रशेखर चन्द्रशेखर चन्द्रशेखर रक्ष माम् ।।**

अशी शिवस्तुती करण्यात मार्कंडेय मग्न झाला होते. शेवटी यम स्वतः मार्कंडेयासमोर उपस्थित झाला आणि त्याने पाश टाकला, यमाचा पाश मार्कंडेयाबरोबरच शिवलिंगाभोवतीही पडल्याने त्या शिवलिंगातून तत्क्षणी साक्षात शंकर प्रकट झाले आणि त्यांनी यमधर्मास तेथून हाकलून लावले मृत्यूची वेळ टळून गेल्याने आणि शिवभक्तीने प्रसन्न झाल्यामुळे शंकरांनी मार्कंडेयास सप्तकल्पांतापर्यंत आयुष्य बहाल केले; त्यामुळे मार्कंडेय (आठवा) चिरंजीव बनला. पुढे आपले पूर्ण आयुष्य ईश्वराराधनेत व्यतीत करून मार्कंडेय महार्षी महणून प्रसिद्ध झाले. अठरा महापुराण्णापैकी एक पुराण (मार्कंडेय पुराण) त्यांच्या नावे प्रसिद्ध आहे. देवीमाहात्म्य अथवा सप्तशती या नावाने तेरा अध्यायांत विभागलेले सातशे लोकांचे माहात्म्य याच पुराणात येते.

मार्कंडेय ऋषींनी आपल्या तपश्चर्येने विष्णूसही प्रसन्न करून घेतले. विष्णूने त्यांना वर मागण्यास सांगितले असता, मार्कंडेयांनी त्यांना कोणतीही ऐहिक इच्छा नसल्याचे सांगितले. चिरंजीवाला देखील प्रलयापर्यंतचेच आयुष्य मिळत असल्याने, प्रलयामध्ये आपणही नष्ट होणार, याचे भान महर्षींना होते. त्यांनी विष्णूकडे आपल्याला प्रलय पहायला मिळावा, असा वर मागितला. तो विष्णूने आनंदाने दिला. पुढे एकदा आपल्या पर्णकुटीत ध्यान करणाऱ्या मार्कंडेयांना अचानक प्रलयकाळाचा ध्वनी ऐकू आला. ते बाहेर येऊन बघतात, तो सर्वत्र हाहाकार माजला होता. हळूहळू महर्षींची कुटीच नव्हे, तर आसपासची झाडे आणि पर्वतदेखील पाण्याखाली गेले. लवकरच जिकडे पाहावे तिकडे पाणीच पाणी दिसू लागले, महर्षींना अंतकाळ जवळ आल्याची आणि सृष्टी नष्ट झाल्याची जाणीव होऊ लागली. तेवढ्यात त्यांना एक छोटेसे वडाचे पान त्या अथांग पाण्यावर तरंगत येताना दिसले. त्या पानावर, आपल्या पायाचा अंगठा हाताने पकडून तोंडात घालणारे एक अर्भक होते. एवढ्या प्रलयातून इतक्या छोट्याशा पानावर विसावलेले बाळ वाचलेच कसे, या विचाराने महर्षी आश्चर्यचकित झाले आणि त्याच क्षणी विष्णूच बालमुकुन्द रूपात आपल्यासमोर आल्याचा दृष्टांत त्यांना झाला. अतिशय भावविभोर अवस्थेत डोळे मिटून त्या मनोहर दृश्याचे ध्यान करणाऱ्या मार्कंडेयांच्या मुखातून,

**'करारविन्देन पदारविन्दं मुखारविन्दे विनिवेशयन्तम् ।**
**वटस्य पत्रस्य पुटे शयानं बालं मुकुन्दं मनसा स्मरामि ।।'**

हे बालमुकुन्दाष्टक बाहेर पडले. काही वेळाने त्यांनी डोळे उघडून पाहिले असता, आपण आपल्या कुटीतच बसलो असल्याचे ध्यानात आले. ते बाहेर आले, तेव्हा सर्व विश्व पूर्वीप्रमाणेच असल्याचे त्यांनी पाहिले. थोड्या वेळापूर्वी आलेल्या प्रलयाचा कुठे मागमूसही नव्हता. तेव्हा त्यांना साक्षात्कार झाला, की आपल्या प्रिय भक्ताची प्रलय पाहण्याची इच्छा भगवंतांनी नुकतीच पूर्ण केली होती.

पद्मशाली समाजाची उत्पत्ती प्राचीन काळातील असून, या समाजाच्या मूळ उत्पत्तीसंबंधीची माहिती व्यास लिखित' पद्मपुराण' या संस्कृत ग्रंथात दिली आहे. प्राचीन काळी एकदा इंद्रादिदेव व ऋषिमुनी ब्रम्हदेवाकडे



गेले.

विनम्र भक्तिभावाने साष्टांग दंडवत घालून म्हणाले, हे सर्वेश्वर ब्रम्हांडनायका! आपल्या कृपाशीर्वादाने आम्हास काहीच कमी नाही. धन धान्य, अन्न, पाणी, संपत्ती, गोधन, इत्यादींची भरपूर विपुलता आहे. परंतु शरीरावर खडबडीत व जाड वल्कले परिधान करून राहावे लागते. याचा आम्हाला कंटाळा आला आहे. याशिवाय शरीर रक्षणार्थ दुसरे काही नाही. त्यामुळे लज्जारक्षणार्थ वस्त्राची मागणी केली. तसेच विशालनगरचा राजा कालवासुर हा दैत्य फार उन्मत्त झाला असून, तो यज्ञकार्य व धार्मिक विधीत नेहमी विघ्न आणत आहे. तेव्हा त्याचे कायमचे उच्चाटन करावे आणि त्याच्या या विध्वंसक कृत्यापासून आमचे रक्षण करावे. ब्रम्हदेव म्हणाले, पुत्रकामेष्टी यज्ञातून उत्पन्न होणारा अयोनीसंभव युवक दैत्यराज कालवासुराचा वध करेल आणि तुमचे वस्त्रहरण झाल्यामुळे तुमच्या शील व लज्जारक्षणार्थ हाच युवक वस्त्र निर्माण करेल या उपायांमुळे सर्व देवादिदेव व ऋषिमुनींना आनंद झाला. ब्रम्हदेवाने मृत्युंजय मार्कंडेय महामुनीला बोलावून सांगितले की, दैत्यराज कालवासुराला प्राप्त झालेल्या वरदानामुळे त्याचा मृत्यू अयोनीसंभव पुरुषाखेरीज होणार नाही.

तेव्हा आपण पुत्रकामेष्टी यज्ञ करावा. त्यातून जो दिव्य पुरूष उत्पन्न होईल, तो दैत्यराज कालवासुराचा वध करेल आणि वस्त्रनिर्मिती करून, मानव जातीच्या शील व लज्जारक्षणार्थ वस्त्र निर्माण करेल. हा यज्ञ शास्त्रोक्त पद्धतीने विधिपूर्वक पार पाडण्यास फक्त तुम्हीच एक समर्थ ऋषी आहात.

ब्रम्हदेवाच्या आज्ञेवरून मृत्युंजय मार्कंडेय महामुनींनी पुष्पभद्रा नदीच्या तीरावर आपल्या आश्रमाजवळ वैशाख शुद्ध पंचमी दिवशी पुत्रकामेष्टी यज्ञाची तयारी आरंभली. ते ब्रम्हचारी असल्यामुळे मंत्रोच्चारानंतर यज्ञकुंडातून जो धूर निघाला, त्यास आपली पत्नी' धुम्रावती असे मानून त्यांनी यज्ञ केला. यज्ञकुंडातून एक अत्यंत तेजस्वी, सुहास्यवदन, सुंदर तरूण युवक प्रकटला. एका विशिष्ट भावनेने यज्ञकुंडातून उत्पन्न झालेला हा अयोनीसंभव दिव्य युवक म्हणजे भावनाऋषी होय.

तो वेदशास्त्रसंपन्न होता, म्हणून त्याला वेदऋषी किंवा वेदशिरस असेही म्हणतात. मृत्युंजय मार्कंडेय महामुनींनी भावनाऋषीस सदुपदेश व मार्गदर्शन करून, वस्त्र निर्मितीच्या साधनांचा शोध घेण्यासाठी वैकुंठात भगवान विष्णूकडे पाठविले. भावनाऋषी वैकुंठात आले आणि भगवान विष्णूचे दर्शन घेऊन म्हणाले, हे आदिनारायणा। मानव जातीच्या लज्जारक्षणार्थ व कल्याणार्थ तुमच्या अंश रूपाने माझा जन्म झाला आहे. वस्त्र निर्मिती कशी करावी, याचे आपण मार्गदर्शन करावे. भावनाऋषीची ही प्रार्थना ऐकून भगवान विष्णूने वस्त्र निर्मितीचे साधन तयार करण्यासाठी योग्य मार्गदर्शन केले आणि वस्त्रनिर्मितीसाठी आपल्या नाभिकमलातून पद्मनाल (कमळाच्या फुलाचा देठ) घेऊन त्यापासून तंतू काढून वस्त्र निर्मिती करण्यास सांगितले.

एक महान हस्त व्यवसायाची स्थापना करण्याचे श्रेय भावनाऋषी यांना मिळाले हळूहळू वस्त्रनिर्मितीची महती सर्वत्र पसरली. ही गोष्ट विशाल नगरीचा राजा कालवासुर याच्या कानावर गेली असता तो असूयेतेने पेटला. श्री भावनाऋषींना जीवे मारून हातमाग व्यवसाय नष्ट करण्याच्या उद्देशाने मोठ्या सैन्यानिशी धावून आला. लोककल्याणार्थ या कार्यात यश मिळावे म्हणून परमेश्वरास प्रार्थना करून भावनाऋषींनी कालवासुर राक्षसाचे शीरसंधान केले. वस्त्रनिर्मितीचे कार्य पुढे शांततेने अखंड चालू राहिले. भावनाऋषी पृथ्वीतलावर परत आल्यानंतर त्यांनी आपल्या स्वयंस्फूर्तींनी, कौशल्याने व बुद्धिचातुर्याने वस्त्रनिर्मितीचे एक साधन तयार केले. 'हातमाग' हे नाव दिले. विष्णूच्या नाभिकमलातून आणलेल्या पद्मनालातून सूक्ष्म तंतू काढून, त्यापासून हातमागावर वस्त्र निर्मिती केली. हातमागावरील विणकाम कलेद्वारे विविध रंगीत, तलम, मऊ वस्त्रे, शाली तयार केल्या. भावनाऋषी आपल्या शिष्यगणांसह वैकुंठात भगवान विष्णूकडे गेले आणि त्यांनी सोबत नेलेली सुंदर वस्त्रे अर्पण केलीत. भगवान विष्णूने स्वतःसाठी फक्त पिवळ्या रंगाचे वस्त्र म्हणजे 'पितांबर' पसंत केले आणि अंगावर परिधान केले.

तेव्हापासून भगवान श्री विष्णुंना पितांबर वस्त्रधारी म्हटले जातात. भावनाऋषींची स्तुती करून भगवान विष्णूच्या मुखातून सहजोगार निघाले धन्य रे तुम्ही पद्मशाली तेव्हापासून भावनाऋषींना पद्मशाली कुलवंत नामाभिधान प्राप्त झाले. भावनाऋषीचा विवाह सूर्यनारायण कन्या भद्रलक्ष्मी (भद्रावती) देवीशी झाला. भावनाऋषींचा राज्याभिषेक सोहळा अत्यंत थाटामाटाने पार पडला. त्यांना १०१ सुपुत्र झालेत. त्या सर्वांचा विवाह भावनाऋषींनी ब्राम्हणकन्या, ऋषिकन्या व क्षत्रियकन्या यांचेशी दिला. अशाप्रकारे भावनाऋषी व त्यांचे १०१ सुपुत्रांपासून जो वंशविस्तार झाला, त्यापासून पद्मशाली ही जात उदयास आली. हातमागावर विणकरीचा व्यवसाय करणारी पहिली 'जात' म्हणून पद्मशाली ही जात प्राचीन काळी उदयास आली. कालांतराने पद्मशाली या जातीच्या विणकरांनी कापसापासून सूक्ष्मतंतू काढून, हातमागावर सुती वस्त्र विणण्यास सुरुवात केली. हातमाग या यंत्राचा शोध आणि हातमागावर विणकाम करण्याच्या हस्तकला व्यवसायाचा श्रीगणेशा करण्याचे श्रेय भावनाऋषींनाच जाते. खऱ्या अर्थाने ते वस्त्रोद्योगाचे प्रणेते होते.

वंदनीय भावनाऋषी यांनी कमळाच्या तंतूने म्हणजे तयार करून पितांबर वस्त्र तयार करून अर्पण केला तो दिवस म्हणजे नुलु पुन्नमी. (सुत-पोर्णिमा) नारळी पोर्णिमा याच दिवशी श्री भावनाऋषींचा राज्याभिषेक सोहळा होतो. आनंदाचा प्रतिक म्हणून पद्मशाली समाजबांधव मोठ्या उत्साहाने भगवान मार्कंडेय कुलदैवत रथोत्सव मिरवणुक काढतात.

श्री मार्कंडेय देवतेस या दिवशी सकाळपासून रथयात्रेत विणकर हातमागावर वस्त्र विणुन तयार झालेला शाल अर्पण करतात. पद्मशाली समाज हा ऋषी वंश असल्याने श्रावणी कृपा कर्म करावा या हेतुने मंदिरात पहाटे दर्शनासाठी येऊन यज्ञोपवित धारण करतो रक्षाबंधन करून घेतो. ब्राह्मण वंशापेक्षापेक्षा श्रेष्ठ वंश पद्मशाली समाजाचा आहे कारण ऋषी मंत्रांचे द्रष्टा आहेत. ऋषी मंत्र व श्लोक तयार करतात. त्यांचे श्लोक, मंत्रपठण व वाचन ब्राह्मण करतात. म्हणजे ऋचा व संहिता निर्माण करणारे मृत्युंजय श्री मार्कंडेय महाऋषी ऋषी. मार्कंडेय पुराण हे सर्वात प्राचीन पुराणांपैकी एक आहे. हे प्रचलित प्राण मार्कंडेय ऋषींनी कोष्टीला सांगितले होते. यामध्ये ऋग्वेदाप्रमाणेच अग्नि, इंद्र, सूर्य इत्यादी देवतांची चर्चा आहे. भगवतीच्या व्यापक वैभवाची ओळख करून देणाऱ्या या पुराणात दुर्गासप्तशतीची कथा, महात्म्याची कथा, हरिचंद्राची कथा, मदालसा चरित्राची कथा अशा अनेक सुंदर कथांचे तपशीलवार वर्णन आहे. अत्रि-अनुसया, दत्तात्रेय-चरित्र इ. याचे मुख्य कारण म्हणजे १३ अध्यायांमध्ये (८१अ-९२अ) देवी महात्म्याचे प्रतिपादक हा फार मोठा भाग आहे, ज्यामध्ये महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती या देवीच्या तीन रूपांचे वर्णन अतिशय तपशीलवार वर्णन केले आहे.

महिषासुराचा वध केल्यानंतर, आदिशक्तीने ही जागा विश्रांतीसाठी निवडली. अजून एका कथेनुसार मार्कंडेय ऋषींनी देवीची घोर तपःचर्या केली. प्रसन्न झालेल्या देवीने त्यांना येथेच दर्शन दिले. मार्कंडेय ऋषी देवीचे स्तवन करत आहेत आणि अंबिका कानाला हात लावून ते श्रवण करते आहे, अशी गोष्ट येथे रूढ झाली. देवीच्या या झुकलेल्या स्थितीचे वर्णन करताना, तिच्या आरतीत येणाऱ्या ओळी म्हणतात,

**पूर्व मुख अंबे ध्यान जरा वाकडी मान**
**मार्कंडेय देई कान सप्तशतीचे पान**
**एके अंबा, गिरी शृंगा, अंबा गौतमी गंगा**
**जय देवी सप्तशृंगा...**

विशेष म्हणजे जिथे जिथे देवींचे जागृत स्थान आहे आहे तिथे श्री मार्कंडेय ऋषींचे वास्तव्य आहे.

**- संकलक :**
**सत्यनारायण रामय्या गुर्रम, सोलापूर**

## अज्ञात वाहनाच्या धडकेत एक जखमी

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

होम मैदान कडे जाणाऱ्या रस्त्यावरून अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने वाहन चालवून फिर्यादी ज्योती भारत माले (वय-४०,रा.हिरापूर कॉलनी,गव्हर्नमेंट हॉस्पिटल कलबुर्गी, कर्नाटक,सध्या-सोलापूर) यांचे पती भारत माले यांना धडक देऊन गंभीर दुखापत केली व तसेच त्यांना उपचारास दवाखान्यात न घेऊन जाता व घटनेची माहिती पोलीसांना न सांगता अज्ञात वाहनचालक तेथून निघून गेला आहे.ही घटना १७ ऑगस्ट रोजी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास रंगभवन येथे घडली.याप्रकरणी ज्योती माले यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पुढील तपास मपोसई.व्हट्टे या करीत आहेत.

## चोरट्याने खिशातून पाकीट पळवले

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

कर्णिक नगर कडे जात असताना फिर्यादी राजेश पांडुरंग काकडे (वय-४८,रा.मुरारजी पेठ) यांना तहान लागल्याने त्यांनी पोटफाळी चौक येथील चहाच्या टपरीवर गेले असता,अज्ञात चोरट्याने मागून येऊन फिर्यादीच्या मागील खिशातील काळ्या रंगाचे पाकीट घेऊन पळून गेला आहे.ही घटना १७ ऑगस्ट रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास पोटफाळी चौक येथे घडली. याप्रकरणी राजेश काकडे यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मुलाणी हे करीत आहेत.

## दारू पिण्यासाठी पैसे मागण्याच्या कारणावरून मारहाण

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

दारू पिण्यासाठी पैसे मागण्याच्या कारणावरून लाकडी काठीने मारहाण केल्याची घटना १७ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास भवानी पेठ येथे घडली.याप्रकरणी सुवर्ण संतोष सोनवणे (वय-३४,रा.हनुमान नगर,भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून नणंद अर्चना निवृत्ती सोनवणे,सासू लक्ष्मी निवृत्ती सोनवणे,दिर सागर निवृत्ती सोनवणे (सर्व.रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी या माहेरी असताना तिचा पती हा दारू पिण्यासाठी पैसे मागत होता.त्यावेळी फिर्यादी यांनी पैसे नाही असे सांगितले असता,त्याने मारहाण केली.तसेच वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांच्या आईच्या व मावशीच्या उजव्या हातावर लाकडी काठीने मारून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस भोगशेट्टी हे करीत आहेत.

## वास्तुशांतीच्या कार्यक्रमाला गेल्यावर चोऱ्याने केले घर साफ

**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

भावाच्या घराच्या वास्तुशांतीसाठी फिर्यादी अभिषेक उत्तरेश्वर सापते (वय-२९,रा.लोकमंगल विहार,बाळे) हे कुटुंबीयांसह पुणे येथे घराला कुलूप लावून गेले असता,अज्ञात चोरट्याने त्यांच्या घरात प्रवेश करून घराच्या लाकडी कपाटातील चांदीचे दागिने व घराच्या कंपाउंड मध्ये लावलेली दूचाकी चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना १५ ते १७ ऑगस्ट दरम्यान लोकमंगल विहार बाळे येथे घडली.याप्रकरणी अभिषेक सापते यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पाडवी हे करीत आहेत.

## 'लाडकी बहीण' च्या ५ लाख ९५ हजार अर्जांना मंजुरी

**● जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी व त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी पात्र महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ शिवछत्रपती क्रिडा संकुल बालेवाडी, पुणे येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला. याचे थेट प्रक्षेपण हुतात्मा स्मृती मंदिर सोलापूर येथे झाले. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते या योजनेचा लाभ मंजूर झालेल्या महिला लाभार्थ्यांना तसेच या योजनेचे अर्ज भरणारे ऑपरेटर यांना प्रतिनिधिक स्वरूपात सन्मानपत्र देण्यात आले.



यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी आर. बी. काटकर, जिल्हा परिषदेचे महिला बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, विधानसभा क्षेत्र निहाय स्थापन केलेल्या समित्यांचे अध्यक्ष व सदस्य तसेच सोलापूर जिल्ह्यातील सातशे ते आठशे महिला लाभार्थी उपस्थित होत्या.

सोलापूर जिल्ह्यात मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना जाहीर झाल्यापासून ग्रामीण पातळीपर्यंत प्रचार प्रसिद्धी करून ही योजना प्रशासनाने प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहोचवली यामुळे जिल्ह्यात आज रोजी पर्यंत सहा लाख १४ हजार ७०० अर्ज प्राप्त झालेले असून विधानसभा क्षेत्र निहाय समित्यांनी त्यातील ५ लाख ९४ हजार ५८७ अर्ज मंजूर केलेले आहेत. दिनांक १४ ऑगस्ट २०२४ पासून या योजनेत अर्ज मंजूर झालेल्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर थेट दोन महिन्याचे तीन हजार रुपये जमा होण्यास सुरुवात झालेली आहे.

**● तालुका निहाय मंजूर अर्ज :** अक्कलकोट ४५ हजार १४८, बार्शी ५५ हजार ४२१, करमाळा ३३ हजार ६३५, माढा ४३ हजार २४७, माळशिरस ६६ हजार २५४, मंगळवेढा ३४ हजार २५८, मोहोळ ३९ हजार ८४८, उत्तर सोलापूर १लाख ६ हजार ५८१, पंढरपूर ६४ हजार ७८०, सांगोला ४२ हजार ९३० व दक्षिण सोलापूर ६२ हजार ४८५.

**● महिला सक्षमीकरणासाठी या योजनेची गरज :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत १४ ऑगस्ट रोजी माझ्या बँक खात्यावर ३००० रू जमा झाले. याबद्दल मी मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे साहेब व शासनाची खूप-खूप आभारी आहे. माझ्यासारख्या लाखो बहिणीच्या सक्षमीकरणासाठी ही योजना महत्त्वाची आहे. बँक खात्यावर पैसे जमा झाल्याने समाधान आहे.

- भाग्यश्री कोळी, सोलापूर

**● योजना निरंतर चालू राहावी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा दि. ४ जुलै २०२४ रोजी नारीशक्ती दूत ॲपवर ऑनलाईन अर्ज भरला होता. मुख्यमंत्री महोदय दोन महिन्याचे पैसे तुमच्या खात्यावर जमा होतील, असे वारंवार सांगत होते. त्यांचे म्हणणे खरे ठरले व १५ ऑगस्ट रोजी माझ्या खात्यावर दोन महिन्याचे तीन हजार रुपये जमा झाले. त्याचा मला खूप-खूप आनंद झाला आहे. ही योजना अशीच निरंतर सुरू ठेवावी यातून माझ्या कुटुंबाचा खर्च भागवण्यास मला मदत मिळणार आहे.

- **अंजली बसवराज बेंचे**, सोलापूर

## राखीच्या धाग्यात अद्भुत शक्ती : साध्वी प्राचीश्रीजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

राखीच्या धाग्यात अद्भुत शक्ती असते.भावाबहिणीच्या प्रेमाचा हा सण.भावाबहिणीचे नाते परिवारामध्ये स्थैर्य उत्पन्न करते. लहानपणापासून भावाबहिणीचे जिद्द, प्रेम आणि भांडण असतेच. सदैव भावा बहिणीने सुखदुःखात सोबत राहावे असे प्रतिपादन प्रवचन प्रभाविका प्राचीश्रीजी यांनी केले.




बलिदान चौक येथील जैन स्थानकात संघातर्फे सामूहिक रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. साध्वी प्राची श्रीजी, प्रसन्नाजी, प्राप्तीश्रीजी यांच्या दिव्य सानिध्यात रक्षास्तोत्र पठण करत विधीसहित अत्यंत धार्मिक,आध्यात्मिक व प्रसन्न वातावरणात सामूहिक रक्षाबंधन पार पडले.

रक्षाबंधनाचे महत्त्व सांगताना प्राचीश्री जी म्हणाल्या, श्रावण महिन्यातील रक्षाबंधनाचा आजचा हा पवित्र दिवस. भावाबहिणींमध्ये आपलेपणा निर्माण करणारा हा सण. मुलगी सासरी कितीही ऐश्वर्यात राहत असली तरी माहेर हे तिचे आवडते ठिकाण.फक्त नणंद आणि वहिनी यांनी मैत्रिणीसारखे रहावे एवढीच अपेक्षा सगळ्यांची असते.

जीवनात दवा पेक्षा दुवा कामाला येतो. दुवा असेल तर दव्याची गरज पडणार नाही.भाऊ शब्दाचा अर्थ म्हणजे उत्तम, ऊर्जावान व्यक्ती होय.भाऊ म्हणजे प्रकाश,आभा, प्रकाशार्थी शब्द होय.

आज रक्षाबंधनानिमित्त आयोजित गौतमप्रसादीचा लाभ संचेती परिवाराने घेतला.तसेच संचेती रसोई घर व बंब भोजन गृह सोलापूर संघास संचेती व बंब परिवाराकडून समर्पित करण्यात आले. यावेळी संचेती व बंब परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## किरकोळ कारणावरून एकास डोक्यात फळी मारून केले जखमी

**चौघांविरुद्ध गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

मी कधी शिव्या दिलो असे विचारले असता या किरकोळ कारणावरून गालावर चापट मारून फिर्यादीस फळीने डोक्यात मारून जखमी केले.तसेच लाथा बुक्क्याने मारहाण केल्याची घटना १४ ऑगस्ट रोजी दुपारी दोन ते तीन दरम्यान हौसे वस्ती सोलापूर येथे घडली.

याप्रकरणी लक्ष्मण शाहीर कुचेकर (वय-३४, रा- हब्बु वस्ती देगाव नाका, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून नूतन कांबळे, व त्यांच्या बहिणीचे दोन मुले (नाव माहित नाही), भोसले (पूर्ण नाव माहित नाही) अशा चौघाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक हकीकत अशी की, नूतन कांबळे यांनी फोन करून तू मला शिव्या देतोस का असे म्हणाली, त्यावेळी फिर्यादी ने मी कधी शिव्या दिलेत असे म्हणाले असता, तू आमच्या घराकडे ये असे म्हणाले. त्यानंतर फिर्यादी या भेटण्याकरिता



घरी गेले असता तेथील भाडेकरूने सांगितले की, मालकीण तुझ्याच घरी गेले आहेत, चल माझ्या गाडीवर बस असे म्हणून भोसले यांनी फिर्यादीस गाडीवर बसविले व फिर्यादीच्या घराजवळ गेले असता गाडीवरून खाली उतरून मी कधी शिव्या दिले असे विचारले असता,कांबळेनी फिर्यादीच्या गालावर चापट मारत लाकडी फळीने डोक्यात मारून जखमी केले व लाथा बुक्क्याने मारहाण केल्याची घटना घडली आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल परीट करीत आहेत.

## डॉक्टर असल्याचे सांगत ५१ लाखांना फसवले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

डॉक्टर आहे असे सांगून विश्वास संपादन करून वेळोवेळी फिर्यादीच्या घरी येऊन रोख रक्कम व खात्यावरून ट्रान्सफर करून पैसे घेऊन ते पैसे सरकारी योजनेत व रिझर्व बँकेत गुंतवणूक करतो असे सांगून वेळोवेळी ५१ लाख २७ हजार रुपये घेऊन विश्वासघात करून फिर्यादीची आर्थिक फसवणूक केल्याची घटना २०१४ ते २८ जुन २०२४ दरम्यान लक्ष्मी पेठ, देगाव रोड सोलापूर येथे घडली.

याप्रकरणी मीना साताप्पा साबळे (वय-६८,रा- लक्ष्मी पेठ, देगाव रोड) यांच्या फिर्यादीवरून विशाल दत्तात्रय बनसोडे (वय-३६, रा- सावित्रीबाई फुले हाउसिंग सोसायटी, संभाजीनगर, ता- जयसिंगपूर, जिल्हा कोल्हापूर) यांच्याविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव करीत आहेत.

## विनापरवाना प्रवेश करून शासकीय कामात अडथळा; तिघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

शिवीगाळ करत दालनात विनापरवाना प्रवेश करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना १६ ऑगस्ट रोजी सकाळी बारा वाजण्याच्या सुमारास शासकीय तंत्रनिकेतन शांती चौक अक्कलकोट रोड येथे घडली. याप्रकरणी अशोक लक्ष्मी शंकर उपाध्यय (वय-६०,रा.शासकीय तंत्रनिकेतन,शांती चौक,अक्कलकोट रोड) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून संतोष अमृतराव घोडके (अधिव्याख्याता अणुविद्युत),अनिलकुमार शंकरराव कप्पीकोरी, (अधिव्याख्याता यंत्र अभियांत्रिकी) व सारिका गायकवाड, (अधिव्याख्याता रसायनशास्त्र) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

वरील तिघा जणांनी फिर्यादी यांच्या दालनात विनापरवाना प्रवेश करून शासकीय कामात अडथळा निर्माण करत फिर्यादीस व फिर्यादी यांच्या सहकाऱ्यांशी शिवीगाळ केली.तसेच दालनातील दोन विभाग प्रमुखांना धक्काबुक्की करत फिर्यादी यांच्या दालनाबाहेर ओढून घेऊन गेले.अशा प्रकारे शासकीय कामात अडथळा निर्माण करत फिर्यादीस मारहाण करण्याची व बघून घेण्याची धमकी दिली आहे.असे फिर्यादित म्हटले आहे. पुढील तपास पोसई. डेरे हे करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### मंद्रुप परीसरात मघा नक्षत्राचा पाऊस

**मंद्रुप, दि. १८ ऑगस्ट-**

मंद्रुप परीसरात मघा नक्षत्राच्या पावसाने शुक्रवार व शनिवार दोन दिवस जोरदार हजेरी लावल्याने शेतकर्यांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. खरीप हंगामातील पिकांना जीवदान मिळाल्याने तूर, मूग, उडीद, बाजरी,भूईमूग, सोयाबीन या पिकांच्या उत्पन्नात वाढ होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. यंदा खरीप हंगामातील सर्वच नक्षत्राच्या पावसाने कमी अधिक प्रमाणात हजेरी लावल्याने खरीप पिकांना पोषक वातावरण आहे. मात्र पुष्य नक्षत्राच्या रिमझिम पावसामुळे व ढगाळ हवामानामुळे पिकांवर आळयांचे प्रमाण वाढल्याने पिके धोक्यात आली होती. आश्लेष नक्षत्रात तीव्र ऊन्हामुळे पिके धोक्यात आली होती. मात्र मघा नक्षत्राच्या आगमनाने तूर, मूग, मटकी, उडीद, सोयाबीन, मका, बाजरी या पिकांच्या उत्पन्नाची हमी निर्माण झाली आहे. मघा नक्षत्राच्या जोरदार पावसामुळे शेतातील बांधामध्ये पाणी आल्याने विहीर व बोअरना पाझर होऊन पाणी सुटण्यास मदत होणार असल्याचे शेतकरी वर्गांमधून सांगण्यात येत आहे. मघा नक्षत्राच्या पावसामुळे शेतकर्यांच्या आशा पल्लवित झाली आहेत.



### शेवते येथे वृक्षारोपण

**करकंब, दि. १८ ऑगस्ट-**


शेवते (ता. पंढरपूर) येथील ग्रामपंचायतीच्या नूतन उपसरपंच अनिता बाळासाहेब पाटील यांच्या निवडीबद्दल हार, तुरे, फेटा यासाठीचा खर्च वाचवून पर्यावरणपूरक वृक्षारोपण करून अभिनव पद्धतीने सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी सरपंच सुरेखा तुपसुंदर होते. यावेळी मुंबईस्थित उद्योजक अजित कंडरे उपस्थित होते. वृक्षारोपण ही काळाची गरज असून कोणत्या ना कोणत्या निमित्ताने प्रत्येकाने वृक्षारोपण केले पाहिजे. गावात, घरासमोर, सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण करून गाव हरितग्राम करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे उद्योजक अजित कंडरे यांनी व्यक्त केले. शेवते येथील भवानीमाता मंदिर परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून ते वृक्ष जतन करून वाढवण्यासाठी ग्रामपंचायतच्या वतीने सर्व ते प्रयत्न केले पाहिजेत, अस विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक दशरथ खळगे यांनी व्यक्त केले. गावामध्ये सार्वजनिक ठिकाणी, खासगी स्वतःच्या मालकीच्या जागेमध्येही सर्वांनी वृक्ष लागवड केली पाहिजे. फळांची झाडे लावून ती चांगल्या पद्धतीने जोपासले पाहिजेत, असे मत विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक अशोक तोंडले यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन बाळासाहेब पाटील यांनी केले, आभार विकास उलभगत यांनी मानले. यावेळी दशरथ खळगे, अशोक तोंडले, नारायण येड्रवकर, डॉ. श्रीधर यलमार, बबलू शेवतकर, विकास उलभगत, बलभीम गुरव, नामदेव तोंडले, शहाजी यड्रावकर, गणेश सुतार, विजय यड्रावकर, भारत पाटील, दत्ता तोंडले, नामदेव गुगले, विष्णू कोळवले, भाऊ येलपले, विष्णू गायकवाड, सतीश गुळदगड, गणेश तोंडले, विनायक खळगे, बाळासाहेब पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.



### पिलीव डॉक्टर्स असोशिएशनच्यावतीने पश्चिम बंगालमधील घटनेच्या निषेधार्थ निवेदन

**पिलीव, दि. १८ ऑगस्ट-**

पश्चिम बंगालमध्ये डॉक्टर मुलीचा निर्दयीपणे छळ करुन खुन करण्यात आला. या घटनेच्या निषेधार्थ निदर्शने करण्याऱ्या डॉकटर व नर्स यांना अमानुषपणे मारहाण करणयात आली. या घटनेच्या निषेधार्थ १७ ऑगस्ट रोजी संपूर्ण भारतात एक दिवस वैद्यकीय सेवा बंद ठेवण्यात आली होती. याचाच निषेध म्हणून पिलीव डॉक्टर्स असोशिएशनच्यावतीने पिलीव पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले. या घटनेत दोषी असणाऱ्यांवर कडक कारवाई करणयात यावी, अशी मागणी या निवेदनात करणयात आली यावेळी डॉ मिलींद गुळभिले, डॉ डिकोळे, डॉ काटकर, डॉ दिलीप पवार, डॉ वाघमारे, डॉ मगर,डॉ जाधव,डॉकटर निलेश कांबळे, डॉकटर डिकोळे मॅडम, डॉकटर माने देशमुख, डॉकटर तुषार गुळभिले यावेळी उपस्थितीत होते.पिलीव पोलीस ठाणयाचे हवालदार सतीश धुमाळ व अमीत जाधव यांनी सदरचे निवेदन स्विकारले.



### उमरड येथे हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता

**करमाळा, दि. १८ ऑगस्ट-**

उमरड येथे स्व. हुंबे गुरुजींच्या प्रेरणेने ३० वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात येत असून याची सांगता करण्यात आली. दररोज गावकऱ्यांच्या वतीने संपूर्ण गावाला संध्याकाळच्या जेवणाची व्यवस्था केली जाते. काल्याच्या कीर्तनानंतर राजू गोडगे, प्रदीप कोठावळे, विकास बदे, किशोर गोडगे व रमेश गोडगे यांच्या वतीने समस्त ग्रामस्थांना गोड जेवण देण्यात आले. उमरड आणि परिसरातील साडेतीन हजार लोकांची खुर्च्यावर बसून शाही भोजन व्यवस्था या तरुणांनी केली.

# अक्कलकोट बसस्थानकात चिखल

## महिला, आबालवृद्धांचे प्रचंड हाल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ ऑगस्ट-**

अक्कलकोट बसस्थानकात चिखल व पाण्यामुळे प्रवाशांना बसस्थानकात प्रवेश करणे अंत्यत जिकरीचे धोकादायक बनले आहे बसस्थानक की चिखलाच आगार की तलाव असा संतप्त सवाल प्रवशातून विचारला जात आहे. तीर्थक्षेत्री गौडगाव मारुती, हैद्रा, स्वामी दर्शनार्थ गुरुवार, रविवार, पोर्णिमा भाविकांचा प्रचंड ओघ असतो. कर्नाटक, मराठवाडाकडे जाण्यासाठी प्रचंड प्रवाशांना बसस्थानकात वृद्ध, महिला, बालके चिखलात चालणे कठिण झाले असूनही अग्गार व्यवस्थापक हाताची घडी तोंडावर बोट ठेऊन पाहत असल्याने प्रवाशातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.



अक्कलकोट नव्या बस स्थानकाचे बांधकाम सुरु आहे यामुळे पर्यायी तात्पुरते बसस्थानक उभे करण्यात आले आहे मात्र या ठिकणी रस्ता कॉक्रीट केलेला नाही सध्या भिज पावसामुळे ताप्तुरते बसस्थानकात मोठ्या प्रमाणात चिखल व पाणी थांबत आहे यामुळे वृद्ध महिला हे पाय घसरून पडण्याचे प्रकार वाढले आहेत. प्रवाशी धोकादायक स्थितीमध्ये बसस्थानकात वावरत आहेत.

बसस्थानक पाणी थांबल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नवे बसस्थानक पूर्ण होईपर्यंत अधिक कालावधी जाणार आहे. यामुळे तातडीने तात्पुरते बसस्थानक परिसरात कॉक्रीटीकरण तातडीने करावे अन्यथा याबाबत प्रवाशी संघटना शिवसेना ठाकरे गट राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट शहर अध्यक्ष राम जाधव, शिवसेना तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे, जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे, राष्ट्रीय समाज पक्षाचे दत्ता माडकर, लहुजी शक्ती सेना जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांनी आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.



## व्यापारी वाचनालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १८ ऑगस्ट-**

व्यापारी मोफत वाचनालयात ७८ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या साजरा करण्यात आला.

यामध्ये कलाकार चित्रपट मंडळाचे तालुकाध्यक्ष अमोल महामुनी यांच्या हस्ते व माजी उपसरपंच गौतम क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली झेंडावंदन करण्यात आले तसेच झेंड्या सलामी देण्यात आली व राष्ट्रगीताचे गायन करण्यात आले या कार्यक्रमास आजीव सदस्य माधव उर्फ राजाभाऊ देशमुख, सामाजिक कार्यकर्ते डॉ. वाले सामाजिक कार्यकर्ते राहुल कुर्डे, बाजी युवा नेते अजय कुर्डे, ग्राहक पंचायतचे दत्तात्रय कुलकर्णी, सहाय्यक ग्रंथपाल पूनम शिंदे, सेवक शहाजहान बागवान, मोहोळचे ब्रँड अँबॅसडर राजन घाडगे, क्षीरसागर आदीसह अनेक वाचक,सभासद, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# दोड्डीत घरापुढे वृक्षारोपण करुन संगोपन केल्यास घरपट्टी माफ

### ग्रामपंचायतीचा प्रेरणादायक उपक्रम; सर्वस्तरातून कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

झाडे लावणे, त्यासोबतच झाडे जगवणे ही सध्या काळाची गरज बनली आहे. त्यासाठी दक्षिण सोलापूर तालुक्यातील दोड्डीचे सरपंच महेश पाटील यांनी अनोखा उपक्रम सुरू केला आहे. गावातील प्रत्येक घरापुढे एक आंब्याचे झाड व एक सावली देणारे झाड अशी एक हजार झाडे लावली आहेत. झाडे जगवेल त्यांना घरपट्टी माफ अशी घोषणा सरपंच पाटील यांनी केली. अशा प्रकारच्या योजनेसाठी पुढाकार घेणारे हे एकमेव गाव असल्याचा दावा त्यांनी केला आहे.



विविध आगळ्यावेगळ्या उपक्रमासाठी नावाजलेल्या दोड्डी गावातील प्रत्येक घरापुढे दोन झाड लावण्यात आले. यामध्ये गावातील प्रत्येकाचे योगदान असावे, यासाठी प्रत्येक घरापुढेलावलेल्या दोन्ही झाडांचे छायाचित्र काढण्यात आले आहे. पुढच्या वर्षी हे दोन्ही झाडे वाढलेले असल्यास झाडाचे जतन करणाऱ्या ग्रामस्थाला घरपट्टी माफ करण्यात येईल, अशी घोषणा करण्यात आली यावेळी ग्राम पंचायतीकडून वृक्षसंरक्षक जाळ्या देण्यात आल्या. सरपंच पाटील यांनी कोरोना संसर्गाच्या काळात ग्रामस्थ तसेच नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविले आहेत. बाजार समिती बंद असल्याने भाजीपाल्याचे दर कोसळले होते. त्यावेळी त्यांनी स्वखर्चाने शेतातील भाजीपाला गावकऱ्यांना मोफत वाटले होते. यावेळी उपसरपंच विशाल राठोड यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## राजूबापू पाटील स्मृती पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १८ ऑगस्ट-**

भोसे येथील राजूबापू पाटील फाउंडेशनच्या वतीने राजूबापू पाटील स्मृती स्मृती पुरस्कारांचे वितरण आ. बबनराव शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

करकंब गावच्या लेकीचे झाड अभियान टीमच्यावतीने गेल्या ३ वर्षांपासून ६०० ते ७०० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले आहे. याबरोबरच जागर स्वच्छता अभियान टीम प्रत्येक रविवारी २ तास स्वच्छता करून करकंब गाव स्वच्छ आणि सुंदर व्हावे यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. त्या टीमच्या या कार्याची दखल घेऊन भोसे येथील स्व. राजूबापू पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रथमच स्व. राजूबापू पाटील फाऊंडेशन भोसे यांच्यावतीने करकंब गावच्या लेकीचं झाड या संस्थेला एक आदर्श संस्था म्हणून, सुधाकर कवडे साहित्यिक, वासुदेव गायकवाड कृषी, श्रीकृष्ण वाघमोडे शैक्षणिक, तर धनाजी खोत यांना प्रशासकिय सेवा पुरस्कार सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम देऊन आ. बबनदादा शिंदे यांच्या हस्ते देण्यात आले.





यावेळी शिवतेज मोहिते-पाटील, धनाजी साठे, कल्याणराव काळे, भगीरथ भालके, युवराज पाटील, गणेश पाटील, तात्यासाहेब पाटील, शेखर पाटील उपस्थित होते.

यावेळी स्व. राजूबापू पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक शेखर कोरके यांनी केले. यावेळी ज्ञानेश्वर दुधाणे यांनी मनोगत व्यक्त केले. आभार नामदेव कोरके यांनी मानले. यासाठी देविदास जमदाडे, स्वप्नील तळेकर, नितीन कुंभार, उमेश श्रीखंडे, कोंडीबा कोरके आदींनी परिश्रम घेतले.



## पंढरपूरच्या आगाराला ई-बस मिळाव्यात

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि. १८ ऑगस्ट-**

पंढरपूर आगाराला ई-बस मिळाव्यात अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे प्रवाशीराजा दिनात करण्यात आली.

पंढरपूर आगारात प्रवासीराजा दिवस या उपक्रमाचा शुभारंभ ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. अध्यक्षस्थानी महामंडळाचे विभागीय वाहतूक अधिकारी अजय पाटील होते. यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा संघटक दीपक इरकल, जिल्हा सचिव सुहास निकते, तालुका अध्यक्ष विनय उपाध्ये उपस्थित होते. प्रारंभी आगार प्रमुख योगेश लिंगायत यांनी स्वागत केले.

पंढरपूर ते पुणे जाणाऱ्या काही गाड्या नवीन कराड नाका, लिंक रोड, कॉलेज चौकमार्गे सोडाव्यात. दुपारी चारनंतरच्या पंढरपूर ते पुणे जाणऱ्या काही बस करकंब, टेंभुर्णी, इंदापूर यामार्गे सुरू कराव्यात. पंढरपूर ते तुळजापूर, धाराशिव अशी बससेवा मोहोळ, नरखेड, वैराग, गौडगाव यामार्गे नवीन सुरू करावी. पंढरपूर ते श्रीक्षेत्र नीरा नृसिंहपूर अशी श्रीपूर, संगम या मार्गावर बस सुरू करण्यात यावी. बंद केलेली पंढरपूर ते सोलापूर विनाथांबा बससेवा सुरू करावी, अशी अपेक्षा जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी व्यक्त केली. यावेळी विभागीय वाहतूक अधिक्षक नकाते, आगार व्यवस्थापक योगेश लिंगायत, वाहतूक निरीक्षक नवनाथ दळवे, वरिष्ठ लिपिक सुमित भिंगे, वाहतूक लिपिक समाधान मेटकरी उपस्थित होते.

## सहयाद्री फार्मसी कॉलेजमध्ये किटकजन्य रोग नियंत्रण शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १८ ऑगस्ट-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी,मेथवडे येथे राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत किटकजन्य रोग नियंत्रण- प्रसार व प्रचार या विषयावरील शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.याचे उदघाटन प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी सतिश राऊत, आरोग्य सेवक उमेश पाटील,संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले,प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सतीश राऊत यांनी मनोगतात अनेक कीटकांमुळे विविध प्रकारचे रोग तयार होतात व पसरतात. राज्यात डासांमार्फत प्रसारीत होणा-या हिवताप,हत्तीरोग,डेंगीताप,जॅपनिज एन्सेफीलायटीस, चिकुनगुन्या व सॅन्डजफ्लायमार्फत प्रसारीत होणारा चंडीपूरा तसेच पिसवांमार्फत प्रसारित होणा-या प्लेग या रोगांचा समावेश आहे.त्यांच्या प्रसार नियंत्रणासाठी अनेक उपाय असून त्यामध्ये घरासमोरील नाल्या वाहत्या करणे, खिडक्यांना जाळी बसवणे, झोपताना पूर्ण कपडे घालणे तसेच डास मॉस्किटो रिपेलेंट्स लिक्विड तसेच कॉईल वापरणे,घरातील व परिसरातील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे,कूलर,जुने टायर यामधील साचलेले पाण्याचा वेळोवेळी निचरा करणे,आजाराची लक्षणे दिसल्यास त्वरित चाचण्या करून औषधउपचार घेणे,प्रतिबंधक लस घेणे यांचा समावेश आहे.

तसेच शासनस्तारावरुन त्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येतात असे सांगितले. शिबिराचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन प्रा.एस. पी.जोकार यांनी केले.



## दिलीप माने यांच्या वाढदिवसानिमित्त गंगाधर बिराजदार मित्र परिवारांकडून सहल

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १८ ऑगस्ट-**

माजी आमदार दिलीप माने यांच्या वाढदिवसननिमित्त निंबर्गी येथील गंगाधर बिराजदार मित्र परिवाराच्या वतीने देवदर्शन सहल आयोजित करण्यात आली आहे. या यात्रेत अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ मंदिर, तुळजापूर येथील तुळजाभवानी माता मंदिर आणि येडशी येथील श्रीक्षेत्र रामलिंग मंदिर या देवस्थानांचे दर्शन घडविण्यात येणार आहे.

दिलीप माने यांच्या हस्ते निंबर्गीचे ग्रामदैवत बसवेश्वर मंदिरात आरती करून गाड्यांची पूजा करण्यात आली. यावेळी दिलीप माने यांनी भाविकांचा प्रवास सुखकर होवो आणि मनाजोगे दर्शन होवो, अशा शुभेच्छा दिल्या. यावेळी स्वामी समर्थ सूत गिरणीचे संचालक शंकरराव पाटील, माजी उपसरपंच अरुणकुमार बिराजदार देवदर्शन यात्रेचे आयोजक ब्रम्हदेवदादा माने बँकेचे संचालक गंगाधर बिराजदार, नागेश बिराजदार, चंद्रकांत कुबसंगे, प्रथमेश पाटील, श्रीशैल पाटील, गुरुनाथ कोट्टलगी, सतीश दरेकर, शिवा होसाळे, निंबर्गीचे उपसरपंच पिरसाहेब हवालदार, रावसाहेब आळगी, कल्याणी शिरगोंडे, इरेशा कोळी, निशांत लाडे, येदा दुपारगुडे, महादेव बोरगी, राम काका गुरव, अप्पासाहेब यमदे, विकास बिराजदार, नामदेव मोरे, सिद्धारम हत्ताळे, दीपक धारेराव, राजकुमार उंबरजे, सागर ककमारे, मोहन सुतार, दिनेश भालेकर, राजेश गुडेलू उपस्थित होते.

# वैरागकरांचे जागृत ग्रामदैवत

## श्री सद्गुरू सच्चिदानंद संतनाथ महाराज


**तभा वृत्तसेवा । रामदास पवार**
**वैराग, दि. १८ ऑगस्ट-**

**श्री सद्गुरू सच्चिदानंद संतनाथ महाराज वैरागचे ग्रामदैवत, प्रतिवर्षी श्रावण शुध्द एकादशी ते नारळी पोर्णिमा असा पाच दिवस येथे यात्रा महोत्सव मोठया उत्साहात साजरा केला जातो. उपलब्ध पुराव्यानुसार संतनाथ महाराज हे मूळ हिमालयातील राजकुलातील राजकुमार होत. नेपाळ मध्ये नवनाथ होऊन गेले. त्यापैकी एक नाथपंथी संत महाराष्ट्रात फिरत फिरत आले तेच हे संतनाथ होय. सतराव्या शतकात महाराज वैरागला आले असावेत. श्री तुळजाभवानी माता हिने दृष्टांताने आर्शीवाद दिला; तर धामणगावचे संत माणकोजी बोधलें महाराजांनी बोध दिला असे आख्यायिकांमधून सांगीतले जाते.**

वैरागमध्ये येऊन वास्तव्य करते वेळी अनेकांनी महाराजांना त्रास दिला. याच काळात दाजीबा घोंगडे यांच्या अतुट भक्तीने महाराज त्यांच्यावर प्रसन्न झाले . घोंगडेंचे कुटुंबाचा उध्दार झाला, घरी सुबत्ता आली. संतनाथ महाराज वैराग येथे आले तो दिवस श्रावण शुद्ध एकादशीचा, त्यांचे अवतार कार्य संपवून संजिवन समाधीस्त झाले तो दिवस श्रावण शुध्द पोर्णिमा म्हणुन या पाच दिवशी आज तागायत श्रावणात यात्रा भरते.

गावचे वाणी पाटील, घोंगडे, शेटे, विभूते, गाढवे, निंबाळकर, गुरव, मार्तंडे ,शिलवंत इ. घराण्यां बरोबर पालखीचे भोई, मशाल छत्र चामरे, हलगी , ढोलकी, संबुळवाले, आबदागिरी अशा सेवेकऱ्यांना मान आहे.

चार दिवस मध्यरात्रौ सवाद्दय पालखी मिरवणूक निघते. पाचवे दिवशी पोर्णिमेस पहाटे धामणगावच्या बोधले वंशजांकडून मंदिरात जोग घेण्याचा विधी होतो. दुपारी पालखी ग्राम प्रदिक्षणेस मिरवणूकीत अनेक युवक लेझीम, झांज, ढोल, काठी खेळतात. गाव तलावा जवळ सायंकाळी दहिहंडी फोडून लाह्यांचा प्रसाद सर्वांना वाटतात. पाळणे खेळण्यांनी अबालवृध दंग होतात. सायंकाळी शोभेचे दारुकाम, रात्रौ करमणूक कार्यक्रम होतात. दुसरे दिवशी शिळा छबिना पालखी महोत्सव, दुपारी कुस्ती स्पर्धाने यात्रा संपन्न होते. मंदिराचे बांधकाम हेमाडपंथी व पूर्णपणे दगडी आहे. गर्भगृहात मनाला प्रसन्न करणारी महाराजांची दिव्य मूर्ती, अखंड तेवणारे नंदादीप, दगडी मंडपा समोर भव्य लाकडी सभाग्रह, उंचच उंच तटभिंतीच्या दगडी भिंती, आतील भागात ओवऱ्या, पाण्यासाठी दगडी बारव ,भव्य प्रवेशद्वार, नगारखाना, उंच दगडी दीपमाळ, पेटती धुनी समोर चिमटा , कटोरा नाथ संप्रदयाच्या वस्तू वैराग्याची साक्ष देतात. समोरील बाजुला संत टेकनाथ महाराजांचे समाधी मंदिर आहे. बाह्य बाजूस मोठे दगडी कलोळ अशी भव्यता पाहावयास आजही मिळते.जनसामान्यांच्या मनातील श्रध्देच्या पायावर श्री संतनाथ महाराज यांचे महात्म आजही टिकून असल्याचे दिसून येते.



धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# वागदरीच्या जिल्हा परिषद शाळेस दहा संगणक संच भेट

**तभा वृत्तसेवा**
**नळदूर्ग, दि.१८ ऑगस्ट -**

वागदरी (ता. तुळजापुर) येथील जिल्हा परीषद प्राथमिक शाळेस मुंबईतील सिस फाऊंडेशनच्या पुढाकारातुन दहा संगणक संचाची भेट मिळाली.

मुंबईतील सीस फाऊंडेशन हे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना संगणकीय ज्ञान मिळावे त्यांना ऑनलाईन शिक्षण उपलब्ध व्हावे, या दृष्टीने विविध उपक्रम प्रभावीपणे राबवत असते. यावेळी आपले मनोगत व्यक्त करतांना जोशी यांनी म्हटले की, डॉ. पाटणकर यांच्या माध्यमातुन संगणक तंत्रज्ञानाच्या शैक्षणिक सोयी पोहचवु शकलो आणि थोड्या प्रमाणात समाज ऋण फेडता आले याचा मोठा आनंद होत आहे. सिस तर्फे वर्षातील हा दुसरा प्रकल्प आहे आणि असे दहा प्रकल्प या शैक्षणिक वर्षात पुर्ण



करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी एसबीआयचे निवृत्त अधिकारी बाळासाहेब हंगरगेकर, शाळेचे शिक्षक वृंद, सरपंच, उपसरपंच, सदस्य ग्रामस्थ उपस्थित होते.

## ▶▶संक्षिप्त वृत्त...



### 'लहुजीरत्न' राज्यस्तरीय पुरस्काराने संतोष तौर सन्मानित

**येरमाळा, दि.१८ ऑगस्ट -**

महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन मुंबईचे निमंत्रीत सदस्य संतोष तौर यांना लहुजीरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. लहुजीरत्न हा राज्यस्तरीय पुरस्कार असुन तो सहकार, शिक्षण, सामाजिक कार्य, सांस्कृतिक, बँकिंग कार्य इत्यादी क्षेत्रात उल्लेखणीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना दिला जातोगेल्या तीन वर्षांपासून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वरील क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. येरमाळा येथील जनहित पतसंस्थेच्या माध्यमातून अनेक सामाजिक, शिक्षण आणि कृषी क्षेत्रात उल्लेखणीय कार्य करणारे संतोष तौर यांना कळंब येथे लहुजीरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष विष्णुभाऊ कसबे, आ. अमित गोरखे व श्रीलक्ष्मी सेवाभावी सामाजीक संस्थेच्या अध्यक्ष डॉ. सरोजनी राऊत व आयोजक बालाजी गायकवाड यांच्याहस्ते मान्यवरांच्या उपस्थीत प्रदान करण्यात आला. यावेळी लहुजी सेनेचे कार्यकर्ते, समाज बांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### बाभळगाव तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी विकास पाटील यांची निवड

**इटकळ, दि.१८ ऑगस्ट -**

बाभळगाव येथील तंटामुक्त समिती अध्यक्षपदी विकास पाटील तर उपाध्यक्षपदी अशोक जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच शालेय व्यवस्थापन समितीच्या शिक्षण तज्ञपदी सुद्धा अशोक जाधव यांची निवड करण्यात आली. या बैठकीचे अध्यक्ष सरपंच सुरेखा कांबळे तसेच ग्रामसेवक कांबळे, मुख्याध्यापक जमादार, अमर पाटील, शिवाजी संपगे, जितेंद्र पाटील, जयंत पाटील, पुष्पक कसबे, गोविंद नरहरी, अॅड. किशोर पाटील, प्रशांत बिराजदार, अविनाश जाधव, नितीन कांबळे, गणेश देवकर, चंद्रकांत धनवडे, शामराव धनवडे, सुभाष बिराजदार इतर मान्यवर उपस्थित होते. एकमताने निवड झाल्यानंतर अध्यक्षख उपाध्यक्षांचे पुष्पहार, शाल व पेढा भरून यथोचित सत्कार करण्यात आला.

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शहराध्यक्षपदी शंतनु सगर यांची निवड

**उमरगा, दि.१८ ऑगस्ट -**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) उमरगा शहर अध्यक्षपदी शंतनू सगर यांची निवड करण्यात



आली असून पक्षाचे नेते आ. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपध्यक्ष प्रा. सुरेश बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली उमरगा तालुका राष्ट्रवादी पक्षाच्या विचार धारेस पाईक राहुन पक्षाच्या माध्यमातुन जनसामान्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी पक्षाच्या शाखा व तरुणोचे मजबुत संगठण वाढवण्यासाठी तसेच तळागाळातील जनतेच्या विकासासाठी संपूर्ण सगर यांची शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली.



### नागनाथ निकम, आप्पाशा पटणे यांचा सत्कार

**धाराशिव, दि.१८ ऑगस्ट -**

गुळहळळी येथे तंटामुक्त अध्यक्षपदी माजी उपसरपंच नागनाथ निकम व उपाध्यक्षपदी आप्पाशा पटणे यांची ग्रामसभेत एकमताने निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार भाजपा सोशल मिडियाचे जिल्हा संयोजक यांच्या हस्ते करुन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी पोलिस पाटील आकाश हांजगे, विकास चव्हाण, महादेव बाबर, दत्ता निकम, गजेंद्र हलकंबे, अरविंद बनछेरे, दत्ता बाबर, हरी लांडगे, राजेन्द्र बनछेरे, मारुती घोडके, गुंडू पटेल, शिवाजी घोडके, अंबादास घोडके, दत्ता निकम उपस्थित होते.

### वाहतुक शाखेची वाहनांवर कारवाई

**धाराशिव, दि.१८ ऑगस्ट -**

धाराशिव शहर वाहतुक शाखा व जिल्ह्यातील संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१७ ऑगस्ट रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ९९ बेशिस्त वाहनधारकांवर कारवाया करुन ६४ हजार १०० रूपयांचा 'तडजोड शुल्क' वसुल केले आहे.

# रस्त्याचे काम तात्काळ चालू करा : पालकमंत्री तानाजीराव सावंत

**पालकमंत्र्यांचे अधिकाऱ्यांना आदेश... नागरिकांची गैरसोय लवकरच होणार दूर...**

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१८ ऑगस्ट -**

शहरातील गोलाई चौक ते एमआयडीसी या दरम्यानचे रस्त्याचे काम तातडीने चालू करण्याचे आदेश आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा.डॉ.आ. तानाजी सावंत यांनी दिले आहेत. हे काम आचार संहिता लागू होण्याच्या अगोदर पूर्ण करण्याचे सक्त आदेश यावेळी त्यांनी दिले आहेत. या कामात मुद्दाम कोणी अडथळा आणीत असेल तर त्यावर थेट गुन्हा दाखल करण्याचे आदेश अभियंता आणि पोलीस निरीक्षकांना पालकमंत्री सावंत यांनी दिले आहेत.

यावेळी हे काम दोन दिवसात चालू करण्याचे अभियंत्याने सांगितले. त्यामुळे आगामी विधान सभा निवडणुकीची आचार संहिता लागण्याच्या अगोदर हे काम पूर्ण होऊन नागरिकांची गैरसोय दूर होईल अशी अपेक्षा नागरीकातून व्यक्त केली जात आहे. यावेळी जि.प.चे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, न.प.चे माजी गटनेते संजय गाढवे, सागर टकले, बाळासाहेब सुर्वे, बालाजी अंधारे उपस्थित होते. पालकमंत्री तानाजी सावंत हे भूम तालुक्याच्या दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी या रस्त्याच्या कामाची पाहणी करून हे काम चालू करण्याचे आदेश दिले. राज्य महामार्ग क्रमांक ६२ च्या या कामासाठी सावंत यांनी ९ कोटी निधी दिलेला आहे. अनेक महिन्यापासून हे काम बंद पडले होते.

त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होती. यावेळी निकृष्ट कामामुळे काम बंद पडले तर काही हरकत नाही. मात्र हेतुपुरस्सरपणे हे काम कोणी बंद पाडीत असेल तर संबंधितांवर तात्काळ सरकारी कामात अडथळा आणल्यामुळे गुन्हा दाखल करा, असा आदेश पालकमंत्री सावंत यांनी अभियंता आर.आर. गिराम व पोनि. प्रल्हाद सूर्यवंशी यांना दिला आहे.

या कामावर गटनेते संजय गाढवे यांनी जातीने लक्ष घालून काम पूर्ण करून घ्यावे असेही सावंत



यांनी सांगितले. या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण झाल्यास नागरिकांची मोठी सोय होणार आहे. तसेच शासकीय दूध डेअरीच्या पुढे जे अपघाती चढ-उतार आहेत. ते देखील कमी होणार आहेत. त्यामुळे अपघात कमी होणार आहेत. हा रस्ता व्हावा मात्र या रस्त्याचे रुंदीकरण अगोदर करून घ्यावे. जेणेकरून शहर वासियांना व वाहनधारकांना रहदारीसाठी सुलभ जाईल.

तसेच ठेकेदाराने एमएसईबीचे पोल न काढताच काम चालू केले होते.

यासाठी विरोधकांनी दि.१२ मे रोजी हे काम बंद पाडले होते. आता हे काम रुंदीकरण न करताच चालू करण्यात येणार आहे.

# जकणी तांडा येथील महादेव मंदिराची विटंबना

**मंदिरावरील कळस तोडले... अज्ञात समाजकंटकांना अटक करण्याची हिंदू समाजाची मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ ऑगस्ट -**

नळदुर्ग शहरापासुन थोड्याच अंतरावर असलेल्या जकणी तांडा येथील महादेव मंदिराची अज्ञात समाजकंटकांने विटंबना केली असुन मंदिरावरील कळस तोडुन टाकण्यात आले आहे. या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली असुन पोलिस त्या अज्ञात समाजकंटकाचा शोध घेत आहेत.

अणदुरची घटना ताजी असतानाच पुन्हा एकदा नळदुर्गजवळील जकणी तांडा येथील महादेव मंदिराची अज्ञात समाजकंटकाने विटंबना केली आहे. मंदिरावरील कळस तोडुन टाकण्यात आला असुन या घटनेचा सर्व स्तरातुन निषेध करण्यात येत आहे. ही घटना १७ ऑगस्ट रोजी उघडकीस आली आहे. मंदिराची विटंबना झाली असल्याचे समजताच पोलिस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीची पाहणी केली. त्याचबरोबर अज्ञात समाजकंटकाचा शोध घेण्यासाठी श्वानपथकाला पाचरण करण्यात आले होते. मात्र अद्याप महादेव मंदिराची विटंबना करणाऱ्या त्या अज्ञात समाजकंटकाचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले नव्हते. कांही दिवसांपुर्वीच अणदुर शिवारातील महादेव मंदिराची विटंबना केल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा एकदा नळदुर्गजवळील जकणी तांडा येथील महादेव मंदिराची विटंबना करण्याची संतापजनक घटना घडली आहे. सध्या हिंदु धार्मियांचा पवित्र श्रावण महिना सुरु आहे. या महिन्यात प्रत्येक हिंदु बांधव महादेवाची मनोभावे भक्ती करत असतो अशावेळी अशा घटना घडत असल्याने यामागे नेमके काय षडयंत्र आहे. याचा पोलिस प्रशासनाने छडा लावणे गरजेचे आहे. ऐन सणासुदीच्या दिवसात अशा घटना घडत असल्याने सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. समाजकंटकाला जात, धर्म याचे कांही देणेघेणे नसते. त्याला फक्त समाजामध्ये अशांतता पसरविणे हाच त्याचा उद्देश असतो. त्यामुळे जो कोणी समाजकंटक असे कृत्य करून समाजामध्ये अशांततेचे वातावरण पसरविण्याचे काम करीत आहे त्याच्या पोलिसांनी मुसक्या आवळणे गरजेचे आहे.

जकणी तांडा येथील महादेव मंदिराची विटंबना करणाऱ्या अज्ञात समाजकंटकाचा लवकर शोध घेऊन त्याच्यावर कारवाई करण्याचे आश्वासन पोलिस प्रशासनाने दिले आहे. या घटनेचा सर्व स्तरातुन निषेध होत आहे.

### आ. चौगुले यांची अखंड शिवनाम सप्ताह सोहळ्यास भेट

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१८ ऑगस्ट -**

लोहारा शहरातील महात्मा बसवेश्वर मंदिरात सुरू असलेल्या अखंड शिवनाम सप्ताह श्री परमरहस्य व शिवमहापुराण कथा सोहळ्यास आ. ज्ञानराज चौगुले यांनी दि.१७ ऑगस्ट रोजी भेट देऊन शि.भ.प. सुरमणी कुमारसागर महाराज लोहारेकर यांचे दर्शन घेऊन उपस्थित भाविकांशी संवाद साधला.

यावेळी आ. चौगुले यांनी महारांचा सत्कार करुन दर्शन घेतले. तसेच संयोजकाच्यावतीने आ. चौगुले यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी मोहन पणुरे, जगन्नाथ पाटील, राजेंद्र माळी, नागण्णा वकील, दत्तात्रय बिराजदार, शंकर जट्टे, वैशाली खराडे, हबीब शेख, सारिका बंगले उपस्थित होते.

# मराठा सेवा संघाच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी भगत यांची निवड



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ ऑगस्ट -**

मराठा सेवा संघाची जिल्हा कार्यकारणी नुकतीच जाहीर झाली असून जिल्हाध्यक्षपदी महेश भगत यांची निवड करण्यात आली.

मराठा सेवा संघाची प्रमुख पदाधिकारी ज्येष्ठ सदस्यांच्या उपस्थित बैठक पार पडली. यावेळी जेष्ठ म ार्गदर्शक नेताजी गोरे, प्रदेश उपाध्यक्ष संदिपान जाधव, डी.आर. कदम, ठाकरे, राजकुमार भुतेकर, तुषार पाटील, अॅड. तानाजी चौधरी, बलराज रणदिवे, रोहित पडवळ, अतुल गायकवाड, प्रशांत शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाध्यक्षपदी महेश भगत, विभागीय कार्याध्यक्षपदी सतीशकुमार पाटील, विजयकुमार पवार, जिल्हा कार्याध्यक्ष रोहीत यादव, जिल्हा उपाध्यक्ष तर महेश इंगळे, शहरप्रमुखपदी निवड करण्यात आली.

यावेळी प्रदीप धस, दंडनाईक, अजय माने, हनुमंत हुंबे, महादेव सावंत, अजय भोसले, जावेद सौदागर, पी एन देशमुख, विजयसिंह देशमुख इत्यादी उपस्थित होते.

# दयावान युवा मंच यंदा १९ फुटी गणेश मूर्ती प्रतिष्ठाना करणार : मिथून पोपळे

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ ऑगस्ट -**

जिल्हयात सर्वाधीक उंच आकर्षक मुर्तीसाठी प्रसिध्द असलेल्य दयावान युवा मंच यंदा १९ फुटी दशनान विण्यावर शंकर रुपी गणेश मूर्ती प्रतिष्ठापना करणार या मुर्ती बनविण्याचे काम सध्या सुरु आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष मिथून पोपळे यांनी दिली.

दयावान युवा मंचची बैठक होवुन त्यात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी सांस्कृतीक व सामाजीक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे ठरले असुन सदरील सर्व कार्यक्रम मंडळाच्या प्रथेप्रमाणे विनावर्गनी मंडळाच्या आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

यावर्षी प्रति वर्षाप्रमाणे तसेच मंडळाचे विशेष वैशिष्ट्ये म्हणजे सर्वांत उंच १९ फुटी आकर्षित गणेश मुर्ती, महिलांसाठी होम मिनीस्टर, लकी ड्रॉ, वृक्षारोपण, रांगोळी स्पर्धा, प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी घेतल्या जाणार आहे. मंडळाचे हे २५ वर्ष पुर्ण झाले आहे.

यंदाच्या मंडळाच्या अध्यक्षपदाचा मान मुस्लिम सम ाजातील दिदार सय्यद यांना दिला आहे.

यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष सुरज गायकवाड, सचिवपदी युवराज शिंदे, कोषाध्यक्षपदी राजु चव्हाण कार्याध्यक्ष कुणाल रोंगे, गणेश भोरे यांनी मानले.

सभेचे मंडळाचे सदस्य राजु सातपुते, आस्तीक साखरे, छबीलाल परदेशी, कलीम शेख, उमेश देवकर, धीरज नरसुडे, सोनु साखरे, बाजीराव शिंदे, नितीन गुंजाळ, सुरज परदेशी विकास चौगुले, अमर गुंडगिरे, ओंकार इगवे, भैरुनाथ रोटे, रतन गरड आदिंची निवड करण्यात आली.

यावेळी मंडळाचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भारतीय किसान संघाचे उद्या अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ ऑगस्ट -**

भारतीय किसान संघ जिल्हा धाराशिवच्या वतीने धाराशिव येथे दि.२० ऑगस्ट रोजी सकाळी ११ वा. जंत्रा फॅन्क्शन हॉल सांजा रोड धाराशिव येथे अधिवेशन आयोजित करण्यात आलेले आहे.

या अधिवेशनात शेतकऱ्याच्या विविध समस्यांवर चर्चा होवून त्यावर काही ठराव संमत करण्यात येणार आहेत. त्यासोबतच भारतीय किसान संघ करीत असलेल्या देशभरातील कार्याची माहिती, आगामी काळात भारतीय किसान संघाची धाराशिव जिल्हातील वाटचाल ठरवण्यासाठी हे अधिवेशन आयोजीत करण्यात आलेले आहे. उपष्टित शेतकरयांना महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी, कृषि विज्ञान केंद्र येथील अधिकारी यांचे मार्गदर्शन होणार आहे. तरी यासाठी जिल्हातील हजारो शेतकऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा संयोजक नितीन घुले यांनी केलेले आहे.

### नादुरूस्त रुग्णवाहिका पुन्हा रुग्णांच्या सेवेत

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१८ ऑगस्ट -**

शिवसेनेच्यावतीने लोहारा तालुक्यासाठी रुग्णवाहिका देण्यात आली होती. हि रुग्णवाहिका नादुरुस्त झाली होती. त्यामुळे रुग्णांची मोठ्या प्रमाणात हेळसांड होत होती. याची दखल घेऊन आ. ज्ञानराज चौगुले यांनी रुग्णांची सोय व्हावी म्हणुन तात्काळ रुग्णवाहिका दुरुस्त करुन रुग्णांच्या सेवेसाठी उपलब्ध करुन दिली आहे.

या रुग्णवाहिकेचे दि.१७ ऑगस्ट रोजी नगराध्यक्ष वैशाली खराडे यांच्या हस्ते पुजन करुन जनसेवेत पुनःच्छ समर्पित करण्यात आली.

# न.प. कर्मचारी संघटनेच्या वतीने सफाई कामगारांना साडया वाटप

**जिल्हाध्यक्ष तावडे यांची रक्षाबंधनानिमित्त भेट...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ ऑगस्ट -**

न.प. धाराशिव यांच्या वतीने स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट रोजी नगर परिषद सफाई कामगार यांना साडया वाटप करण्यात आल्या.

यावेळी उपमुख्याधिकारी पवार, कार्यालयीन अधिक्षक संजय कुलकर्णी, अभियंता घडे, न.प. कर्मचारी संघटनचे सचिव रावसाहेब शिंगाडे, साहील बागवान, गोरोबा अवचार, भारत



साळुके, विलास गोरे, संतोष गायकवाड, राजीव कोरवी तसेच मोठया संख्येने सफाई कामगार हजर होते. जिल्हाध्यक्ष दिपक तावडे यांनी मनोगत व्यक्त करताना सफाई कामगार हेच खरे न.प.चा आत्मा आहेत.

'स्वच्छ शहर सुदर शहर' ही संकल्पना अस्तित्वात आणणारे खरे हे सफाई कामगारच त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून रक्षाबंधनानिमित्त त्यांचा साडी व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



# विभागीय आयुक्त प्रविण गेडाम यांनी घेतले श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन

**तुळजाई स्त्री शक्ती पुरस्कार बंद असल्याबाबतीत केली खंत व्यक्त...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ ऑगस्ट -**

तुळजापूर शहर वासियांच्या गळ्यातील ताईत बनलेले नाशीक विभागीय आयुक्त महसूल विभाग डॉ. प्रविण गेडाम यांनी शनिवार दि.१७ रोजी सहकुंटुंब श्री तुळजाभवानी देविचे दर्शन घेतले.

श्री तुळजाभवानी दर्शनानंतर नगराध्यक्ष सचिन रोचकरी, जिल्हा दुध संघाचे चेअरमन बाळासाहेब शिंदे, प्रा. संभाजी भोसले, किशोर गंगणे यांनी त्यांचे स्वागत करुन सत्कार केला. यानंतर तुळजापूर विकास आराखड्याबाबत सचिन रोचकरी यांनी त्यांना माहीती दिली. तसेच यापूर्वी त्यांच्या कारकिर्दीत झालेल्या तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या माध्यमातुन झालेल्या विकास कामे भवानी कुंड, १०८ भक्त निवासाची कामाची पहाणी केली.

यावेळी स्त्री शक्तीदारी तुळजाई स्त्रीशक्ती पुरस्कार, शांकभरी नवरात्र कला क्रिडा पुरस्कार, अद्याप न चालू केल्याबद्दल खंत व्यक्त केली.

तसेच भवानी तिर्थकुंड व साहित्य संग्रहालय कायम स्वरुपी सुरु ठेवले जात नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. बीओटीतुन हे विकास कामे केले असते तर कमीत कमी भाविकांच्या सेवेत असले असते, असे स्पष्ट केले.

यावेळी त्यांच्या स्वागतासाठी तुळजापूर शहरवासियांनी मोठी गर्दी केली होते.

# दहावित प्रथम आलेल्या विद्यार्थीनीच्या हस्ते ध्वजारोहण

## युवा सरपंच सदाशिव इंगळे यांचे सर्वत्र कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर,१८ ऑगस्ट -**

तालुक्यातील लहान येथील ग्रामपंचायत ने ७७ वा स्वातंत्र्यदिन जल्लोषात साजरा करत,विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेस चालना मिळावी या उद्देशातून इयत्ता दहावीत 'प्रथम' क्रमांक घेणाऱ्या विद्यार्थिनीच्या हस्ते ध्वजारोहण केले. ग्रामपंचायत चे सरपंच सदाशिव इंगळे यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

तालुक्यातील स्मार्ट व्हिलेज म्हणून ग्रामपंचायत लहान जिल्ह्यात ओळखली जाते.येथील युवा सरपंच सदाशिव इंगळे यांनी इयत्ता दहावी मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थिनींच्या हस्ते ध्वजारोहण करण्याचा आगळावेगळा निर्णय घेत परीक्षेत ९१.८० गुण घेऊन प्रथम येणाऱ्या कु.आकांक्षा रावले,कु.श्रद्धा वानोळे या दोन विद्यार्थिनीच्या



हस्ते लहान ग्रामपंचायतचे ध्वजारोहण केले.

ग्रामपंचायत च्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. विद्यालयातील प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीच्या हस्ते ध्वजारोहण होत असल्याचे पाहून उपस्थित विद्यार्थी सुध्दा उत्साही व आनंदित होते.या प्रसंग कु.आकांक्षा रावले,कु.श्रद्धा वानोळे यांनी इतरही विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त गुण घेऊन प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण व्हावे असे आवाहन केले.

**गावातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी या उद्देशाने केला सन्मान : सदाशिव पाटील इंगळे**

गावातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवंता वाढावी शैक्षणिक गुणवत्तेस चालना मिळावी या उदात्त हेतूने हा उपक्रम आम्ही राबविला आहे.यातून त्यांना शिक्षणाचे महत्व काय असतें याची समज व्हावी त्यामुळे आम्ही गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान केला अशी प्रतिक्रिया ग्रा.पं.लहान चे युवा सरपंच सदाशिव पाटील इंगळे यांनी दिली..

# आ.भीमराव केराम यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**माहुर,१८ ऑगस्ट -**

किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार ज्यांना या तालुक्यातील जनता विकासपुरुष म्हणून संबोधीत करते,असे लोकनेते भाजपाचे आ.भीमराव केराम यांचा वाढदिवस स्थानिक शासकीय विश्रामगृह येथे दि.१५ ऑगस्ट या भारतीय स्वातंत्र्य दिनी माहूर तालुका भाजपच्या वतीने असंख्य पदाधिकारी,कार्यकर्ते यासह आ.केराम यांच्या वर स्नेह असलेली स्नेहांकीत मंडळी यांच्यावतीने त्यांना हार्दिक शुभेच्छा देत दीर्घायुषी होण्याचे अभिष्टचिंतन करत मोठ्या थाटात साजरा करण्यात आला.

आ.भीमराव केराम यांचे माहूर नगरीत आगमन होताच सर्वप्रथम त्यांचे हस्ते तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाचा शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर शहरातील मुख्य मार्गावरून मोटरसायकल वरून भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. यावेळी भारत माता की जय,वंदे मातरम् व केराम तुम आगे बढो......अशा रॅलीत उपस्थितांनी दिलेल्या लक्षवेधी घोषणेने व फटाक्याच्या अतिषबाजीने माहूर शहर अक्षरश: दणाणून गेले होते.

यानंतर शहरातील शासकीय विश्रामगृह येथे हजारों नागरीकांच्या उपस्थितीत आ. केराम यांचे अभिष्टचिंतन करत त्यांचा वाढदिवस मोठ्या उल्हासित वातावरणात थाटात साजरा करण्यात आला.

यावेळी किनवट-माहुर विधानसभा मतदारसंघ में एकही नाम, भीमराव केराम, भीमराव केराम! असा गगनभेदी नारा बुलंद करण्यात आला. यावेळी शहराध्यक्ष पुरुषोत्तम लांडगे, माजी नगराध्यक्ष प्रा.राजेंद्र केशवे, नगरसेवक सागर महामुने, भाजपाचे ज्येष्ठ नेते अनिल वाघमारे,तालुका सरचिटणीस अपील बेलखोडे,जीवन अग्रवाल,निळकंठ मस्के, विनायक मुसळे,एस.डी. राठोड, किशोर जगत,दिलीप मुनगीनवार,विनोद सूर्यवंशी, सुरेश गिऱ्हे,रामकिशन केंद्रे, नितीन राठोड यांच्यासह शुभेच्छा देण्यासाठी तहसीलदार किशोर यादव, मुख्याधिकारी डॉ.राजकुमार राठोड,ग्रा.रु. वै.अधिक्षक डॉ.बिपिन बाभळे,तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेश माचेवाड,डॉ.निरंजन केशवे, किसन राठोड यांचेसह आमदार केराम यांच्यावर स्नेह असलेली हजारो स्नेहांकीत मंडळी, महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### पो.उप.नि वैशाली कांबळे यांना विशेष सेवा पदक

**सोनखेड**-पोलीस उपनिरीक्षक वैशाली कांबळे यांना गृह विभागाच्या वतीने विशेष सेवा पदक जाहीर करण्यात आले आहे. त्यांनी गडचिरोली



येथील नक्षलग्रस्त भागात ७ जानेवारी २०२० ते २५ ऑगस्ट २०२३ या कार्यकाळात आष्टी पोलीस स्टेशन हद्दी अंतर्गत येणाऱ्या अतिशय नक्षलग्रस्त व आदिवासी भागात एक महिला अधिकारी असून सुद्धा आपले कर्तव्य यशस्वीरित्या पार पाडल्यामुळे पोलीस उपनिरीक्षक सौ. वैशाली निवृत्ती कांबळे यांच्या कार्याची दखल घेत त्यांना गृह विभागाच्या वतीने विशेष सेवा पदक जाहीर करण्यात आले. ते पदक त्यांना १५ ऑगस्ट रोजी नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षक व अविनाश कुमार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.




### कॅनरा बँक शाखेच्या वतीने विद्यार्थ्यांना बक्षिसे वाटप

**नांदेड**-नायगाव येथील कॅनरा बँक शाखेच्या वतीने डॉ.आंबेडकर विद्या ज्योती या योजने अंतर्गत इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना बक्षिस व प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. स्वातंत्र्य दिनानिमित्त कॅनरा बँकेच्या नरसी-नायगाव शाखेच्या वतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम जिल्हा परिषद मुलींची शाळा या ठिकाणी घेण्यात आला.ध्वजारोहणा झाल्यानंतर कॅनरा बँक शाखेचे व्यवस्थापक अविनाश कौरवार, अधिकारी अमोल सोनकांबळे व अन्य कर्मचाऱ्यांच्या हस्ते इयत्ता पाचवी ते दहावी वर्गातील प्रथम येणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना बँकेच्या डॉ.आंबेडकर विद्या ज्योती या योजनेतंर्गत पाचवी ते सातवी तीन हजार रुपये, आठवी ते दहावी ते पाच हजार रुपये व प्रोत्साहनपर बक्षिस व प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.


### भोकर येथील सरपंच संघटनेची कार्यकारिणी बरखास्त

**भोकर**-माधव अमृतवाड यांची तालूक्यातील सर्व सरपंचानी सरपंच संघटनेचे अध्यक्ष म्हणून निवड केली होती. त्यानूसार अमृतवाड यांनी तीन वर्ष सरपंच संघटनेचे नेतृत्व केले. पण त्यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये सरपंचाना विश्वासात घेतले नाही एकधिकारशाहीपणे कारभार करुन सरपंच संघटनेच्या नावाखाली आपल्या स्वतःचा अजेंडा वापरत असल्याचा आरोप सरपंचानी एका पत्रान्वये केला व तालूक्यातील सर्व सरपंचानी संघटनेचे अध्यक्ष अमृतवाड यांच्या नेतृत्वाखाली जूनी सरपंच संघटना बरखास्त करण्याचे तालूक्यातील सर्व सरपंचाचे एकमत झाल्याचे पत्र दि.१२ आँगष्ट ला गटविकास अधिकारी पंचायत समिती यांना देण्यात आले त्या अनूषंगाने दि.१४ रोजी पंचायत समिती सभाग्रहात जूनी सरपंच संघटना बरखास्त करण्यासाठी बैठक बोलावण्यात आली होती यावेळी घेण्यात आलेल्या गूप्त मतदान प्रक्रियेत २७ सरपंचानी अध्यक्ष बदला असे म्हणाले तर २६ सरपंचानी पूर्वीच्याच अध्यक्षाच्या बाजूने मत मांडले त्यामूळे जूनी सरपंच संघटना बरखास्त झाली असून निविन कार्यकारिणीची १९ रोजी निवड होणार सोमवारी होणार असून सरपंच संघटनेचा नूतन अध्यक्ष होण्यासाठी दहा ते बारा सरपंच इच्छूक असल्याची चर्चा आहे.

### हिमायतनगर बंद उत्स्फूर्त प्रतिसाद

**हिमायतनगर**-बांगलादेशातील हिंदू वरील अन्याय अत्याचाराच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेला बंदला व्यापाऱ्यांनी प्रतिसाद देत आपली प्रतिष्ठान बंद ठेवली होती. या घटनेच्या निषेधार्थ शनिवार दिनांक १७ रोजी बाजारपेठेतील शंभर टक्के दुकाने बंद ठेवून बांगलादेशातील होत असलेल्या हिंदू वरील अत्याचाराचा तीव्र निषेध नोंदविला आहे. यावेळी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल सकल हिंदू बांधवांच्या वतीने शहरातील प्रमुख रस्त्यावरून मोर्चा काढून बांगलादेशातील सर्व घटकांचा जाहीर निषेध केला आहे. श्री परमेश्वर मंदिर परिसरात सकल हिंदू बांधव हाजारोच्या संख्येने जमले असून तिथे पोलीस निरीक्षक भगत यांना सकल हिंदू बांधवांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

### इमाम शेखची पोलीस दलात निवड



**आदमपूर**-मौजे दगडगांव,ता.लोहा येथील सर्वसामान्य कुटुंबातील शेख इमाम कमालसाब याची एकाचवेळी नांदेड पोलीस व राज्य राखीव पोलीस बल गट क्र.३ जालना अशा दोन पोलीस दलात शिपाई म्हणून थेट परीक्षेतून निवड झाली आहे.येथील कमालसाब शेख व सौ. रब्बानाबी शेख हे दांपत्य रोजंदारी व मोल मजुरी करतात.पाच मुली व एक मुलगा अशी त्यांना अपत्ये आहेत. प्रसंगी इमाम हा अभ्यासाबरोबरच आई वडिलांनाही हातभार लावत आर्थिक कामातही मदत करीत असे.मागील तीन वर्षांपासून केंद्रीय सैन्य दल व सरळ सेवा परीक्षांची तयारी तो सह्याद्री स्टडी सर्कल अकॅडमी, लातूर फाटा,नांदेड येथे करीत होता.सोबतच गाव परिसरात सकाळी उठून शारीरिक चाचणीची देखील शास्त्रीय तयारी त्याने कसून केलेली आहे.त्याचे फळ एकाचवेळी दोन ठिकाणी यशाने सलामी दिली.

# ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील वाढत्या गुन्हेगारीने सिडकोकर हादरले

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड ,१८ ऑगस्ट -**

नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील गेल्या चार महिन्यापासून गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. यावर पोलीस प्रशासनाचा येथील गुन्हेगारावर कसलीच वचक राहीलेली नाही. गेल्या चार दिवसात तर गुन्हेगारीने उच्चांक गाठला आहे. परिसरात सतत गुन्हे घडत असल्यामुळे सिडकोतील जनता हदरून गेली आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या चार महिन्यापासून अधिकच गुन्हेगारी वाढलेली दिसून येते. पण गेल्या चार दिवसात तर हद्दच पार केलेले आहे. दिनांक १४ ऑगस्ट रोजी ठाण्यातील पोहेका संजय रामदिनेवार हे कर्तव्यावरून ठाण्याकडे येत आसतानाच वाघाळा येथे आज्ञात गुन्हेगारांनी अडवून मारहाण करून ३ हजार ५००रू. खिशातील काढून घेतले.



लगेच त्यानंतर दिनांक १७ ऑगस्ट रोजी राज आईलमिल समोर ढवळे कॉर्नर येथील आईस्क्रीमचा व्यवसाय करणाऱ्या ३२ वर्षीय गजराज डेबीसिंग याला खंजरेन हातावर मारून त्याच्या गाडीचा समोरील काच फोडून आज्ञात गुन्हेगार पळून गेले. तसेच दिनांक १८ ऑगस्ट रोजी एका अज्ञात गुन्हेगाराने सिडको पाण्याची टाकी जवळील तलवारीने एका गुंडेगावकर इसमावर हल्ला झाला . तर परिसरात ऊसामध्ये गोळीबार झाल्याची माहिती मीळताच उपविभागीय अधिकारी व पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने तपासकामी गेल्याचीही माहीती मीळाली.असे अनेक व रोज गुन्हे सिडको नांदेड ग्रामीण ठेणे हाद्दीत होत आहेत. गुन्हा घडल्यावर घटनास्थळावरून पोलिसांना फोन केला तर ते दोन तासानी येतात आणि माहिती देणाऱ्या व्यक्तीस दाब, दर्डाव घालून निघून जातात आम्ही पाहून घेतो असे म्हणतात. जास्तीत जास्त जुगार, मटका, दारू एवढ्याच ठिकाणी लक्ष घालून आर्थिक बाजू ताब्यात घेतल्याचे दाखवत आहेत. वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी ग्रामीण पोलीस ठाणे सिडकोकडे जास्तीचे लक्ष घालून गुन्हेगारी प्रवर्तेस आळा घालावा अशी मागणी व्यापारी व भयभित झालेल्या सिडकोतील जनतेडुन नूतन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या कडे होत आहे.

# आगामी विधानसभेत प्रस्थापितांना त्यांची जागा दाखवा : प्रा.हाके

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,१८ ऑगस्ट -**

महाराष्ट्र हा अठरापगड जातीचा आहे कोणाच्या बापाची मक्तेदारी नसून ओबीसी समाजाने एकत्रीत लढा देवून आगामी विधानसभा निवडणूकित प्रस्थापितांना घरी बसवा असे अवाहन भोकर येथे दि.१८ आँगष्ट रोजी संपन्न झालेल्या ओबिसी आरक्षण बचाव मेळाव्यात प्रा.लक्ष्मण हाके यांनी अवाहन केले.

महाराष्ट्रात ४९२ जाती असून साठ टक्क्याहून अधिक जनसंख्या असलेल्या ओबिसी समाजाला राजकिय नेतृत्व करण्यापासून दूर ठेवण्यात आलं आजपर्यंतच्या राजकारणात मराठा समाजाला मोठं करण्याचं काम ओबिसी समाजाने केलं परंतू संविधानाच्या माध्यमातून मिळालेल्या आरक्षणात वाटा मागणाऱ्यांनी ओबिसी समाजाच्या पाठित खंजिर खूपसला. एकिकडे जातीचा मान दाखवायचा तर दूसरीकडे मागासवर्गीयांचे आरक्षण मागायचे हे कटकारस्थान काही मंडळीकडून महाराष्ट्रात चालू करण्यात आले आहे. आता जागरुक होण्याची वेळ ओबिसीवर आली असून जातीभेद विसरुन सर्व ओबिसी समाज एकवटणे काळाची गरज ठरली आहे. ओबिसी समाज



जर एकत्र आला तर प्रस्थापितांना साधा गावचा सरपंचही होता येणार नाही. दिडशेहून अधिक आमदार बत्तीस खासदार असलेला मराठा समाज मागासवर्गीय कसा? न्यायालयाने सूध्दा मागणी फेटाळली असताना सरसकट आरक्षणाची मागणी करत ओबिसींना संपवण्याचा हेतू डोळ्यासमोर ठेवून वर्चस्व सिध्द करण्याची केविलवाणी धडपड चालू आहे. संविधानाच्या माध्यमातून सर्वांना न्याय देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तरतूद केलेली असताना प्रस्थापितांनी तोंड पाहून न्याय देत घराणेशाही ओबिसी समाजावर लादली. सदर घराणेशाही मोडित काढण्यासाठी अठरापगड जातीनी एकत्र येवून प्रस्थापितांना त्यांची जागा दाखवण्याचे आवाहन केले. यावेळी नवनाथ वाघमारे, नागनाथराव घिसेवाड, नामदेवराव आयलवाड, गोविंद बाबागौड, बि.आर.पांचाळ, नागोराव शेंडगे, सतीश देशमूख, सूरेश बिल्लेवाड, माधव अमृतवाड, उज्वल केसराळे, अॅड. शेखर कूंटे, अॅड. प्रमेश्वर पांचाळ, सूनिल चव्हाण निळकंठ वर्षेवार, सूभाष नाईक, संदिप गौड, राहूल कोंडलवार आदिसह जिल्ह्यातील ओबिसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सरसम येथे बोगस डॉक्टराकडून महिलेचा गर्भपात; डॉक्टर फरार

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,१८ ऑगस्ट -**

हिमायतनगर तालुक्यातील सरसम येथील बोगस डॉक्टरांकडून अनेक दिवसापासून महिलेचे गर्भपात केल्या जात होते. दरम्यान एका बोगस डॉक्टरकडून महिलेचा गर्भपात होत असल्याची माहिती मिळताच वैद्यकीय अधिकारी व त्यांच्या पथकाने जाऊन पाहणी केली असता गर्भपातासाठी आलेल्या दोन महिलासह बोगस डॉक्टर व त्याचा साथीदार फरार झाला.या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

सरसम येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर नखाते यांना सरसम येथून १३ ऑगस्ट रोजी नवी आबादी परिसरातील एका घरी बोगस डॉक्टरकडून गर्भवती महिलेचे अवैधरित्या गर्भपात होत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर वैद्यकीय अधिकारी डॉक्टर नखाते आपली टीम घेऊन घटनास्थळी पोहोचले. ज्या घरात महिलेचा गर्भपात करण्याची तयारी सुरू होती तिथे तपासणी केली असता. त्याच्यासोबत दोन महिला अंधाराचा फायदा घेऊन फरार झाल्या व या घरात अधिकची तपासणी केली असता. होमिओपॅथिक असलेली ओळखपत्र आढळून आले वेगवेगळ्या प्रकारचे पेन किलर टॅबलेट्स गर्भपात करण्याची किटस भूल देण्याचे इंजेक्शन यासह विविध प्रकारचे साहित्य मिळाले आहे. सदर साहित्य जप्त केले असून संबंधित बोगस डॉक्टर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

## स्वातंत्र्यदिनानिमित्त फळांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१८ ऑगस्ट -**

संपूर्ण देशभरामध्ये भारतीय स्वातंत्र्याचा ७८ वा वर्धापन दिन अत्यंत उल्हासात आणि आनंदात साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने नांदेड शहरातील विविध ठिकाणी देशभक्तीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, यातच युवक काँग्रेसचे शेख साहिल यांनी फळांचे वाटप केले.

जनता माध्यमिक विद्यालय येथे विद्यार्थ्यांना फळांचे वाटप आणि त्यासोबतच देशभक्तीपर मार्गदर्शन शेख साहिल व त्यांच्या मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले, त्यासह नुरी चौक येथे सुद्धा देशभक्तांना फळांचे वाटप करण्यात आले.

यावेळी गोविंद कदम, बालाजी बामणे, तेजस नरवाडे, आकाश भालेराव, सूरज लाड,संदीप भुदूकशे,अमोल लोने, अर्जुन सलगर, सतीश कांबळे, शेख राहील, शेख मोला , शेख समीर, शेख परवेस, बिलाल पिंजारी, प्रकाश कदम, आदी मान्यवर उपस्थित होते.

# कोलकाता घटनेच्या निषेधार्थ कँडल मार्च

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,१८ ऑगस्ट -**

कोलकाता येथील महिला डॉक्टरच्या बलात्कारानंतर त्यांची निर्दयीपणे हत्या केल्याच्या निषेधार्थ शुक्रवारी दि.१६ किनवटच्या गोकुंदा येथे महिलांनी कँडल मार्च काढला.




भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांच्या सुचेनुसार व नांदेड उत्तरच्या जिल्हाध्यक्षा संध्या राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा सरचिटणीस भावना दीक्षित व इतर महिला पदाधिकाऱ्यांनी कँडल मार्चचे आयोजन केले होते.गोकुंद्याच्या दत्तनगर ते स्व.बाळासाहेब ठाकरे चौकापर्यंत काढलेल्या कँडल मार्चमध्ये जिल्हा सचिव करिश्मा भगत ,डॉ.अनुराधा उपासनी , डॉ. सौ. घडसिंह डॉ.वंदना पत्की ,डॉ. सुंकरवार, जाधव , स्वाती राव ,धावाले यांच्यासह किनवट व गोकुंदा येथील महिला,विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कँडल मार्चनंतर महिलांनी महिला डॉक्टरच्या मारेकऱ्यांना त्वरित फासावर लटकविण्याची मागणी केली.दरम्यान,याच घटनेच्या निषेधार्थ किनवट डॉक्टर्स असोसिएशनने शनिवारी दि.१७ दवाखाने बंद ठेवून मारेकऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रपतींकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# अंगणवाडीच्या ३० विद्यार्थ्यांना संदीप सोनुले यांच्यातर्फे स्वखर्चातून गणवेश वितरण

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,१८ ऑगस्ट -**

हदगाव शहरातील वार्ड क्रमांक .१६ मधील अंगणवाडीच्या एकूण ३० विद्यार्थ्यांना १५ ऑगस्ट २०२४ स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला सामाजिक कार्यकर्ते संदीप सोनुले यांनी समाजाचे काही देणे लागते या उद्धात हेतूने प्रेरित होऊन या विद्यार्थ्यांना गणवेश स्वखर्चातून वाटप केले. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी रोजी निघणाऱ्या प्रभात फेरीसाठी लहान मुलांमध्ये नेहमीच मोठ्या प्रमाणात उत्साह व आकर्षण असते. देश भावना लहान वयातच रुजविण्यासाठी प्रत्येक शिक्षक व पालक हे विद्यार्थी वर बाल अवस्थेच्या वेळेसच त्यांच्या मनात देशाविषयी प्रेम खोलवर रुजवण्याचे प्रयत्न करत असतात. नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या संदीप सोनुले यांनी हीच बाब हेरून हदगावतील संबंधित अंगणवाडीच्या ३० विद्यार्थ्यांना स्वखर्चातून गणवेश वाटप केले तसेच यावेळी अंगणवाडी साठी स्वतंत्र शेड साठी लागणाऱ्या निधीची मागणी विद्यमान आ. माधवराव पाटील जवळगावकर यांच्याकडे करणार असल्याची ग्वाही संबंधित वार्डातील नागरिकांना दिले त्यांच्या या स्तुतीपूर्ण उपक्रमाबद्दल शहरासह संबंधित शाळेच्या विद्यार्थ्यांच्या पालकातून त्यांचे कौतुक होत आहे. सदरील गणवेश वितरणाच्या




कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक भिसे, सामाजिक कार्यकर्ता पौर्णिमा सावते, दीक्षा जमदाडे व विद्यार्थ्यांचे पालक यावेळेस उपस्थित होते.

# होटाळा जलजीवनच्या कामात घोटाळा ; चौकशी करण्याची ग्रामस्थांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१८ ऑगस्ट -**

नायगाव तालुक्यातील मौजे होटाळा येथील मंजूर जलजीवन मिशन अंतर्गतच्या प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात घोटाळा होत असून सदर कामाची सखोल चौकशी करून संबंधित कंत्राटदार व दोषी अभियंत्यांवर कडक कारवाई करावी अशी मागणी होटाळा येथील भाजपाचे दत्ता बन व सचिन पवार यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे.

केंद्र सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत हर घर नल योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. कोट्यावधी रुपयांच्या निधी खर्च करून देखील संबंधित गुत्तेदार सरपंच व ग्रामसेवक यांनी संगणमत करून सदर प्रकल्पाचे काम निकृष्ट दर्जाचे केले असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच रस्त्याचे खोदकाम करून ते पूर्ववत न करने, पाईपलाईन इस्टिमेट प्रमाणे न करने, नवीन विहीर मंजूर असताना जुनी एमआरईजीएसच्या विहिरीलाच कनेक्शन जोडण्यात आले आहे, .त्याचप्रमाणे जाणीवपूर्वक काही लोकांना कनेक्शन दिले जात नसून नळाला सुमार दर्जाची प्लास्टिकची तोटी लावण्यात आली आहे. अशा प्रकारचे अनेक तक्रारींचा पाढा वाचत दत्ता बन होटाळकर यांनी दिलेल्या निवेदनामध्ये सरपंच ग्रामसेवक यांना पाठीशी घालणाऱ्या उपाभियंता नाईक यांची चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी अन्यथा या विरोधामध्ये ग्रामस्थांसह आमरण उपोषण करण्याचा इशारा पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पाटील यांना दिला आहे.

या निवेदनावर भारतीय जनता पार्टीचे भटके विमुक्त आघाडी सदस्य दत्ता आनंदराव बन, सचिन रावसाहेब पवार, राजु पवार, हनुमंत पांचाळ, गंभीर बन, अशोक कंदुरके, शाम पवार, अविनाश पवार, माधवबन, रमेश पवार, आकाश पवार, राजेश बन, सुजित पवार, आनंद पवार, आनंद प्रसाद बन, संभाजी सखाराम पवार, अविनाश बन यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

लातूर
# दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले

## 'महात्मा बसवेश्वर'मध्ये दुर्मिळ औषधी वनस्पती प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १८ ऑगस्ट-**

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील वनस्पती शास्त्र विभागाच्यावतीने शुक्रवार दि.१६ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत दुर्मिळ औषधी वनस्पतीचे प्रदर्शन महाविद्यालयातील विद्यार्थी अभ्यासिकेत आयोजित करण्यात आले होते.

या प्रदर्शनाचे उद्घाटन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

या प्रदर्शनाला संस्थेचे उपाध्यक्ष श्री माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, संचालक बस्वराज (राजू) येरटे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध वैद्य तथा आयुर्वेदिक वनस्पती जडीबुटी तज्ञ रघुनाथ दत्तोबा अवधूत, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दीपक चाटे यांचासह श्री शंभुलिंग शिवाचार्य विद्यालय व शंभू लिंग प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने भेट घेऊन दुर्मिळ औषधी वनस्पतीची माहिती घेतली.



# तरुणांना रोजगार देण्याचे शास्वत स्त्रोत म्हणजे 'मांजरा' परिवार

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १८ ऑगस्ट-**

लोकनेते राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या संकल्पनेतून उद्ययास केलेला मांजरा परिवार आज लातूर जिल्ह्याच्या विकासात मोठे योगदान देत आहे. केंद्र आणि राज्यातील सत्ताधाऱ्यानी रेल्वे बोगी कारखान्यातून एक लाख रोजगार निर्माण होणार असल्याची बतावणी केली होती. परंतू, गेल्या ७ महिन्यांत या बोगी कारखान्यातून एकाही रोजगाराची निर्मिती झाली नाही. या उलट मांजरा परिवाराने हजारों रोजगार निर्माण करुन तरुणांच्या हाताला काम दिले. म्हणुनच तरुणांना रोजगार देण्याचे शाश्वत स्त्रोत म्हणून मांजरा परिवाराकडे पाहिले जाते. त्यामुळे आगामी काळातही मांजरा परिवाराशी आपले नाते कायम राहिल, अशा विश्वास राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी येथे व्यक्त केला.

ते लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या एकुरगा तालुका लातूर येथील शाखेच्या नूतन इमारतीचे उद्घाटन १६ ऑगस्ट रोजी माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी एकुरगा येथील छत्रपती शाहू विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

## जिल्हा बँकेच्या एकुरगा शाखेच्या नूतन प्रशस्त इमारतीचा शुभारंभ




यावेळी लातूर जिल्हा बँकेचे चेअरमन आमदार धिरज विलासराव देशमुख, माजी आमदार त्र्यंबक भिसे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य धनंजय देशमुख, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, जिल्हा बँकेचे माजी चेअरमन श्रीपतराव काकडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, विलास सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्याम भोसले, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे, ट्वेन्टी-वन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, जिल्हा बँकेचे व्हाईस चेअरमन ॲड़ प्रमोद जाधव, बाजार समितीचे उपसभापती सुनील पडिले, नारायण पाटील तुकाराम गोडसे, सचिन शिंदे, नीलकंठ बचाटे श्रीनिवास शेळके गुरुनाथ गवळी बाळासाहेब बिडवे सचिन सूर्यवंशी विशाल पाटील यांच्यासह बँकेचे सर्व संचालक मंडळ अन्य मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी माजी आमदार अँड त्र्यंबक भिसे, कृऊबाचे सभापती जगदीश बावणे, धनंजय देशमुख, श्रीशैल उटगे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी लातूर जिल्हा बँकेचे संचालक पृथ्वीराज सिरसाट, अशोक गोविंदपूरकर, व्यंकटराव बिरादार, स्वयंप्रभाताई पाटील, जयेश माने, दिलीप पाटील नागराळकर, ॲड़ राजकुमार पाटील, मारोती पांडे, अनुप शेळके, अनिताताई केंद्रे कार्यकारी संचालक हणमंतराव जाधव बँकेचे माध्यम समन्वयक हरीराम कुलकर्णी बँकेचे विविध खाते प्रमुख अधिकारी उपस्थित होते

यावेळी ग्रामस्थ, महिला बचत गट, विविध संस्था यांचेकडून माजी मंत्री दिलीपराव देशमुख, आमदार धीरज देशमुख यांचा सत्कार करण्यात आला सूत्रसंचालन प्रा. सचिन सूर्यवंशी यांनी केलो. या कार्यक्रमास सावरगाव, धानोरी, टाकळी, एकुरगा, चाटा, भोयरा, ढाकणी, निवळी, अंकोली, खंडापूर, चिचोलीराव येथील

### लातूर तालुक्यात ठिकठिकाणी केले स्वागत

शुक्रवारी लातूर तालुक्यातील एक एकुरगा येथे माजी मंत्री दिलीपराव देशमुख आमदार धीरज देशमुख हे नियोजित बँकेच्या कार्यक्रमास जात असताना सावरगाव टाकळी धानोरी येथे रस्त्यावर ग्रामस्थांनी दोन्ही नेते मंडळीचे स्वागत सत्कार केला कार्यक्रमास ग्रामस्थ, सोसायटीचे अध्यक्ष, शेतकरी बांधव, खातेदार ,ग्राहक, महिला बचतगट प्रतिनिधि, विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### केंद्र व राज्य सरकारकडून शेतकऱ्यांची अडवणूक

केंद्र आणि राज्य सरकार शेतकरी विरोधी धोरणे राबवून शेतकजयांना अडचणीत आणीत आहे. शेतकजयांच्या पदरात चार पैसे पडणार, अशी परिस्थिती निर्माण होताच केंद्र सरकार आयात-निर्यातीच्या धोरणात लगेच बदल करते. त्यामुळे शेतकजयांच्या शेतीमालाला भावच मिळत नाही. या उलट शेतकजयांच्या ऊसाला मांजरा परिवाराकडून सर्वाधिक भाव दिला जातो. इथेनॉल निर्मिती कायम सुरु राहिली असती तर शेतकजयांना आाणखी चार पैसे देता आले असते, असे नमुद करुन माजी मंत्री दिलीपराव देशमुख पुढे म्हणाले, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याने साडे सहा लाख टन ऊसाचे गाळप केले. २०० रुपये प्रमाणे तेरा-साडेतेरा कोटी रुपयांचे रक्कम मांजरा कारखान्याने नफ्यातून शेतकऱ्यांना दिले. तर लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक देशात क्रमांक एकची बँक आहे, असे नमुद करुन माजी मंत्री दिलीपराव देशमुख म्हणाले, जिल्हा बँक कल्पवृक्ष आहे. तुम्ही स्वप्न बघा, आम्ही बँकेच्या माध्यमातून तुमचे स्वप्न पुर्ण करु. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे जिल्हा बँकेने २५ हजार महिलांचे खाते काढले. विशेष म्हणजे महिलांकडून एक रुपायाही न घेता त्यांचे खाते काढले राष्ट्रीयकृत बँकांत महिलांना खाते काढण्यासाठी १५०० रुपये लागतात. परंतु, जिल्हा बँकेने एक रुपयासुद्धा घेतला नाही. बँकेचे चेअरमन आमदार धिरज देशमुख यांनी सुमारे ३ कोटी ७५ लाखांची ओवाळणी बहिणींना अगोदरच देऊन टाकली, असेही माजी मंत्री दिलीपराव देशमुख म्हणाले..

### जिल्हा बँक गरीबांची स्वप्नपूर्ती करणारी संस्था

लोकनेते विलासराव देशमुख यांनी घालून दिलेले लोकसेवेचे विचार घेऊन आम्ही पुढे जात आहोत. लोकनेते विलासराव देशमुख यांची प्रेरणा आणि माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनामुळे लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आज देशभरात नावारुपाला आलेली बँक आहे. आपल्या नेत्यांनी गोरगरी, शेतकरी, शेतमजूरांचे स्वप्न पुर्ण करणाजया संस्था निर्माण केल्या त्यासंस्थाच्या माध्यामातून गरीबांची स्वप्नपुर्वी होत आहे, असे नमुद करुन आमदार धिरज विलासराव देशमुख पुढे म्हणाले, काँग्रेस समाजकारणाला प्राधान्य देत राजकारण करते. उलट इतर पक्ष केवळ सत्तेसाठी राजकारण करीत आहेत. त्यासाठी जाती-धर्मात तेढ निर्माण केले जात आहे. काँग्रेस सर्वधर्मसमभावाची शिकवण देतो. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे गोडवे गायिले जात आहेत. परंतु, निराधारांच्या पगारी, श्रावणबाळ योजनेच्या पगारी का थांबल्या? याचे उत्तर सत्ताधाजयांनी द्यावे, असेही आमदार धिरज विलासराव देशमुख म्हणाले.

# विलासराव देशमुख यांच्या स्मृती दिनानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांची केली तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १८ ऑगस्ट-**

राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा माजी केंद्रीय मंत्री लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या स्मृतीप्रित्यर्थ लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व लातूर येथील जीवन विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिव्यांग विद्यार्थी त्वचारोग निदान आणि सर्वरोग तपासणी व उपचार शिबीराचे खासदार डॉ. शिवाजी काळगे आणि लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन झाले.



यात जीवन विकास प्रतिष्ठानचे लातूर येथील ॲड. विजयगोपाल अग्रवाल मुकबधीर विद्यालय, मतिमंद विद्यालय, सौ. सुशिलादेवी देशमुख निवासी मुलींचे मुकबधीर विद्यालय, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र व विशेष शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे विद्यार्थी यात मोठया प्रमाणावर सहभागी होऊन आरोग्य तपासणी करून घेतली. यावेळी जयसिंगराव देशमुख, अँड प्रमोद जाधव, विजय देशमुख, संजय निलेगावकर, जिल्हा बँकेचे संचालक पृथ्वीराज शिरसाठ, अनुप शेळके, प्रभाकर केंद्रे, अनिता केंद्रे, स्वयंप्रभा पाटील, डॉ. उमाकांत जाधव, खाजाबानू अन्सारी, डॉ. अजय नारायणकर, डॉ. दीपा पुरी, डॉ. आर जी जोशी, डॉ. दयानंद कोळपे, डॉ. अश्विनी नारायणकर, डॉ सुनील पुरी, डॉ. रिना जयस्वाल, डॉ. शितल तळीखेडकर, डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. हर्षद चिपडे, डॉ रमण महाळंगीकर, डॉ. स्वामी, डॉ विनोद स्वामी, मुख्याध्यापक देशमुख, सुशिलादेवी देशमुख मुकबधीर विद्यालयाचे मुख्याध्यापक देशपांडे, मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक भंडारे आदीसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# काँग्रेसच्या डॉ. निलंगेकर निष्ठावंताचा कासारसिरशीमध्ये एल्गार

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. १८ ऑगस्ट-**

तालुक्यातील कासारशिरसी येथे स्व.डॉ.शिवाजीराव पाटील निलंगेकर काँग्रेस विचार मंच च्या वतीने प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत काँग्रेस कार्यकर्त्यांची विभागीय आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस माजी मुख्यमंत्री डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचे समर्थक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काँग्रेसचे जेष्ठ नेते लातूर जि.प.चे माजी कृषी सभापती हल्लापा कोकणे तर प्रमुख पाहुणे म्हणून पं.स.चे माजी सभापती नागनाथ पाटील, माधवराव पौळ, श्रीमंत मेहकर, माजी जि.प.सदस्य चनप्पा होळकुंदे व भीमराव पाटील, प्रदीप होळकुंदे शरणाप्पा मुळे, प्रा.दयानंद चोपणे, निलंगा विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष अमोल सोनकांबळे, उपाध्यक्ष सोनाजीराव कदम, व्यंकटराव शिंदे, विलास दाजी मुगळे आदी उपस्थित होते., यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले...

यावेळी बोलताना ॲड. हल्लापा कोकणे म्हणाले की, या ६८ गावातील संपुर्ण जबाबदारी अशोकराव पाटील निलंगेकर यांनी घेऊन आपण जो निर्णय घ्याल तो सर्वांना मान्य राहील. कासारशिरसी भागात पारंपरिक माजी मुख्यमंत्री स्व.डॉ.शिवाजीराव पाटील निलंगेकर यांना मानणारा साहेबांचे निष्ठावंत कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात आहेत. पक्षाच्या हितासाठी अशोकराव पाटील निलंगेकर जो काही सामाजिक, राजकीय निर्णय घेतील तो आम्ही मान्य करू असे ते म्हणाले. यावेळी अनेकांनी औसा, विधानसभा मतदारसंघ काँग्रेसकडे सोडवून घेण्यासाठी प्रयत्न करावे व आपण निलंगा विधानसभा मतदारसंघातून उभे राहावे यासाठी आम्ही सर्व कार्यकर्ते निलंगा व औसा विधानसभा पिंजून काढू असे आवाहन माजी जि.प. व पं.स. सदस्यांनी व्यक्त केले..

शेवटी बैठकीत मार्गदर्शन करताना अशोकराव पाटील निलंगेकर म्हणाले की, निलंगा तालुक्यातील कासारशिरसी हा भाग आदरणीय निलंगेकर साहेबांचा जुना मतदारसंघ असून तो पुनर्रचनेमध्ये औसा विधानसभेला जोडला गेला आहे. निलंगा हा मोठा भाऊ असला तरी लहान भाऊ कासारसिरशी आहे . मी ६८ गावाच्या माझ्या कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडणार नाही.

आपण हाक मारा मी धावून आपल्या मदतीस येईन.आपण सर्व निलंगेकर यांच्यावर अमाप प्रेम करणारे आहात व त्यांचे सहकारी असून मी आपणास कदापि विसरणार नाही. गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत आपण आपल्या भागातून महाविकासआघाडीच्या उमेदवारास मताधिक्य दिलात त्याप्रमाणे विधानसभेला पण सहकार्य असावे असे भावनिक आवाहन केले

यावेळी शिवाजी बरमदे, शिवाजी सरतापे, मच्छीद्र मंडले, इब्राहिम मुल्ला, सचिन सोळुंके, राजेंद्र खुरपे, संजय पाटील, सुरेश मुळे, सुनील हजारे, व्यंकटराव जाधव, संजय पाटील, दिनकर जाधव नेलवाड, सुनिल केरनाथ हजारे, दिलीप जाधव नेलवाड, ज्ञानेश्वर लेंडाळे, विठ्ठल रेवणे, महादेव सडके, इब्राहिम मुजावर, राजकुमार पाटील, व्यंकट धुमाळ, संतोष धुमाळ, सुरेश पाटील, जीवन धुमाळ, महादू हजारे, नेताजी पाटील, दत्ता डांगे, बुद्धिवंत बुदले, रावसाहेब गायकवाड, बिराजदार रवींद्र विलास दडपे, विवेक होळकुंदे, विजयकुमार बिराजदार, दिगंबर भिगोले, रामचंद्र बुकले, सुरेश मोरे, चेअरमन चंद्रकांत सोळुंके, सतीश मोहिते, संजीव अरिकर, आयुब शेख, समद शेख, दस्तगिर मुजावर, योगेश अरिकर, शिवानंद बिराजदार, चंद्रकांत निचटे, विकास पाटील, अशोकराव सुर्यवंशी, प्रभू बिराजदार, दुर्गदास शिवारे, रणवीर माने मदनसुरी तसेच ६८ गावातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

# लातुरात आयएमएसह वैधकीय संघटनांचा कॅन्डल मार्च

## डॉक्टर तरुणीवरील बलात्काराचा तीव्र निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १८ ऑगस्ट-**

कोलकात्यातील अमानवीय घटनेच्या निषेधार्थ आयएमए, निमा, होमिओपॅथी, आयडीए, मार्ड व नर्सिंग स्टाफ या संघटनांच्या वतीने शुक्रवारी सायंकाळी लातुरात कँडल मार्च काढण्यात आला. या कँडल मार्चमध्ये मोठ्या संख्येने तज्ज्ञ डॉक्टर्स सहभागी झाले होते. शनिवारी सर्व दवाखाने बंद ठेवून या प्रकरणातील आरोपीना फास्ट ट्रॅक कोर्टाच्या माध्यमातून कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली. सर्व वैद्यकीय संघटनांच्या वतीने शनिवार अत्यावश्यक सेवा वगळता वैद्यकीय सेवा बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार हे आंदोलन करण्यात आले.



कोलकात्यातील वैद्यकीय महाविद्यालयात पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या एका महिला डॉक्टरवर अमानुष बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याची अमानवीय घटना घडली आहे. या घटनेने संपूर्ण देश ढवळून निघाला असून आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टर्स व नर्सिंग स्टाफच्या सुरक्षेचा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या निंदनीय घटनेचा निषेध करण्यासाठी शुक्रवारी सायंकाळी लातूरच्या गांधी चौकातील शासकीय सुपरस्पेशालिटी रुग्णालयापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कपर्यंत व तेथून परत रुग्णालयापर्यंत हा कँडल मार्च काढण्यात आला. या कँडल मार्चमध्ये लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांच्यासह आयएएमचे अध्यक्ष डॉ. उमेश कानडे, सचिव गणेश बंदखडके, डॉ. अशोक पोद्दार, डॉ. कल्याण बरमदे, डॉ. गिरीश कोरे, डॉ. अभय कदम, डॉ. संगमेश चवंडा, डॉ. अजय ओव्हाळ , डॉ. शैलेंद्र चव्हाण, डॉ. उमेश लाड, डॉ. विमल होळंबे, डॉ. क्रांती साबदे , डॉ. सुरेखा काळे, डॉ. शांता कानडे, डॉ.अनुजा कुलकर्णी, डॉ. मोहिनी गानू, डॉ. शुभांगी राऊत, डॉ.शैला सोमाणी, डॉ. ऋजुता अयाचित, डॉ.सचिन इंगळे, डॉ.नरेंद्र पाटील, डॉ. रमेश भराटे, डॉ. महेश सावंत, डॉ. सचिन जाधव यांच्यासह शहरातील अनेक तज्ज्ञ डॉक्टर्स सहभागी झाले होते. वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी तसेच पदव्युत्तर शिक्षण घेणारे डॉक्टरशी सहभागी झाले होते. यावेळी कँडल मार्चमध्ये सहभागी झालेल्या सर्व डॉक्टर्सनी कोलकात्यात घडलेल्या या अमानुष प्रकरणाची उच्च स्तरिया चौकशी व्हावी व फास्ट ट्रॅक कोर्टात हा खटला चालवून आरोपीना तात्काळ कठोरात कठोर शिक्षा देण्यात यावी अशी मागणी केली. विशेष करून महिला डॉक्टरांच्या सुरक्षेची काळजी, इमर्जंसी वॉर्डला सेवा देणाऱ्या डॉक्टरांना सुरक्षा देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. डॉ. उमेश कानडे, डॉ. गणेश बंदखडके यांनीही घडल्या प्रकाराचा तीव्र शब्दात निषेध केला.

कँडल मार्चमध्ये आपले विचार व्यक्त करताना खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी या घटनेचा तीव्र शब्दात निषेध करून आपण संसदेतही हा विषय उपस्थित करून याप्रकरणी फस्त ट्रॅक कोर्टात खटला चालविण्याची मागणी लावून धरू असे सांगितले. त्याचप्रमाणे वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांवर भ्याड हल्ले होणे, अशा अमानवीय घटना घडणार नाहीत यासाठीची उपाय योजना करण्यासाठीही आपण सर्वतोपरी उपाययोजना करू असे त्यांनी सांगितले. डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनीही या प्रकरणाचा तीव्र शब्दात निषेध केला.

या कँडल मार्च व राष्ट्रव्यापी बंद मध्ये आयएमए लातूर, एम.एस.एम.टी. लातूर, मार्ड लातूर, मॅग्मो लातूर, एमसीएमओ लातूर, वैद्यकीय विद्यार्थी संघटना, नर्सिंग संघटना, पॅरा मेडिकल असोसिएशन यासह डॉक्टर्स संघटनांनी कँडल मार्चमध्ये सहभाग घेतला. शनिवारच्या राष्ट्रव्यापी दवाखाने बंद ठेवण्याच्या आवाहनास सर्वच तज्ज्ञ डॉक्टरांनी प्रतिसाद देऊन अत्यावश्यक सेवा वगळता रुग्णसेवा बंद ठेवली.

# लाडकी बहीण योजना व नव मतदारांसाठी ऑनलाईन नोंदणी सेवा केंद्राचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १८ ऑगस्ट-**

भाजपचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांच्या वतीने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना व नव मतदार मोफत ऑनलाईन नोंदणी सेवा केंद्राचा शुभारंभ दि. १८ ऑगस्ट रोजी लातूर शहरातील महात्मा गांधी चौक येथे भाजप शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला. प्रारंभी श्री महालक्ष्मी देवीचे दर्शन घेऊन या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली. महायुती सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्यासाठी दलाल, एजंटांकडून महिलांची आर्थिक लूट केली जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर भाजप शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी स्वतः पुढाकार घेवून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची मोफत ऑनलाईन नोंदणी करण्याची सुविधा भाजप जिल्हा कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे.



मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या नोंदणीची मुदत ३१ ऑगस्ट असून या योजनेचे अर्ज - अजूनही ज्या महिलांनी भरलेले नाहीत किंवा ज्यांनी मतदार नोंदणी केलेली नाही. अशा सर्व लातूर शहरातील महिला -पुरुष नागरिकांसाठी ऑनलाईन नोंदणी करण्याची सुविधा महात्मा गांधी चौक येथील भाजपच्या जिल्हा कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेली आहे. या ऑनलाईन केंद्राबद्धल व मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबद्धल संपूर्ण माहिती असलेल्या चित्ररथा द्वारे शहरात मोफत ऑनलाईन नोंदणी केंद्राबद्धल जन जागृती करण्यात येतं आहे. हे चित्र रथ शहरभर फिरून ध्वनीक्षेपकाद्वारे लातूरकर बंधू भगिनीना मोफत ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

लातूर शहरातील बंधू भगिनींनी भाजपच्या सदर ऑनलाईन नोंदणी केंद्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी केले आहे. यावेळी प्रवीण कस्तुरे, रवि सुडे, ऍड. दिग्विजय काथवटे, प्रवीण सावंत, शोभाताई पाटील, मीनाताई भोसले, संजय गिरी, आबा चौगुले, ललित तोषणीवाल, राहुल भूतडा, जमीर शेख, अबेद अली, प्रमोद गूडे, बालाजी मार्कडे आदिसह भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.